शुक्रवार २३ डिसेंबर २०२२

समर्पित बिरादरी

वर्धापनदिन विशेषांक - वर्ष तिसरे

थांबला न सूर्य कधी..... थांबली न धारा !

लोक बिरादरी प्रकल्प, हेमलकसा

पोस्ट व तालुका भामरागड जिल्हा गडचिरोली, महाराष्ट्र, ४४२७१०

magazinelbp@gmail.com

समर्पित बिरादरी

- संपादक – अनिकेत आमटे
- प्रकाशनाची तारीख – 23 – डिसेंबर– 2022
- वर्ष/ अंक – 3/3
- मुखपृष्ठ मांडणी, व्यवस्थापक, अक्षररचना – दिपक सुतार
- लेख संकलन व निवड – अमित कोहली
  लीलाधर कसारे
  गिरीश कुलकर्णी
  खुशाल पवार
  तुषार कापगते
  अमित माहेश्वरी

'समर्पित बिरादरी' हा वार्षिक विशेषांक, लोक बिरादरी प्रकल्पाच्या 49 व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून डॉ. प्रकाश आमटे व डॉ. मंदाकिनी आमटे यांच्या शुभहस्ते प्रकाशित करण्यात आला.

लोक बिरादरी प्रकल्प, हेमलकसा

ता.भामरागड, जि. गडचिरोली, महाराष्ट्र, ४४२७१०

www.lokbiradariprakalp.org magazinelbp@gmail.com

सचिन – +91-7588772858 (प्रकल्प भेटीकरिता) केतन– +91-7588772857(देणगीकरिता)

अनुक्रमणिका

शब्दसाठवण

• प्रस्तावना	अनिकेत आमटे	
• वन्यप्राण्यांची अद्भूत संपर्कप्रणाली	डॉ. अ. द. खोलकुटे	07
• लोणार : अध्यात्म आणि विज्ञान ह्यांची विलक्षणअनुभूती	किरण डोंगरदिवे	11
• माहेरचा आहेर	रंजना आगटे	16
• निसर्ग	प्रशांत सूर्यवंशी	19
• वास्तुआशीर्वाद	माधुरी पाटील	22
• अखंड प्रेरणेचा स्त्रोत - डॉ. प्रकाशभाऊ आमटे	अभिजित देशमुख	27
• पगडंडी	डॉ. प्रबीरकुमार दास	30
• ओरण- पवित्रवन	तुषार सूर्यवंशी	33
• मला गांधीजी कधी भेटले	प्रा. विश्वनाथ आवड	35
• मन करा रे प्रसन्न	डॉ. मनीषा भोजकर	37
• चाकोरी बाहेरून चालताना	केदार ढेपे	40
• नकोशी	चारुलता राठी	43
• पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्यक्ष कृतीची गरज	डॉ. प्रकाश सावंत	47
• मनबुद्धीची साकडी	अनुराधा भागवत	51
• यांच्यातील उर्जेला सलाम	महेश रायखेलकर	54
• हॉस्पिटल उभारणीचा संघर्ष	विक्रांत बापट	56
• जिद्द	रीमा गुमास्ते	60

काव्यसुमन

• सुख वेचता आलं पाहिजे	आश्लेष माडे	67
• मानवरूपी राजहंस	नारायणजी गौपाले	68
• स्वप्नांच्या मागे लाग	अश्विनी स्वर्ण	69
• ताडोबा	मयुरी कोडमलवार	70
• प्रकाशमय बिरादरी	अमित भांडे	71
• आमचा बाबा	प्रदीप कासुर्डे	72
• समर्पित	निलेश येते	73
• डोळे उघडणारे स्वप्न	धम्मदीक्षा चांदेकर	74
• कर्तव्यनिष्ठा	साधना पोहरे	77
• शब्दरचना	मयुरेश कुलकर्णी	78

चित्रांकन

अंकामध्ये छापण्यात आलेले सर्व लेखांचे मालकी हक्क मूळ लेखकांकडे असतील, लेखातील लिखाणाचे अथवा विचारसरणीचे लोक बिरादरी प्रकल्प, समर्पित बिरादरी विशेषांक मंडळ, संपादक समर्थन करत नाही. लिखाणासाठी लेखक स्वतः जबाबदार असेल.

प्रस्तावना

हेमलकसा येथील लोक बिरादरी प्रकल्प २३ डिसेंबर २०२२ रोजी ५० व्या वर्षात पदार्पण करीत आहे. आदिवासी विकासासाठी झटलेल्या अनेक कार्यकर्त्यांची कर्मभूमी असणारा हा प्रकल्प इतका मोठा आणि नावारूपास येईल हे स्व. बाबा व स्व.सौ.साधना ताई तसेच डॉ.प्रकाश व डॉ.मंदाकिनी आमटे यांना सुद्धा कधीच वाटले नाही. मागे वळून बघतांना ५० वर्षात काय काय घडले हे आठवायचे झाले तरी त्यांना फार काही आठवेल असे वाटत नाही. आलेल्या पेशंट वर मनापासून उपचार करणे आणि तो बरा झाला कि पुढचा पेशंट हाच ध्यास. तेंव्हा पासून सातत्याने आरोग्य सेवा एकही दिवस दवाखाना बंद न ठेवता प्रकल्पात सुरु आहे. १९७६ पासून शैक्षणिक सेवा सुद्धा अखंडपणे सुरु आहे. काळानुसार आरोग्य सेवेत आणि शैक्षणिक सेवेत अद्ययावत बदल करण्यात आले आहेत. शिक्षणामध्ये वैविध्य आणले आहे. गेली २० वर्ष आम्ही सुद्धा या प्रकल्पात कार्यकर्ते म्हणून काम करतोय. प्रकल्पामध्ये असलेल्या सर्व जुन्या इमारतींचे आधुनिकीकरण आम्ही केले. शाळेची इमारत, दवाखान्याची इमारत, कार्यकर्त्यांची निवासस्थाने आणि पाहुण्यांसाठी गेस्ट हाऊस सर्व काळानुसार बदलले आहे.

भयानक असा कोरोना काळ संपला आणि सर्व पूर्ववत होत असतांना डॉ.प्रकाश आमटे यांना ८ जून २०२२ रोजी ब्लड कॅन्सर झाल्याचे निदान झाले. आम्हा सर्वांसाठी मोठा धक्का होता तो. पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात त्यांच्यावर ३ महिने उपचार चाललेत. बाबांसाठी आणि आम्हा सर्व कुटुंबियांसाठी तसेच पूर्ण लोक बिरादरी प्रकल्पासाठी हा काळ खूप चढ उताराचा होता. आपल्या सारख्या शुभचिंतकांच्या प्रार्थनेला व डॉक्टरांच्या उपचाराला यश मिळाले आणि बाबा त्यातून बाहेर पडले. त्यांच्यावर उपचार करणाऱ्या सर्व डॉक्टरांचे, दवाखाना स्टाफचे, पुण्यात असताना मदत करणाऱ्या सर्वांचे व जगभरातून शुभेच्छा देणाऱ्या जनतेचे आम्ही सगळे ऋणी आहोत.

समर्पित बिरादरी या वार्षिक अंकाचे हे ३ रे वर्ष आहे. अनेक लोकांनी यासाठी लेख, गोष्टी, कविता, चित्रे इत्यादी साहित्य पाठविले आहे. सर्वांचे आभार. संपादक मंडळाने निवडलेले निवडक साहित्य यात प्रकाशित करण्यात आले आहे. सर्वांनी वाचनाचा आनंद घ्यावा.

इंग्रजी नवीन वर्षाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा. Happy New Year 2023

-अनिकेत आमटे
(संपादक – '**समर्पित बिरादरी** ')

शब्दसाठवण

वन्यप्राण्यांची अद्भूत संपर्क प्रणाली

विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे आपण केंव्हाही एकमेकांशी प्रभावीपणे संवाद साधू शकतो. चांगल्या विकसित टेलिकम्युनिकेशन सुविधांच्या मदतीने हे शक्य आहे. तथापि आम्हाला याकरिता विद्युत पुरवठा, नेटवर्कचे योग्य कव्हरेजची उपलब्धता इत्यादी अनेक बाबींवर अवलंबून रहावे लागते.रुकावट के लिये खेद है ,याचा बरेचदा अनुभव येतो.

आधुनिक तंत्रज्ञानाशिवाय वन्यजीव एकमेकांशी संवाद साधतात. त्यांच्या संपर्क प्रणालीमध्ये कोणतेही अपयश व रुकावट नसते कारण त्यांना प्राप्त झालेली ही निसर्गाची देणगी आहे. त्यांच्याकडे स्वत:ची संपर्कप्रणाली असल्याने ते एकमेकांची उपस्थिती जाणवू शकतात. वातावरणातिल आवाजद्वारे,गंधाद्वारे, खुणापाहुन व वन्यप्राण्यांच्या इशाऱ्या द्वारे तसेच एकमेकांना बघून ते एकमेकांचे अस्तित्व ओळखतात. जंगलात रुकावत म्हणजे साक्षात मृत्यू. प्रत्येक वन्यप्राणी स्वतःचे कार्यक्षेत्र तयार करतात. मांसाहारी वन्यप्राण्यांचे कार्यक्षेत्र खूप मोठे असते.

प्रदेशाच्या सीमांकनासाठी वन्यजीवांची स्वत: च्या पद्धती असतात. विशेषतः मांसाहारी वन्यप्राणी झाडाच्या खोडांवर खुणा करून, गंधाचा स्राव करून तसेच लघवी द्वारे आपले क्षेत्र निश्चित करतात. यामुळे त्यांच्या अस्तित्त्वाची कल्पनाइतर प्राण्यांना होते. कार्यक्षेत्र निवडताना सुरक्षित क्षेत्र निवडतात. याक्षेत्रात शांत वातावरण,लपण्याच्या सुविधा,भरपूर भक्ष उपलब्धता, बारमाही चारापाणी अश्या प्राथमिक मूलभूत गरजा याला प्रथम प्राधान्य दिलेले असते. या क्षेत्रात त्याचेच राज्य असते व मांसाहारी वन्यप्राणी नियमित आपले कार्यक्षेत्र आबादीत ठेवतात त्याच वर्गातील नर प्राणी सहसा या क्षेत्रात प्रवेश करीत नाहीत.मादींना मात्र प्रवेश असतो. याच क्षेत्रात सहसा त्यांचे मिलन होते. जागा पूर्ण सुरक्षित असते व प्रजनन सुद्धा अश्याच सुरक्षित क्षेत्रात होते. वाघ अश्याच जागेची निवड करतात.संपर्काची आश्चर्यकारक पद्धती वन्य प्राण्यांनी विकसित केल्या आहेत. याचे विस्तृतपणे वर्गीकरण केले जाऊ शकते: ध्वनिक (ध्वनी) सिग्नल, ऑप्टिकल (व्हिज्युअल) सिग्नल,व ओल्फॅक्टरी (गंध) सिग्नल.

१. **ध्वनिक सिग्नल:(Sound)-**

वन्यजीवांनी स्वीकारलेल्या संवादाची ही एक सामान्य पद्धत आहे आणि त्यात ध्वनीचा समावेश आहे. ते अलार्म किंवा चेतावणी सिग्नल देतात व याला कॉल असे म्हणतात. हे कॉल आपण जंगलात नेहमीच ऐकतो .कॉल किंवा इशारे एकसारखे नसतात. साधारण कॉल,धोक्याचा कॉल, धोका नसल्याचा कॉल व मिलन कॉल. हे सर्व कॉल ओळखता येतात. या कॉल द्वारेच वन्यप्राणी जवळ आहे की दूर हे ओळखता येते. जंगलातील प्रत्येक वन्यप्राणी असे कॉल देऊन सर्वांना सावध करत असतात. सांबर व चितळ मनुष्य दिसल्यास एकदाच कॉल करतात परंतु भक्षक दिसल्यावर मात्र सतत कॉल करून एकमेकांना सतर्क करतात. उदाहरणार्थ, माकडे आणि चितळ सहसा जंगलात एकत्र राहतात. यांची मैत्रीतर पाहण्या सारखी आहे. दोन विभिन्न वन्यप्राणी एकत्र नेहमीच दिसतात. वानर झाडावर बसून गस्त घालण्याचे काम करतात आणि हरीणांना पाने, फळे इत्यादी तोडून पुरवतात. माकड जरी झाडावर बसले असते तरी त्याचे सभोवताल पूर्ण लक्ष असते. सदैव सावध असते. तसेच उंचावरून त्याला दुरचे स्पस्ट दिसते. धोका दिसला तर आवाजद्वारे सर्वांना धोक्याची सूचना देतात. माकडे आणि हरिण हे सामाजिक प्राणी आहेत आणि समूहात राहतात. प्रत्येक गटात एक नर नेता असतो (वर्चस्ववादी किंवा अल्फा नर . म्होरक्या नराचे कॉल मोठ्या आवाज करून असतात.प्रबळ नर त्या गटाला इशारा देण्यासाठी आपली शेपटी देखील फिरवतो. हे वन्य प्राण्यांच्या संप्रेषणाची

ध्वनीविषयक आणि दृश्य प्रणालीचे खरोखर चांगले उदाहरण आहे.वाघ आणि सिंह त्यांच्या स्वतःच्या प्रदेशात गर्जना करतात आणि ही गर्जना 7-8 कि.मी. अंतरावरुन ऐकू येते. प्रत्येक वन्यप्राण्यांची पाणी पिण्याची विशिष्ट पद्धत असते.

प्रथम खालील जबडा पाण्यात बुडवतात व जीभेचा आकार चमच्यासारखा करून पाणी तोंडात ढकलतात. यासर्व वेगवेगळया वन्यप्राण्यांचे पाणी पिण्याच्या सवयीमुळे पाण्याच्या पृष्ठभागावर होणाऱ्या आवाजामुळे कोणता वन्यप्राणी पाणीपित आहे हे इतर वन्यप्राणी ओळखतात. जंगलात वन्यप्राण्यांना एकच माहीत असते की येथे कमजोर प्राण्याला स्थान नाही. यामुळे बरेच वेळा नर वाघांमध्ये कार्यक्षेत्रा साठी संघर्ष होतो व जो जिता वो सिकंदर.

२.**व्हिज्युअल (ऑप्टिकल) (डोळयांनीपाहून)-**

आजूबाजूच्या वनस्पती चिन्हांकित करून वन्य प्राणी त्यांची उपस्थिती व कार्यक्षेत्र आखतात आणि अशा प्रकारे आपल्या प्रदेशाची दृष्यदृष्ट्या घोषणा करतात. हे सहसा नखे, शिंगे, व दात यांच्या मदतीने केले जाते. जंगली शाकाहारी प्राणी वनस्पती झाडाची साल काढतात काही दिवसांनी हा भाग पांढरा होतो. अस्वल झाडावर पंज्याद्वारे ओरबाडून नखाद्वारे खुणा करतात.

अस्वल आणि गवे आपल्यामूत्रात लोळतात आणि पाठी द्वारे केलेल्या खुणांवर,चिन्हावर घासतात. हरीण आणि रानडुकर त्यांनी केलेल्या खुणांवर चिखल लेपतात आणि लघविद्वारेपृष्ठभाग चिन्हांकित करताना .क्षेत्राचा दावा करण्यासाठी, कुरणाच्या जमीनीचा दावा करण्यासाठी काळवीट उंच भागात उभा राहून हे क्षेत्र त्याचे आहे हे इतर वन्यप्राणी यांना दर्शवतो. वाघ आणि बिबट्या झाडांवर, जमिनीवर आणि आपल्या वाटेवरील खडकावर देखील पंज्याच्या खुणा करतात. तसेच मूत्राद्वारे आणी गुददद्वारा तील ग्रंथी द्वारे फवारा मारून आपले कार्यक्षेत्र आखतात. तसेच नियमित या क्षेत्रात पुन्हा गंधद्वारे पुनर्जीवित करतात.नर वानर त्यांचे जननेंद्रियाचे अवयव इतरांकडे प्रदर्शित करतात, शेपटी हलवत आपल्याकडे आकर्षित करतात आणि आक्रमक वर्तन दर्शवितात. धोका दिसल्यास तृणभक्षी वन्यप्राणी खुर जमिनीवर आपटतात.पक्षी सुद्धा एकमेकांना सतर्क करतात. साप किंवा भक्षक प्राणी दिसल्यास कर्कश्य आवाजात धोक्याची सूचना देतात.

३. **घाणेंद्रियाचा (गंध) सिग्नल-**

वन्यजीवा मधील संप्रेषणाची आणखी एक सामान्य पद्धत म्हणजे सुगंधित चिन्ह. हे लघवीद्वारे आणि शरीराच्या गंधाद्वारे तयार करतात.हजारो वर्षांपासून कुत्रा जरी माणसाळलेला असला तरी लघवी आणि चिन्हांकित करण्याची पद्धत आजही वन्यप्राणी सारखीच आहे. कोल्हे, रानकुत्रे आणि लांडगे एका विशिष्ट जागी नियमितपणे गटात लघवी करतात. अशा प्रकारे मूत्रातील गंधद्वारे त्या भागात आपले अस्तित्व दर्शवतात. मूत्रास गंध असतो व याद्वारे ते इतर प्राण्यांना त्या विशिष्ट

भागात त्यांच्या उपस्थितीबद्दल संकेत देतात. माकड आपल्या पुढील पायांवर लघवी करतात आणि नंतर इतर पायावर चोळतात यानंतर मूत्र गंध झाडाच्या फांद्यांवरून चालत जाऊन पसारवितात आणि मूत्राचा व त्वचेवरील ग्रंथीच्या गंधात मिसळली जाते. विविध वन्य प्राण्यांमध्ये सुगंध एक ओळख चिन्ह म्हणून देखील काम करते. घाणेंद्रियाच्या सिग्नलसाठी विष्टेचासुद्धा वापर केला जातो. कुत्रा आणि मांजरीच्या कुटुंबातील सदस्यांकडे गुदद्वारामधील सुगंधित ग्रंथी चांगल्या विकसित असतात. पुष्कळ प्रकारच्या त्वचेच्या ग्रंथी शरीराच्या वेगवेगळ्या भागांवर असतात जसे की शेपटीचा झेंडा, पोट, डोके, शिंगे आणि antler वरील मखमल इ. चितळ आणि सांबर झाडाच्या गुळगुळीत शाखेवर किंवा छोट्या झाडाच्या बुंध्यावर आपले मखमल (Velvet) असलेले शिंग घासून गंध मागे ठेवतात. सुगंधित ग्रंथी देखील डोळ्यांखाली असतात (Preorbital glands)Antelop जसे काळवीट मध्ये या ग्रंथी डोळ्यासमोरअसतात.

प्रदेशाच्या सीमांकनासाठी, या ग्रंथींमध्ये काट्यांचा, गवत किंवा छोट्या डहाळ्या घातल्या जातात. यामुळे ग्रंथीचा गंध यावर येतो। शिंगांच्या मागे सुगंधित ग्रंथी देखील असतात आणि अशा प्रकारे एखाद्या झाडाच्या फांदीवर शिंगे घासून, प्रदेश चिन्हांकित केले जाते. हा सुगंध(ओल्फॅक्टरी सिग्नल) प्रजनन हंगामात खूप महत्वाची भूमिका निभावतो.आणि इतर आपल्याच समूहातील प्राण्याना गंधाद्वारे संदेशपाठवून एकमेकांकडे आकर्षित करतो।या सेक्स फेरोमोनचे (Pheromones) रासायनिक स्वरूप डिकोड केले गेले आहेत. त्यापैकी मादी मध्ये कोपुलिन (Copulin), एक आकर्षक परफ्यूम आहे. हे परफ्यूम संभोगासाठी नरास आकर्षित करते आणि पुढे उत्तेजित करते. ऑप्टिकल, ओल्फॅक्टरी आणि ध्वनिक सिग्नल हे सर्व मिलन उद्देशाने वापरले जातात.साधारणपणे वाघ,बिबट व रानकुत्रे ठराविक ठिकाणी गंधाचा फवारा सोडतात.संघर्ष टाळण्यासाठी आणि जंगलराजमध्ये शांतता व सुसंवाद राखण्यासाठी वन्य प्राणी आपली उपस्थिती दर्शवितात आणि जंगलातील विविध सिग्नलद्वारे आपला प्रदेश चिन्हांकित करतात. या खुणांद्वारेंच व गंधा द्वारेच मांसाहारी वन्यप्राणी एक जंगलातून दुसऱ्या जंगलात जातात. ह्या खुणा व गंध पाऊस व उन्हामुळे कमी होत नाही हाच निसर्गाचा अद्भुत चमत्कार आहे. यामुळेच आपण वर्तमानपत्रात वाचतो की वाघ आपल्या मूळ स्थानावरून 300किलोमीटर दूर गेला. रेडिओ कॉलर मुळे हे ओळखता येते. आज खरी गरज आहे ,हे अद्भुत विश्व अजून उत्तम कसे होईल याची. आपला सर्वांचा सहभाग यात अपेक्षित आहे.हा निसर्ग, जंगले ,वन्यप्राणी व भूगोल वाचवणे हे आपल्या सर्वांचेच कर्तव्य आहे. हे काम आता फक्त वनविभागाचे नाही तर आपल्या सर्वांचं यात योगदान पाहिजे.

वनपर्यटनास जातांना नियमांचे कटाक्षाने पालन करणे आपले आद्य कर्तव्य आहे. आपल्यामुळे वन्यजीवांना अपाय होईल असे कृत्य करू नये. पर्यटक बरेचदा वाघाच्या जवळ जीप नेतात व त्याकरिता चढाओढ करतात हे धोकादायक ठरू शकते. आपल्या अश्याच वागणुकीने वन्यजीवांच्या स्वभावात फरक पडू शकतो. निसर्गाचा अवश्य आनंद लुटा पण

वन्यजीवांना त्रास न देता.रंगीबेरंगी कपडे व अत्तर लावून जाऊ नका. मधमाश्यांचा त्रास होऊ शकतो. हा अनमोल ठेवा पुढल्या येणाऱ्या पिढीसाठी जपून ठेवा. हा भूगोल वाचला नाही तर आपणसुद्धा इतिहासजमा होऊ.

सर्व वनविभागातील अधिकारी, सहयोगी व कर्मचाऱ्यांचा मी मनःपूर्वक आभारी आहे कारण मला बऱ्याच गोष्टींचे ज्ञान आपल्या सर्वांकडूनच मिळाले.

Save nature,
Save wildlife.
जयहिंद।

****

®© डॉ अ द खोलकुटे
संपर्क – 9822718291

लोणार : अध्यात्म आणि विज्ञान ह्यांची विलक्षण अनुभूती

बुलढाणा जिल्ह्यातील पर्यटन आणि प्रेक्षणीय स्थळे यांचा विचार करता सामान्य माणसाच्या जनजीवन याप्रमाणेच प्रचंड उलथापालथ झालेली दिसून येते. बुलढाणा जिल्ह्यामध्ये प्रेक्षणीय स्थळ म्हणून सर्वात जास्त प्रसिद्ध काही असेल तर ते म्हणजे लोणारचे सरोवर हे होय. लोणार येथे साधारण पन्नास हजार वर्षापूर्वी ही उल्का कोसळली असावी असा पूर्वी समज होता मात्र अरगॉन डेटिंग पद्धतीने सरोवर निर्मिती साडेपाच लाख वर्षांपूर्वी तयार झाले असे आता सिद्ध झाले आहे. जवळपास 70 मीटर रुंदीची 20000 किलोपेक्षा जास्त वजनाची भली मोठी उल्का साधारणपणे बहात्तर हजार किलोमीटर प्रति तास या प्रचंड वेगाने पडल्याने व त्याचवेळी तिच्या प्रचंड वेगाने पृथ्वीच्या गाभ्यामध्ये होणाऱ्या आंतरिक घडामोडींमुळे ज्वालामुखीचा उद्रेक झाल्यामुळे जवळपास दोन किलोमीटर व्यासाचे व दोनशे मीटर खोलीचे सरोवर तयार झाले मात्र या भल्यामोठ्या दगडामुळे ज्वालामुखी बाहेर पडला नसावा तो आपल्या आत राहिला असावा असेही शास्त्रज्ञांना वाटते. या सरोवराचा परिघ सहा किलोमीटर लांब इतका आहे सरोवराचे पाणी खारट आहे मात्र या सरोवराच्या आतील विहिरींना गोड पाणी लागते हा एक नैसर्गिक चमत्कार आहे. बेसॉल्ट ह्या खडकातील तयार झालेल्या मोजक्या सरोवरपैकी लोणार सरोवर हे एक आहे. चंद्रावरील विवरात तपकिरी काचमणी म्हणजे दगड सापडतात त्यांना टेकटाइस असे म्हणतात, टेकटाइस मध्ये 75% सिटी कार आणि इतर प्रमाणात ॲल्युमिनियम पोटॅशियम आणि मॅग्नेशियम असे घटक असतात. तसे अनेक दगड लोणार सरोवर परिसरामध्ये आढळतात. ही महाकाय उल्का पडत असताना फुटून तिचा एक मोठा तुकडा उत्तरेला सातशे मीटर अंतरावर जावून आदळला त्यामुळे तीनशे मीटर त्याचे एक तळे तयार झाले त्याला अंबर तळे असे म्हटले जाते. लोणार सरोवर मध्ये अल्कली गुणधर्म असून येथील मातीमध्ये चुंबकीय गुणधर्म आढळतात.

सन 1823 मध्ये सी जी ई अलेक्झांडर यांनी हे सरोवर आणि इतर उल्कापातामुळे घडून आलेले जीवन यात साम्य असावे असे सांगितले आणि जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया या संस्थेची स्थापना झाल्यावर गिलबर्ट यांनी 1896 मध्ये ते सत्य असल्याचे दाखवून दिले. अग्निजन्य खडका मध्ये असलेले हे सरोवर आजही शास्त्रज्ञांना आवाहन करीत असते असे म्हणावे लागते.

ऋग्वेदा मध्ये सुद्धा लोणारचा संदर्भ पहायला मिळतो. पौराणिक आख्यायिकेनुसार भगवान विष्णूनं दैत्यसूदन रूप घेऊन लवणासूर नावाच्या राक्षसाचा वध केला होता. या राक्षसाच्या नावावरूनच या परिसराला लोणार असं नाव पडलं. ब्रिटिश राजवटीमध्ये जे. ई. अलेक्झांडर यानं तर या सरोवराची नोंद केलीच आहे. त्याचबरोबर आईन ए अकबरी (अकबरनामा) ग्रंथामध्ये साबण तयार करण्यासाठी जंतुनाशक म्हणून लोणार येथील क्षारांचा वापर करण्यात येत असे असे नमूद केलेले दिसून येते, पद्मपुराण आणि स्कंदपुराणातही या विवराचा उल्लेख आढळतो. प्राचीन ग्रंथांमध्ये त्याचा उल्लेख विराजतीर्थ किंवा बैरजतीर्थ असा करण्यात आला आहे. मालती माधव ह्या पुरातन ग्रंथामध्ये शुद्ध रजोगुण रहित म्हणजे विरज असा उल्लेख असून तो लोणार येथील धारातीर्थ साठी वापरला गेला आहे.

अखंड वाहत राहणारी लोणारची धार हे एक आश्चर्य मानले जाते. गोमुखातून पडणाऱ्या या धारेचा उगम शोधण्याचा अनेकांनी प्रयत्न केला मात्र तो सापडला नाही मध्यंतरी शास्त्रज्ञाने कॅमेरा या धारेतून सोडता तर तो 18 ते 19 किलोमीटर अंतरापर्यंत गेला पुढे गेला नाही असे सांगितले जाते. कपिला तीर्थ म्हणून प्रसिद्ध असलेली ही धार थेट काशी तीर्थ घेऊन येते असा अनेक भाविकांचा समज असला तरी 19 किलोमीटर अंतरावरून भूगर्भातून सायफन तत्त्वाने हे पाणी येत असते हे लक्षात घेतले पाहिजे. स्कंध पुराणात प्रसिद्ध असलेल्या ह्या धारेचे पाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या वेळी वापरले गेले असावे असाही दावा काही लोक करतात.

यादव राजे कृष्णदेवराय यांनी स्वामी चक्रधरांची महती ऐकून मेहकर आणि लोणार परिसरात फिरणाऱ्या चक्रधराचा शोध घेतला व त्यांच्या समोर शंभर सुवर्णमुद्रा ची थैली भेट म्हणून दिली. चक्रधरांनी ती भेट नाकारली आणि राजानेही पुन्हा दिलेले दान परत घ्यायचे नाही म्हणून सध्या अस्तित्वात असलेला धारे जवळचा घाट बांधला. धारे समोरील वडाच्या झाडाजवळ असलेल्या जागेमध्ये चक्रधर आणि त्यांचा शिष्यगण राहत असे. चक्रधर आणि महदंबा मेहकर वरून पंढरपुर साठी आषाढी वारी करत असत. लोणार मध्ये चक्रधर स्वामींची अकरा आसन आहेत. धारातीर्थ जवळ सभागृहांमध्ये दुसरी पायरी, ब्रह्मकुंडाच्या पूर्वेस, कुमारेश्वर मंदिराच्या सभागृहात, कमळजा देवीच्या गाभाऱ्यात, भैरवाचा मंदिरासमोर, सरोवराच्या शेजारी असणाऱ्या वडाच्या झाडाखाली, दैत्यसूदन मंदिराच्या सभागृहात, स्त्री-पुरुष मठात, दैत्यसूदन मंदिराच्या मागे असलेल्या एका

उद्ध्वस्त मंदिरात चक्रधर राहत असत बसत असत हे सुद्धा या ठिकाणी लक्षात घेणे गरजेचे आहे. लोणारमध्ये सरोवरात पायऱ्यांनी उतरल्यानंतर हेमांडपंथी पश्चिमाभिमुख रामगया मंदिर आहे. तीन प्रवेशद्वार असलेल्या मंदिरात रामाची मूर्ती असून, बाजूलाच श्रीरामेश्वर मंदिर आहे. या मंदिराच्या समोरच रामकुंड दिसून येतो.

थोडे खाली उतरले की, स्वच्छ व शुद्ध पाण्याचा रामगया नावाने प्रसिद्ध असलेला झरा आहे.रामगया मंदिरामध्ये राम लक्ष्मण सीता ह्यांच्या मुर्त्या असून गर्भगृह दारावर हनुमान आहे.

राम-लक्ष्मण-सीता हे दंडकारण्यात लोणार हुनच पुढे नाशिकला गेले असे म्हटले जाते. पापहरेश्वर मंदिर एक महत्त्वाचे मंदिर येथे आहे. तेथे सुद्धा धार आहे मात्र धारातीर्थ प्रमाणे ती अखंड वाहत नाही. पापरेश्वर मंदिराच्या कमानीवर सुंदर नक्षीकाम असून येथे दगडाचे नाव कोरलेले आहे. मुख्य शिवलिंगाच्या भोवती चार छोटे शिवलिंग असावेत असे चार खड्डे दिसून येतात. निजामाच्या काळात मंदिराची बरीच तोडफोड झालेली आहे कदाचित त्यावेळी त्यांचे नुकसान झाले असावे असे वाटते. दैत्यसूदन मंदिरातील दैत्यसूदनाचे माणिक असलेले डोळे सुद्धा त्यावेळी लुटले गेले असावे. पापहरेश्वर मंदिर होळसाय राजांच्या राजवटीत बांधले गेले.

हातामध्ये कमळ आणि राजदंड तसेच पायात पादत्राणं असलेली सूर्याचे शिल्प अंबरखाना मंदिरात ठेवलेली असून सत्यवान सावित्रीची कथा या ठिकाणी घडली होती असेही म्हटले जाते. हटकेश्वर हे हटयोगी लोकांचे प्रेरणास्थान असलेले मंदिरही येथे आहे.

लोणार शहरात दैत्यसूदन मंदिर हे पर्यटकांना आकर्षित करणारे ठिकाण आहे. लवणासुराचा वध करणाऱ्या विष्णूचा म्हणजे दैत्यसूदनाचा (एका आख्यायिके नुसार रामायण काळात रामाचा बंधू शत्रुघ्न ह्याने लवणासुराचा वध केला असे समजले जाते) गौरव करण्यासाठी हेमाडपंती पद्धतीचं हे मंदिर, विक्रमादित्य राजाने ते अकराव्या/बाराव्या शतकांच्या दरम्यान बांधले असे समजले जाते. मंदिरातील मूर्ती लवणासुराचा वध करणाऱ्या विष्णूची असून ती दगडी असली, तरी त्यात धातूचा अंश मोठ्या प्रमाणात आहे. मध्यकालीन स्थापत्यशास्त्राचा हा अप्रतिम नमुना आहे. मंदिरामध्ये अनेक सुंदर शिल्प आहेत. मंदिराच्या मागे सूर्याची प्रतिमा आहे. हे मंदिर १०५ फूट लांब आणि ८४.५ फूट रुंद आहे. गर्भगृह, अंतराळ आणि सभामंडप, असे मंदिराचे तीन

प्रमुख भाग आहेत. अंतराळ भागात पौराणिक कथांवर आधारित प्रसंग कोरण्यात आले आहेत. लवणासूर वधाचा प्रसंगही त्यात आहे, कश्यप ऋषींच्या दिती नावाचा बायकोपासून लवणासुराचा जन्म झाला होता. त्याला गयासुर आणि कोल्हासूर नावाचे दोन भाऊ होते. तसेच आषाढा आणि कऱ्हाडा नावाच्या दोन बहिणी होत्या. गर्भगृहातली सध्याची मूर्ती नागपूरच्या भोसले राजघराण्यातर्फे बसवण्यात आली आहे. दैत्यसूदन मंदिरावर अनेक दगडी शिल्पासोबत खजुराहो प्रमाणे काही मैथून शिल्प कोरलेली आहेत. सोबतच विष्णूचे वराह नरसिंह आणि मोहिनी अवतार दाखवणारे काही शिल्प आढळून येतात. 1878 मध्ये लोणार शहरातील मध्यावर असणाऱ्या मातीच्या उंच टेकडीचे उत्खनन करण्यात आले त्यावेळी त्या उत्खननामध्ये हे मंदिर सापडले. दैत्यसूदन मंदिर हे चालुक्य राजा दुसरा विक्रमादित्य ह्याची पत्नी लोकपाल देवी यांनी त्रिभुवन कीर्ती या शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली बांधले आहे. असे मंदिर कर्नाटकातील बेलूर येथे चेन्नाकेशव मंदिर म्हणून प्रसिद्ध आहे.

सीतान्हानी म्हणून प्रसिद्ध असलेले एक ठिकाण लोणार सरोवर आत खाली उतरत असताना दिसून येते. राम लक्ष्मण आणि सीता यांच्या वनवास काळात त्यांच्या भटकंतीमध्ये त्यांचा मुक्काम या ठिकाणी असावा अशी आख्यायिका याठिकाणी सांगितली जाते. विदर्भामध्ये इतरही काही ठिकाणे सीतान्हानी म्हणून काही जलस्त्रोत प्रसिद्ध आहेत त्यावरून जर रामायणाची कथा सत्य समजले तर त्यांचा प्रवास मार्ग हा असावा असे म्हणता येते.

लोणार येथील भोगवती कुंडामध्ये रामाने स्नान केले आणि पांडव काळात धर्मराजाने त्याच्या वडिलांचे साध्य केले असे म्हटले जाते. शुक्राचार्याची वेधशाळा जिला नाभी तीर्थ असे म्हटले जाते हे एका प्राचीन वेधशाळा होती असे म्हटले जाते.याबाबत राक्षसांचे गुरु शुक्राचार्य त्यांचा अधिवास लोणार आणि मेहकर या भागात होता की काय याबाबत संशोधन होणे गरजेचे आहे. कारण शुक्राचार्याची वेधशाळा मेहकर मध्ये सुद्धा दगडाच बांधकाम असलेली आणि भग्नावस्थेत सापडते, शुक्राचार्यांच्या वेधशाळेचे जवळ याज्ञवल्केश्वर ह्या आयुर्वेद तज्ञाचे वनस्पतीचा अभ्यास करून औषध निर्माण करणाऱ्या भट्टीतील राखेची भस्म टेकडी आहे. आजही अर्ध डोकेदुखी चे दुखणे निवारण्यासाठी लोक येथील राखेच्या चकत्या वापरतात, झोपलेला भद्रामारुती किंवा मोठा मारुती या नावाने सध्या जाणारे मारुती चे मंदिर लोणार धारेपासून दोन तीन किलोमीटर अंतरावर मातमळ या गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर दिसून येते. येथे असलेली मारुतीची मूर्ती चुंबकीय गुणधर्म

असलेली असून ती चुंबकीय दगडापासून तयार झालेली आहे. सुरुवातीला अनेक वर्ष आडवी असलेली ही मूर्ती आता उभी करण्यात आली आणि तिच्यावरील शेंदूराचा लेप बाजूला केला असून आता काळ्या चुंबकीय पाषाणात असलेली ही सुंदर मूर्ती समोर आली आहे. मूर्तीच्या एका पायाला नागाचा वेढा असून दुसऱ्या पायामध्ये कडे आहे. मारुतीच्या पाया खाली नेहमी आढळते तशी शनीची मूर्ती असून आणखी एक मूर्ती तेथे आहे ही मूर्ती पाताळ देवीची आहे असे गावकरी सांगतात, हे मंदिर 1865 मध्ये निजामाचे दिवाण राजा चंदूमल यांनी बांधले.

अगस्ती तीर्थ, हटकेश्वर, नारदेश्वर, औदुंबर तीर्थ इत्यादी मंदिरे प्रेक्षणीय आणि उत्कृष्ट बांधकामाचे नमुने आहेत. साधारण सर्व बांधकाम हे दगडांमध्ये असून यादवकालीन बांधकामाचे पडसाद त्यावर उमटले आहेत. पुराणांमध्ये सुद्धा विराज तीर्थक्षेत्र किंवा बैरज क्षेत्र म्हणून लोणारचा उल्लेख आढळतो.धारा तीर्थाचे पाणी वाहत सरोवरामध्ये जाते, धारा तीर्थासमोरच तळयाच्या आत कमळजा देवीचे मंदिर असून कपिला तिर्था पासून दोन्ही बाजूने सारख्या अंतरावर सरोवराच्या काठावर कमळजा देवीचे मंदिर आहे. हे मंदिर अष्टकोनाकृती असून वरील भाग गोलाकार आहे. या मंदिराच्या समोर सौभाग्य तीर्थ किंवा सासू सुनेची विहीर म्हणून एक विहीर आहे या विहिरीचे मंदिराकडील अर्धे पाणी गोड असून दुसऱ्या अर्ध्या भागातील पाणी खारट आहे हे विशेष. या मंदिरातील व्हरांड्यात चुंबकाची सुई दिशाहीन होते हा भौगोलिक चमत्कार आहे.

सम्राट अशोकाच्या राज्याचा लोणार एक भाग होते. गुप्तराजांच्या काळात गुप्त राजांचे जावई वाकाटक ह्यांनी येथे राज्य केले. त्याशिवाय सातवाहन, राष्ट्रकूट, होयसाय या राजसत्तांनी सुद्धा लोणार शहरावर राज्य केले आहे. धारेच्या उत्तरेला पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या काळातील खंडोबाचे मंदिर असून अहिल्याबाईंनी बांधलेले अन्नछत्र सुद्धा लोणार मध्ये आहे. याठिकाणी गोरगरीब लोकांना अन्न वाटप केले जायचे.

लोणार शहरात हिंदू मंदिरांसह जैन मंदिरे, बुद्ध विहार, दर्गा इत्यादी आढळून येतात.लोणार येथे खऱ्या अर्थाने भारतीय संस्कृतीचे दर्शन घडून येते. त्याच वेळी आकाशगंगा, भूगोल, विज्ञान यातील विविध चमत्काराचे दर्शन जवळून होते. सरोवरातील पाण्यात नील-हरित शेवाळ, शेवाळामुळे पाण्याचा गुलाबी होणारा रंग असे काही विलक्षण अनुभव आपण सातत्याने घेत असतो. लोणार सरोवर परिसरात विविध औषधी वनस्पती आढळतात. त्याशिवाय दुर्मिळ अशी लतावेली आणि वृक्षसंपदा सरोवर परिसरात दिसून येते. लोणार परिसरामध्ये वेगवेगळया प्रजातीचे 50 पेक्षा अधिक पक्षी पर्यटकांना साद घालत असतात. बिबट्या सह इतर काही जंगली प्राणी सुद्धा लोणार अभयारण्यात आढळून येतात. काही लोकांच्या मते अशनीपातामुळे तयार झालेला प्रचंड खड्डा इतकीच ओळख असलेले लोणार खऱ्या अर्थाने वैज्ञानिक आणि सांस्कृतिक तसेच आध्यत्मिक बाबींचा अभ्यास करणाऱ्या साठी एकाच ठिकाणी उपलब्ध असणारे मोठे ज्ञानस्तोत्र आहे अश्या भूमिकेतून आपण लोणारचा अभ्यास दौरा काढून निरीक्षण केले पाहिजेत. हा संपूर्ण परिसर सध्या महाराष्ट्र राज्य वन विभाग आणि महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभाग यांच्या अखत्यारीत असून अजून अनेक रहस्य लोणारच्या सरोवरात आणि पाण्यात दडलेली असून त्यांच्यावर अभ्यास होणे गरजेचे आहे.

****

®© किरण शिवहर डोंगरदिवे
मु.पो - मेहकर, बुलढाणा
मो- 7588565576
(फोटो सौजन्य - शरद वानखेडे, मेहकर)

माहेरचा आहेर

माहेरकडचं लग्न म्हटलं की स्त्री एका वेगळ्या, अनोख्या आनंदात असते. तेही बहिणीचं मग काय! आणि चुलत असली म्हणून काय झालं! कारण माहेर हे चुलत माहेर वगैरे कधीच नसतं, ते फक्त माहेर असतं. त्यामुळे संमिश्र भावनांचा कल्लोळ माजलेला असतो. घरातली सगळी कामं सोप्पी वाटायला लागतात. कामं करण्याचा वेग काहीसा वाढलेला असतो. मन कितीतरी आधीपासूनच माहेरात पोहोचून स्वैर बागडत असतं. आणि फक्त शरीर कामं हातावेगळी करत असतं, मात्र कामं करत असताना माहेरी गेल्यानंतर काय काय करायचं? लग्नात साड्या कोणत्या नेसायाच्या? कोणते दागिने कुठल्या साडीवर उठून दिसतील? वेशभूषे बरोबरच केशभूषा काय करावी? आपल्याला लग्नात कोण कोण भेटू शकतं? आहेर करताना कुणासाठी काय घ्यायचं? अशा असंख्य, अगणित विचारांनी मेंदू व्यापलेला असतो. पण त्यात फक्त आनंद हाच सर्वव्यापी असतो. त्यामुळे मेंदू थकत नाही, उलट त्याला चार्जिंग मिळून तो रिफ्रेश होतो.

संजना सुद्धा आनंदाने अगदी हलकं पिस झाली होती. वेग घरातल्या कामांना आला होता पण वेध माहेराचे लागलेले होते. जाता - येता असे दोन्ही वेळेचे रेल्वेचे बुकिंग झाले होते. सामान भरण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बॅग्ज खाली काढून, त्या पुसून स्वच्छ करून झाल्या होत्या. परवा निघण्याचा दिवस आला तरी हीचे मन तळ्यात -मळ्यातच खेळत होते, कारण अजयची रजा मंजूर झाली होती पण एक खूप महत्त्वाचे ऑफिसचे काम पूर्ण व्हायचे होते. कान सतत फोनची रिंग वाजण्याचा वेध घेत होते. रिंग वाजली आणि इच्छापूर्ती झाली. त्यामुळे कामांना आणखी वेग आला. बॅगांमधे नाकातल्या नथीपासून पायाच्या बोटांच्या जोडव्यांपर्यंत सारं काही आपापलं स्थान ग्रहण करून स्थानापन्न झालेलं होतं.

ठरलेल्या वेळी, ठरलेल्या दिवशी, ठरलेल्या रेल्वेने जाण्यासाठी दोघेही स्टेशनवर पोहोचलो. मन मात्र माहेरात पोहोचून माजघरात सगळयांच्या गप्पात रंगलं होतं. चेहरा टवटवीत फुलासारखा झाला होता. रेल्वे आली. दोघे रेल्वेत बसले आणि दुसऱ्या दिवशी स्टेशनवर पोहोचली. रिक्षा करून घरी पोहोचलो तर सगळी बहिण - भावंडं वाटच बघत होती. बघता क्षणी घट्ट मिठीत सामावलो. आनंदाचे आवर्त हेलकावे घेत होते. बघता बघता या छोट्या छोट्या वाटणाऱ्या बहिणी कधी मोठ्या झाल्या हे लक्षातच आलं नाही. त्यातल्याच धाकट्या बहिणीचं लग्न होतं. अगदी थाट होता तिचा. शेंडेफळ ना! मग काय, सगळ्यांची 'लाडो '.

उद्या लग्न म्हटल्यावर आज कार्यालयात जायचे होते. ते ही लवकर कारण वरपक्ष कार्यालयात पोहोचण्यापूर्वी स्वागतासाठी आणि मग सिमांत पूजन. एक चांगलीशी साडी नेसून कार्यालयात पोहोचलो. तिथे

त्या बहिणीचा मेक अप करणारी ब्युटिशियन आधीच आलेली होती, तिने बहिणीचा ताबा घेतला आणि थोड्याच वेळात नवरदेवाची स्वारी कार्यालयात पोहोचली. सगळ्यांची एकच गडबड उडाली. औक्षणाचं ताट आणा sss, पाण्याचा तांब्या आणा ssss अशा वाक्यांच्या रांगानी कानात एकच गर्दी केली होती. वयस्कर स्त्री वर्ग हे सगळे सोपस्कार करणार होता, पण आमची उगाचच धावपळ आणि खळखळून खिदळणं. अर्थात मुलीचं लग्न म्हटलं की धावाधाव आलीच. असो तर वर पक्षाचं यथोचित स्वागत झाल्यानंतर चहा -पाणी झालं. मग मात्र सीमांत पूजनाची तयारी सुरू झाली. दरम्यान वधूचे आवरणे चालूच होते. आत-बाहेर, बाहेर-आत अशी यातायात वेगाने चालू होती.

संजनाची सुद्धा कार्यक्रमासाठी आवरण्याची लगबग सुरु होती. म्हणून साडी आणण्यासाठी ती वधुपक्षाच्या(बहिणीच्या) खोलीत गेली आणि बॅग उघडून साडी काढण्यासाठी हात बॅगेत घालत असताना, एक धक्का देणारं वाक्य तिच्या कानी आलं,"ताई, अगं अंगठी सोन्याची होती. हवीच होती तर मागून घ्यायची, चोरायची कशाला?" आवाज तर बहिणीचाच होता, पण विश्वास बसत नव्हता. तरी पण खात्री करून घेण्यासाठी तिने मागे वळून बघितलं तर...हो!.. बहिणच बोलत होती. तिच्यापेक्षा पंधरा वर्ष लहान असलेली तिचीच बहिण. जन्मापासून मांडीवर खेळवलं होतं तिला, जिवापाड प्रेम केलं तिच्यावर, शेंडेफळ म्हणून गोंजारलं तिला...हो तीच होती. संजनाला तर वाक्याच्या अर्थाचं आकलन व्हायलाच वेळ लागला...आणि कळल्यानंतर ती स्तब्धच झाली. गोठलेल्या डोळ्यांतून उष्ण अश्रू घळघळून गालावरून ओघळत होते. भानावर येत संजनाने तिला विचारले,"तुला कळतंय का बेटू तू काय बोलते आहेस ते?" त्यावर व्यंगात्मक हसत म्हणाली, "उगाच वेड पांघरून पेडगांवला जाऊ नकोस...बघितली तरी आहेस का कधी हिऱ्याची अंगठी?" मनाला चिरत गेलं हे तिचं वाक्य...हिऱ्याच्या करकरीत धारेसारखं. कारण कुठल्या अंगठीबद्दल ती बोलते आहे ह्याचेच संजनाला गूढ होतं...आकलन होत नव्हतं. तशाच परिस्थितीत संजनाने स्वतःचे कसेबसे आवरुन कारण आता तसा ही आता तिला सजण्यात काय कशातच रस उरला नव्हता. चेहऱ्यावरचे भाव शांत व आनंदित ठेवत कार्यक्रमाच्या हॉलकडे चालायला सुरुवात केली, जबरदस्तीने पाय ओढत. आपल्या मनातले भाव कुणालाही कळणार नाही याची खबरदारी घेत. मन आतल्या आत आक्रंदत होतं, पण सगळं आलबेल आहे असेच हावभाव चेहऱ्यावर स्थिर ठेवले. अजून त्या दोघिंशिवाय हे कुणालाही माहिती नाही अशी संजनाची गैर समजूत होती. संजनाचं मन स्वतःच्या घराच्या दिशेने म्हणजे सासरच्या दिशेने धावायला लागलं. केव्हा एकदा स्वगृही पोहोचेन असं झालं होतं. संजनातला हा बदलाव तिच्या आईच्या नजरेतून सुटला नाही. तिने काय झालं म्हणून विचारणा केली. पण डोकं दुखण्याचा बहाणा करत ते तिने टोलवलं. कारण ती बेचैन झाली असती.

"चोरी", "चोर" हे खूप वाईट शब्द आहेत..नाही का? मनाला घरं पाडणारे...भक्कम मन कमकुवत करणारे. संपत्तीचा, पैशाचा माज कधी करू नये. धनाच्या श्रीमंतीपेक्षा मनाची श्रीमंती लाख मोलाची असते. पण हे सांगायचं कुणाला ना? आणि एकदा शब्द बाण सुटला की तो छेद करतोच. संजना त्याच विचारांमध्ये

गुरफटलेली होती. येता जाता ते शब्द तिचे मन अधिकाधिक घायाळ करीत होतं. तरी पण वरपांगी भाव आनंदाचेच ठेवले होते. पण मन शोध घेत होतं काय आणि कसं घडलं याचा. पण रहस्य काहीच उलगडत नव्हतं.

सीमांत पूजन व्यवस्थित पार पडलं. अगदी जेष्ठ जावयाच्या पुजेपासून ते गळा भेटीपर्यंत. सगळे जेवण करून, गप्पा मारत बसले आणि थोडावेळाने निजानीज झाली पण संजना टक्क जागी होती. सगळीकडे सामसूम झाल्यामुळे बारीकसारीक कुजबूज ऐकू येत होती. काकू कुणाला तरी सांगत होती,"नाही ग सापडली अजून अंगठी. कुठे पडली, काय झालं कळत नाहीये. औक्षणानंतर सापडतच नाहीये. म्हणजे अंगठी हरवली हे सगळयांनाच माहिती होतं, आणि औक्षणाच्या नंतर ती सापडत नाहीये, हे संजनाला आत्ता कळलं होतं. पण बहिण संजनालाच डागणी देत होती चोरीची. संजनाच्या जिवाची घालमेल मात्र सुरुच होती. अजून वाढली, पण 'कर नाही त्याला डर कशाला' हा उत्तम विचार करत ती ही निद्राधीन झाली. सकाळी सकाळी हळदी आणि वैदिक पद्धतीने लग्न त्यामुळे लग्नविधी यांची एकच झुंबड उडाली. संजना मात्र रेंगाळत रेंगाळत आवरत होती. कुठलाही उत्साह नव्हता. माहेरासाठी पिंगा घालणारं मन आपोआपच सासरच्या रिंगणात जायला धावत होतं... पण अजून अवकाश होता. रेल्वे तिकीट दुसऱ्या दिवशीचं होतं आणि लग्नविधी पण पूर्ण व्हायचा होता. एकूण सोहळा खूप छान पार पडला. बहिण आनंद तरंगात लहरत होती. आपण काय बोललो ताईला याच्याशी काही देणंघेणच नसल्यासारखी वावरत होती. तिला निरोप देण्याची वेळ आली तशी काकू तिची ओटी भरण्यासाठी तयारीला लागली. तिची ओटी भरून साडी दिली. मग ती साडी नेसण्यासाठी बहिण तिच्या खोलीत आली. संजना आणि बाकी लोकांची बॅग भरून आवरा आवर सुरुच होती. तिथे तिने साडी बदलण्यासाठी ती वरातीची साडी उलगडली...आणि बारीकसा खटकन असा आवाज आला. काय पडलं जमिनीवर म्हणून जवळ जवळ सगळयांनीच त्या दिशेने बघितलं..तर, तीच ती 'हिऱ्याची अंगठी '...तिच्या साडीच्या घडीतून पडली. टेबलवर तबक ठेवताना अनावधानाने त्या साडीत पडली असावी. संजना तर पहिल्यांदाच बघत होती. पण काकूला खूप आनंद झाला. सापडली, सापडली अंगठी असं सगळयांना सांगितलं. पण बहिणीच्या चेहऱ्यावर बेफिकिरीचे भाव होते. दिलेली साडी नेसून ती सर्वांचा निरोप घेऊन संजनाचे काळीज पायी तुडवत निघून गेली. कुठलाही मागचा पुढचा विचार न करता आणि ते ही संजनाकडे बघून हसत हसत. संजनाचं काळीज मात्र विदीर्ण झालं...हाच माहेरचा आहेर!

संजना जडपावलानी सगळयांच्या बरोबर घरी परतली. परतीचा प्रवास दुसऱ्या दिवशी सकाळी होता. त्यामुळे सकाळपर्यंत संजना दुःखाचे आवंढे मूकपणे गिळत होती. त्या घरात परत तिने अन्नाचा आणि पाण्याचा अंशही ग्रहण केला नाही. त्या विमनस्क अवस्थेत तिने 'स्वतःच्या' घराचा रस्ता धरला...कायमचा!

****

®© रंजना आगटे

संपर्क- ranjanaagate222@gmail.com

निसर्ग

या वातावरणामध्ये आपले जीवन सुखी समाधानाने जगत आहोत त्याला निसर्ग असे म्हणू शकतो. निसर्ग ही देवाने दिलेली खूप सुंदर देणगी आहे. कदाचित याच निसर्गामुळे सजीव सृष्टी या पृथ्वीतलावर निर्माण झाली असावी. जीवन आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टींचा लाभ आपल्याला निसर्गातूनच होतो.आजच्या आधुनिक जगाने केलेली प्रगती ही अविस्मरणीय आहे. बऱ्याचशा नवनवीन गोष्टींचा शोध हा मानवाने लावलेला आहे. परंतु, जे जे मानवनिर्मित नाही त्याला आपण निसर्ग म्हणू शकतो. आपल्या सभोवताली आढळणारे पाणी, हवा, आकाश,डोंगर-दऱ्या ही निसर्गाची तत्वे आहेत.निसर्गाचे स्त्रोत हे वेगवेगळे आहेत. जसे की नद्या, समुद्र, डोंगर, जमीन, सूर्य या वस्तू आपल्याला दिसतात परंतु याच निसर्गामध्ये काही अशा अदृश्य वस्तू आहेत ज्या आपल्याला दिसत नाहीत परंतु या सर्वांचा मिळून निसर्ग बनलेला असतो.पृथ्वी वर्तुळाकार दिशेमध्ये स्वतः भोवती आणि सूर्याभोवती फिरते यामुळेच दिवस आणि रात्र होतात. पृथ्वी ग्रहावर एक जीवनदायी वातावरण आहे त्यामुळे खूप सारे घटक पृथ्वीमध्ये समाविष्ट झालेले आहेत.

पृथ्वीवर असलेल्या घटकांमधील पाणी आणि हवा हे त्याचे मुख्य जीवनदायी घटक म्हणता येईल. आणि या घटकांची उपलब्धता ही निसर्गाच्या नियमांवर होत असते. या पृथ्वीवर असलेले सर्व सजीव घटक एकमेकांशी निसर्गाच्या माध्यमातून जोडलेले असतात. पृथ्वीवरील सजीवांचे जीवन सुरळीत चालण्यासाठी निसर्ग महत्त्वाची भूमिका बजावत असतो.अन्न, पाणी, हवा यांसारख्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याची काम निसर्गातूनच होते. या व्यतिरिक्त अग्नी आणि आकाश ही तत्वे सुद्धा निसर्गातून आपल्याला मिळत असले तरी आपल्या जीवनासाठी खूप महत्त्वाचे आहेत.एकत्र जीवन आणि निसर्ग समजून घेणे खूप कठीण आहे तरी आपण आपल्या सभोवतालचे वातावरण म्हणजे निसर्ग असे समजतो. आणि निसर्गाद्वारे आपले जीवन गतिमान आहे. मानव पूर्णतया निसर्गाने जोडलेला आहे. निसर्गात वेगवेगळे ऋतू असतात. आणि या ऋतूनुसार आपल्या शेजारील वातावरण आणि हवामान सतत बदलत असते.

उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा या तीन ऋतू नुसार होणारे बदल हे आपल्या जीवनासाठी अत्यंत आवश्यक असतात. तसेच पाण्याची गरज आणि हवा शुद्धीकरण यासाठी निसर्गचक्र आहे ज्याद्वारे पृथ्वीवर फिरून फिरून पाऊस असतो तसेच वातावरणात असलेल्या हवेचे थर ज्यामुळे आपल्याला आवश्यक असणारी हवा आपण श्वास म्हणून घेतो.या निसर्गात असलेले झाडे, नद्या, नाले, समुद्र यांपासून आपली हवेची आणि पाण्याची गरज पूर्ण झाली. अग्नि ची गरज हे नंतर निर्माण झाली. याच अग्नि मुळे आपण अन्न कच्चे न खाता शिजवून खाऊ लागला.अन्न निर्मितीसाठी आपण शेती व झाडांपासून मिळणाऱ्या फळांचा वापर करू लागलो परंतु ही झाडे किंवा शेती हा एक निसर्गाचाच भाग आहे.

निसर्गाचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे झाडे आहेत. याच झाडापासून मानवाला जगण्यासाठी आवश्यक असलेला प्राणवायू म्हणजेच "ऑक्सिजन" मिळतो. तसेच पृथ्वी वर झाडे आहेत म्हणून बहुतांश पाऊस हा झाडा मुळे होतो. आणि अन्नाची गरज सुद्धा झाडांमुळेच पुर्ण होत. त्यामुळे झाडे ही निसर्गाचा अविभाज्य घटक आहे.माणसाचा जन्म आणि मृत्यू हा सुद्धा निसर्गाचाच भाग आहे. किंबहुना मनुष्य सुद्धा याच निसर्गाचा महत्त्वाचा घटक आहे. या सृष्टी वर असलेले प्राणी, पक्षी, झाडे, झुडपे, नद्या-नाले, डोंगर सर्व काही निसर्गाचीच देणगी आहे. हा निसर्गातूनच मिळणाऱ्या वस्तूंचा उपयोग करून माणसाने आज प्रगती केलेली आहे.निसर्गाचे झाडांच्या लाकडांचा वापर करून इमारती बांधल्या जाऊ लागल्या, तसेच झाडाच्या लाकडापासून विविध फर्निचरच्या वस्तू बनवल्या जात आहेत. निसर्गातील औषधी वनस्पतींपासून माणूस औषधे निर्माण करून आपले आयुष्य वाढवू लागला. त्यामुळे मृत्यूदर कमी होऊन जीवन काळ वाढू लागला आहे. याचा परिणाम लोकसंख्या वाढ झालेली जाणवत आहे.

तसेच निसर्गातून मिळणाऱ्या अनेक वस्तू म्हणजे पेट्रोल, डिझेल, कोळसा, खाण कामातून मिळणाऱ्या मौल्यवान वस्तू यांचा वापर करून माणूस आपल्या गरजा पूर्ण करू लागला. अशाप्रकारे मनुष्य स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यासाठी निसर्गाला नुकसान पोहोचत आहे. आजचा मनुष्य विसरून चालला आहे की आपले घर आपले असते परंतु या संपूर्ण सृष्टी चे घर म्हणजे निसर्ग आहे.

मानवाने निसर्गात अनेक महत्त्वपूर्ण घटकांच्या आधारावर आपले उद्योगधंदे उभारले आहेत. निसर्गातील झाडांपासून रबर निर्मिती, औषधी निर्मिती, फर्निचर निर्मिती, इंधन म्हणून वापर, पाण्यापासून वीज निर्मिती, हवेवर चालणाऱ्या पवनचक्क्या, खान कामातून कोळसा, खनिज निर्मिती असे अनेक महत्त्वपूर्ण उद्योग माणसाने निसर्गातून मिळणाऱ्या कच्चा मालाच्या आधारावर स्थापित केलेले आहेत.मासेमारी, पशुधन, पशूपालन, शेती, माती पासून विटा निर्मिती या गोष्टीसुद्धा निसर्गातील घटकांवर अवलंबून आहेत.निसर्गात असलेली सुंदर दृश्य माणसाला निसर्गाकडे आकर्षित करतात. निसर्गातील सुंदर दृश्य यामुळे जगभरातील पर्यटन क्षेत्राचा विकास होऊन आर्थिक मदत होत आहे. भारतातील महाबळेश्वर, केरळ, कोकण, काश्मीर यांसारख्या निसर्गाने परिपूर्ण असलेल्या शहरांचा लाभ घेण्यासाठी जगभरातून लाखोंच्या संख्येने पर्यटक येतात.

जगभरात असलेल्या अनेक निसर्गनिर्मित आश्चर्यांना पाहण्यासाठी मानव जगभर प्रवास करून निसर्गातील गोष्टींचा आनंद घेत आहे. त्यातून त्या देशाच्या आर्थिक विकासाला सुद्धा मदत होत आहे. निसर्गातील हिरवळ, रंगीबिरंगी फुले, फळे, पक्षी, प्राणी, वेली, यांना बघितल्यास मानवाचा मानसिक ताणतणाव दूर होण्यास मदत होते. अशाप्रकारे निसर्ग मनुष्याला चारी बाजूंनी मदत करण्यास उपयोगी पडतो.अलीकडे वाढलेल्या आधुनिक कारणामुळे निसर्गाला मोठ्या प्रमाणात हानी होत आहे. वृक्षतोड, ध्वनी प्रदूषण, वायू प्रदूषण, जल प्रदूषण हे सर्व निसर्गाला झालेल्या हानीतून होणारे परिणाम आहेत. मानवाने स्वतःच्या सुखासाठी, सोयीसाठी आणि गरजा पूर्ण करण्यासाठी निसर्गाला हानी पोहोचली आहे त्यामुळे निसर्गातील इतर जीव म्हणजेच प्राणी, पक्षी यांची जीवन संकटात आले आहे.

परंतु मानवाने निसर्गाला हानी न पोहोचवता निसर्ग आपला मित्र आहे, निसर्गामुळे आपली जीवन सुरळीत चालले आहे हे लक्षात घेऊन निसर्गाचे संरक्षण करणे याकडे लक्ष दिले पाहिजे.मानवाला जीवन जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टींची पुर्ती ही निसर्गातूनच होते. जर निसर्गाला नुकसान पोहोचले किंवा हानी पोहोचली तर याचे परिणाम हे आपल्यालाच सोसावे लागतील. आपण निसर्गाला नष्ट केले तर निसर्ग आपल्याला नष्ट करू शकतो.त्यामुळे आपले जीवन सुखकर आणि निरोगी ठेवण्यासाठी व पुढच्या पिढीसाठी आपण निसर्गाचे जतन केले पाहिजे. निसर्गातून

मिळणाऱ्या सर्व गोष्टींचा लाभ घेतला पाहिजे. निसर्गातून मिळणाऱ्या साधन संपत्तीचा जपून वापर केला पाहिजे. वातावरणात वाढ आलेले प्रदूषण, वृक्षतोड यांच्या प्रमाण कमी केले असता कदाचित निसर्गमुळे होणाऱ्या हानी पासून आपण वाचू शकतो.

प्रत्येकाने निसर्ग हा आपला मित्र आहे असे समजून निसर्गाचे संरक्षण व संवर्धन करणे हे आपले प्राथमिक कर्तव्य समजले पाहिजे. आपल्या येणाऱ्या पिढीला निसर्गातील गोष्टींचा लाभ मिळवून द्यायचा असेल तर आज आपण निसर्गाला हानी न पोहोचवता निसर्गाचे संवर्धन केले पाहिजे.

कुठलाही मोबदला न घेता निसर्ग आपल्याला विविध गोष्टी पुरवितो. याची जाणीव ठेवून आपण निसर्गाला कोणत्याही प्रकारची हानी न पोहोचवली पाहिजे.

खरंच ! निसर्ग आहे म्हणून या पृथ्वीतलावर संपूर्ण सजीव आपले जीवन जगत आहेत. त्यामुळे आपल्या जीवनासाठी निसर्ग किती महत्त्वाचा आहे हे आपल्याला कळालेचं असेल.

****

®© प्रशांत सुर्यवंषी

रा. कोरा ता. समुद्रपूर जि वर्धा

संपर्क - ७०२०५२८७८४

वास्तुआशीर्वाद

कोंबड्याने बांग दिली की सुमतीताई उठून कमरेला पदर खोचून कामाला लागायच्या. साधारणत: पहाटे पाच वाजता कोंबडा बांग द्यायचा....त्यावेळी उठल्यापासून ते रात्री दहा वाजता झोपेपर्यंत त्यांचा हात चालूच असायचा. ना कामाचा कंटाळा, ना शरीर थकल्याची तक्रार ...त्यांना सगळं कसं चकचकीत आणि टापटिपीत लागायचं.

नागठाणे गावाचं नाव....डोंगराच्या पायथ्याशी वसलेलं होतं .....गावातून नदी जायची तीही बारमाही पाणी असलेली...!

सुमतीताईंच वय पन्नास वर्षे होतं. पती नारायणरावांचा मसाले व्यवसाय होता. तोही परंपरेने चालत आलेला. मात्र त्यात प्रत्येक पिढी स्वत:चे कष्ट ओतत गेल्याने आजच्या काळात राणे मसाले पूर्ण राज्यात प्रसिद्ध झाले होते...,.नारायणराव आणि सुमतीताई यांना तीन मुलं आणि एक मुलगी होती. त्यामधील दोघेजण मसाले व्यवसायात गुंतले होते तर तिसऱ्या मुलाने रिअल इस्टेट मधे स्वत:चा बिझनेस उभा केला होता. मुलगीही डॉक्टर असून तिचं लग्न झाल होतं.

सुमतीताईंच्या तिन्ही मुलांची लग्न झाली होती आणि तिन्ही सुना मुलांना साजेशा आणि सुशिक्षित होत्या. रुद्र, ऋग्वेद, जय आणि मुलगी नंदिनी चौघांवरही सुमतीताई आणि नारायणरावांनी खूप चांगले संस्कार केले होते.....त्यांची "श्रम-साफल्य" वास्तू आणि त्यातील लोक संपूर्ण गावासाठी आदर्श होती.

रुद्र,ऋग्वेद आणि जय तिघांनीही स्वत:च्या पसंतीने लग्न करून निलीमा, मालती आणि त्रिशा यांना घरी आणलं होतं. मुलं मोठी झाल्यावर त्यांना त्यांच बरं-वाईट समजतं; त्यामुळे सुमतीताईंनी मुलांच्या पसंतीला स्वत:ची अनुमती देवून सुनांना मोठ्या मानाने घरी आणलं होतं....आणि कायम मानाने वागवत होत्या. मात्र मुलगी नंदिनीचं लग्न त्यांनी स्वत: तिच्यासाठी मुलगा पसंत करून केल होतं.....अर्थातच नंदिनी सूमतीताईंचीच सावली असल्याने तीने आनंदाने आईच्या निर्णयाला सहमती दिली होती व ती तिच्या संसारात खुश देखील होती...!

सुनबाई सुशिक्षीत, हायली एज्युकेटेड त्यामुळे सुमतीताईंचे घरातील काही सोपस्कार त्या मानत नसायच्या. सुमतीताई जरी जुन्या काळातील असल्या तरी त्या शिक्षणाची गोडी आणि हौस असणाऱ्या असल्याने त्या सुनांना जास्त काही बोलायच्या नाहीत...त्यांच्या कलेने घेत त्यांना घरातल्या सर्व गोष्टी शिकवण्याचा प्रयत्न करीत. मग स्वयंपाक करणे असो वा बाहेरील अंगणात सडा मारून रांगोळी काढणे असो....!

तिन्ही मुलं सकाळी लवकर उठून त्यांनी सुरू केलेला बिझनेस वाढवण्यासाठी आणि त्यात उत्तरोत्तर प्रगती घडवण्यासाठी अपार कष्ट करत...तिघेही आई-बाबांचा आशीर्वाद घेऊन घराबाहेर पडायचे....तसेच घरात येताना पहिल्यांदा घरातील उंबरठ्याला हात लावून नमस्कार करून मगच ते घरात प्रवेश करत....नियमच होता तसा सुमतीताईंचा....!

रूद्र, ऋग्वेद आणि जय यांना लहानपणापासून ती सवय अंगवळणी पडली होती. सुमतीताईंच्या मते आपण वर्षानुवर्षे राहत असलेली वास्तु आपणाला आशीर्वाद देत असते. त्या वास्तूचा आदर म्हणून घरात प्रवेश करताना आपण वास्तूचे आभार मानूनच घरात प्रवेश करावयाचा.

निलीमा घरूनच ऑनलाईन गायनाचे क्लास घ्यायची, मालतीचे ज्वेलरी शॉप होते तर त्रिशा सध्या घरीच होती पण फॅशन डिझाईनींगचा क्लास करत होती. तिघी सूनाही फार हुशार आणि कामात व्यस्त असणाऱ्या होत्या....पण सुमतीताईंचे नियम त्यांनाही खटकायचे....ते नियम पाळायला त्या कानकून करायच्या. सुनांच्या मते, जग कुठे चाललय आणि

आपल्या सासूबाई अजून घराला नमस्कार करा, अंगणात रांगोळी काढा, घर स्वच्छ-टापटीप ठेवा, पाहुण्यांच आदरातिथ्य करा, देवपूजा करा या गोष्टींत अडकून पडल्यात.

सुमतीताईंना हे कळत होतं आजकालच्या मुलींना नाही पटायचं हे.... पण ज्यावेळी त्यांना या मागच शास्त्र समजेल तेव्हा आज ना उद्या पटेल त्यांना म्हणून त्या सुनांकडून गोड बोलून करून घ्यायच्या. असंही सुमतीताईंची मुलं या सगळ्या गोष्टी मनोभावे करायची, त्यामुळे आपले नवरे करतायेत तर त्यांच्या बायकांना करण भागच असायचं.

आपल्या सासू-सासऱ्यांनी आपल्या लग्नाला अजिबात कोणतीही ना करत आपणाला एवढ्या प्रेमाने वागवलंय तर काय हरकत आहे त्यांच्या समाधानासाठी हे सगळ करायला इतकी समज तर होतीच मालती, निलीमा आणि त्रिशामध्ये...त्यामुळे सुमतीताईंची 'श्रम-साफल्य' वास्तू कशी एकदम भारदस्त आणि दिमाखात उभी दिसायची. बाजूच्या रोडवरून जाणारी कोणीही अनोळखी व्यक्ती नकळत त्या वास्तुला डोळेभरून पाहूनच पुढे जायची....कोणास ठाऊक कसे पण त्या वास्तूत खुप सारी सकारात्मक शक्ती असल्यासारखी भासायची...वास्तूकडे पाहिल की आपोआपच मन प्रसन्न आणि चित्त शांत व्हायचं.

तिन्ही सांजेच्यावेळी सुमतीताई एका कुंबीत कापुर आणि ओवा पेटवून घराच्या कोपरा न कोपऱ्यातून फिरवून देवासमोर दिवा लावायच्या व नमस्कार करून, देवाची आणि वास्तूची प्रार्थना करत.

"संसारी या आनंदाची नित्य नवी बरसात
उतरला स्वर्ग इथे साक्षात"
अशा भावनेतून त्या वास्तूला म्हणायच्या,

"धरी घरावर चंदनछाया
फुले पसरती सुगंधमाया
सांज लाविते मांगल्याची सदनी या फुलवात"

अशाप्रकारे, सुमतीताईंच्या ओवा-कापुर आणि सांजवातेने घरात खूप प्रसन्न आणि सकारात्मक वातावरण होऊन जाई....त्यामुळेच की काय दिवसभर बाहेरच्या लोकांमध्ये, बाहेरील वातावरणात काम करून घरात माघारी येणाऱ्या मुलांचा दिवसभराचा कामाचा थकवा निघून जाई....!

आपसूकच आपल्या हसणाऱ्या मुलांना आणि सुनांना त्यांच्या नवऱ्यांना पाहून समाधान वाटून घरातील संपूर्ण वातावरणच हसतं-खेळत होवून जायचं....हे सगळ पाहून नारायणराव सुमतीताईंसारखी सुसंस्कारी अर्धांगिनी मिळाल्याबद्दल देवाचे मनोमन आभार मानायचे....पण त्यांनाही कधी-कधी प्रश्न पडायचा की कोणी वास्तू नावाची देवता खरंच अस्तित्वात असते का? ते बरेचवेळा सुमतीताईंना विचारायचे देखील....

त्यावर सुमतीताईंच ठरलेल उत्तर असत "हो वास्तू नावाची देवता खरचं अस्तित्वात असते आणि याला विज्ञानाची जोड आहे बरं...अहो आपण ज्या वास्तूत राहतो तिला मान द्यायला नको? अगदी मुलासारखं प्रेम करायला हवं तिच्यावर. तुम्हीच विचार करा, आपण म्हणतो की नाही 'स्वच्छता जिथे, लक्ष्मी वसते तिथे' म्हणूनच आपल्या घरात लक्ष्मी आहे कारण आपल्या घरात स्वच्छता असते. घरातील प्रत्येक वस्तू भलेही ती निर्जीव का असेना आपला जीव असतो

तिच्यावर.....वर्षानुवर्षे आपल्या सारख्या सजीवांच्या वावरण्यामुळे निर्जीव ववास्तूदेखील सजीव होते. तिलाही कान असतात. म्हणूनच आपण घरी बसून केलेली बाहेरच्या लोकांसाठीची प्रार्थना खरी ठरते....वास्तूतील सकारात्मक शक्ती सगळं काही चांगलं घडवण्याचा अट्टाहास ठेवते."

सुमतीताईंच्या उत्तराने नारायणरावांना धन्य झाल्यासारखं वाटायच व ते मनोमन वास्तूकडे एक कटाक्ष टाकून वास्तूला धन्यवाद द्यायचे.....नारायणरावांना आठवायचं की 'श्रम-साफल्य' ही स्वत:ची वास्तू उभारण्या अगोदर साधारणत तीस वर्षांपूर्वी ते आणि सुमतीताई जेव्हा भाड्याच्या घरात राहयचे तेव्हा ते घर सोडतानादेखील त्यांना किती त्रास झाला होता. तिथेही सुमतीताईंचे वास्तूविषयक सगळे नियम पाळले जात असल्याने मनावर एक वेगळेच संस्कार झाले होते; ते भाड्याचं घर असूनही, सोडताना जणू ते म्हणत होते आमचा आशीर्वाद आहे तुमच्याबरोबर खूप यश मिळवा, मोठे व्हा....घरातुन सगळं साहित्य टेंम्पोत भरल्यावर पुन्हा सुमती घरात जाऊन चारी भिंतीवर एखाद्या लहान मुलाला कुरवळल्यासारखं हात फिरवून डोळयांतील आसवे गाळत उभी होती...शेवटी आपण जाऊन सुमतीला सावरून बळेच बाहेर घेउन आलो होतो; तेव्हाही घराबाहेर येऊन तिने घराला नमस्कार करून तुझा आशीर्वाद राहूदे आमच्या बरोबर अशी प्रार्थना केली होती...! खरचं आहे आपल्यावर वास्तूचा आशीर्वाद..!

आणखी एक गोष्ट सुमतीताई आवर्जून करायच्या ते म्हणजे आठवड्यातून एकदा घरातील जो काही फ्लश एरिया होता तिथे मोठं मीठ टाकायच्या....थोडक्यात सांगायचं तर किचन बेसीन, वॉशबेसीन, टॉयलेट, बाथरूम सगळीकडे त्या ओंजळ-ओंजळभर मोठं मीठ टाकायच्या. असं केल्याने घरातील नकारात्मकता निघून जाते असं त्यांच मत आणि अनूभव होता....त्याबरोबरच स्वयंपाक करताना अगोदर गॅस शेगडीला नमस्कार करणे व पहिला घास तिला अर्पण करणे, तसेच गाडी चालवण्या अगोदर स्टेरींगला नमस्कार करणे या गोष्टी करणे हा ही एक नियम बनला होता....घरातील सूनबाईंना हे देखील पटायचं नाही पण घराचे नियम पाळावे लागायचे.

सुमतीताईंनी निलीमा, मालती आणि त्रिशा तिघींनाही त्यांची कामे वाटून दिली होती. घरातील धूण्या-भांड्याला कामवाल्या मावशी होत्या.....पण स्वयंपाक करणे, झाडांना जातीने पाणी घालणे, अंगणात सडा मारणे, रांगोळी काढणे, चार-पाच दिवसांनी घरातील असणाऱ्या सोफे, बेड, खिडक्यांचे, दारांचे पडदे धुवायला टाकणे, देवपूजा-सांजवात करणे, ओवा-कापूर, मीठ टाकणे, हा ॅलमध्ये रोज ताजी फुले ठेवणे सुकलेली फुले टाकणे, फर्नीचर पुसणे, अधुन-मधून धुप जाळणे, पाहूण्यांचं आदराने स्वागत करणे, त्यांना हवं नको ते पाहणे या आणि अशा बऱ्याच गोष्टी सुमतीताईंनी सुनांच्या कामाच्या, क्लासच्या वेळा पाहून आणि त्यांची गैरसोय न होता वाटून दिल्या होत्या.

सुनबाई या सगळ्या जबाबदाऱ्या पार पाडत त्यामुळे वास्तू एकदम प्रसन्न, टवटवीत राही. आपसूकच घरातील वातावरण खेळी-मेळीच होई....हे सगळं त्या तिघी सुमतीताईंच्या सांगण्यावरून, त्यांची मर्जी सांभाळण्यासाठी करीत पण मनातून त्यांना वास्तू-आशीर्वाद देते वैगेरे या गोष्टींवर तितकासा विश्वास बसत नव्हता....सुमतीताईंच्या तीक्ष्ण नजरेला ते जाणवायचं.....बऱ्याचवेळा सुमतीताईंना हा प्रश्नदेखील पडायचा की, आपल्या मागे यांनी हे सोपस्कार करायचे सोडले तर.....तर नकोच हा विचार पण त्यावर काहीतरी उपाय शोधून काढायला हवा हे दुरदृष्टी असणाऱ्या सुमतीताईंना पटत होतं आणि म्हणूनच त्या एक शक्कल लढवतात.

मागील पंचवीस वर्षात....कधीही घरा बाहेर मुक्कामासाठी राहयला न गेलेल्या सुमतीताई महिनाभर बहिणीकडे राहून येते सांगून निघतात. बरोबर नारायणरावांनाही घेतात.

सुमतीताई चक्क घरावर एवढं प्रेम असून महिनाभर घर सोडून राहणार या विचाराने मुलांना आणि सुनांना आश्चर्य वाटतं. पण सुमतीताई सर्वांना सगळ्या सुचना देऊन निघतात आणि काळजी करू नका मनाला तेवढच प्रसन्न वाटावं म्हणून मी चाललेय; येईन लवकरच असं बोलून मुलांना दिलासा देतात. नेहमी "तुझं आहे तुझपाशी, परी का बाहेर शोधिशी" म्हणणारी सुमती आज बाहेर जाऊन मन प्रसन्न करण्याच्या गोष्टी का करतेय हा प्रश्न नारायणरावांनाही पडला होता.

हुश्श.....आईसाहेब एक महिनाभर घरात नाहीत म्हटल्यावर तिघी सुनांना कोण आनंद झाला होता....मनातून हुरळून गेल्या होत्या तिघीही. निलीमाने आज रात्री स्वयंपाकाला सूट्टी देउयात असं ठरवलं. त्याला बाकीच्या दोघींनीही सहमती देऊन जेवणाचं पार्सल आणायच्या पदार्थांची लिस्ट आपल्या नवऱ्यांना दिली. संध्याकाळी देवासमोर दिवा लावला पण पूर्ण अंधार पडल्यावर तेही आठ वाजता....!

रूद्र, ऋग्वेद, जय घरी आल्यावरती त्यांना घर वेगळंच भासलं.रात्री घरी आल्यावर ना धूप-दीपाचा सुगंध दरवळत होता ना प्रसन्न वाटत होतं....आईचा हसरा चेहराही नव्हता त्यांची विचारपूस करायला....!

आई-बाबांची कमी तर भासणारच होती त्या तिघांना....पण ठीक आहे ना आई-बाबा आजवर आपल्यासाठी कधी-कुठे फिरायलाही गेले नाहीत; आता सगळेजण वेल सेट्लड आहेत, तेव्हा फिरून येऊदे आई-बाबांना या विचाराने तिघांनी आपल्या मनाला समजावलं. रात्री जेवणाच्या टेबलावर बाहेरचे पदार्थ बघूनच तिघांचीही भूक अगोदरच गेली होती....झोपायला गेल्यावरही तीच समस्या.....सुमतीताई रोज रात्री झोपण्या अगोदर खोबरेल तेल कोमट करून सर्वांच्या डोक्याची मालीश करून द्यायच्या; त्यामुळे रूद्र, ऋग्वेद, जय, निलीमा, मालती आणि त्रिशा या सर्वांना छान शांत झोप लागायची.

सकाळपासून आई बाहेरगावी गेल्या आहेत म्हणून खुश असलेल्या तिघी सुनांनाही आता सुमतीताईंची आठवण आली. आजच्या फॅशनच्या जमान्यात लोक डोक्याला तेल लावत नाहीत पण त्यामुळे डोकं गरम होतं. त्यासाठी निदान रात्री तरी डोकं शांत होऊन झोप लागण्यासाठी डोक्याला तेल लावणं गरजेच आहे; असं सुमतीताईंच मत होतं....आणि आज त्याची प्रचिती घरातील सर्वांना आली होती....!

दुसऱ्या दिवशी ऊठायला सर्वांनाच उशीर होतो. कारण रात्री कोणाचीच व्यवस्थित झोप झालेली नव्हती......सकाळी उशीरा उठल्यामुळे तिघा मुलांची आणि त्यांच्या बायकांचीही चिडचीड सुरू होते. सुमतीताईंचा घरातील आणखी एक नियम म्हणजे घरातील कोणतीही वस्तू वापर झाला की आहे त्या जागेवर ठेवण्याची....निदान या सवयीमुळे उशीरा

उठलेले असले तरी, आपआपल्या वस्तू त्यांना पटकन सापडतात...व पुढच्या कामासाठी त्यांना तयार होता येतं. सुमतीताईंची घराला लावलेली ही सवय देखील इथे सर्वांसाठी फायदेशीर ठरते...त्या सर्वांना नकळत ते जाणवतंही...!

सकाळची देवपुजा मोठ्या सुनबाई निलीमा कशातरी आटपुन घेतात पण देवाला फुले वाहायला त्यांना वेळ मिळत नाही कारण तिचा गायनाचा ऑनलाईन क्लास होता.....त्यामुळे देव्हाऱ्यातील फुलाचा सुगंध हरवतोच पण निलीमा नेहमी ज्या सुरात गाणे गात असते, त्यादिवशी तो सुरदेखील बिघडलेला असतो...कदाचित देव्हाऱ्यातील सरस्वतीदेवींनाही फुलांच्या सुगंधाची तेवढीच सवय झाली असावी.....!

संध्याकाळी सर्वजण घरी येतात; तेव्हाही सर्वांना घरात नकारात्मकता जाणवते. तसंही बाहेर असताना देखील सर्वांना नेहमीपेक्षा वेगळेच अनुभव आलेले होते; चिडचीड, किटकीट, भांडण असं काहीस घडल होतं प्रत्येकाबरोबर...!

रात्री सगळेजण या गोष्टींवर बसून विचार करतात. त्यांना कळून चुकतं की सुमतीताईंनी घरातील जे काही नियम बनवले आहेत; ते योग्य आहेत. फक्त पैसा कमवला म्हणजे सर्व काही होतं नाही....तो टिकतो तो वास्तू-आशीर्वादामुळे! आपण ज्या घरात राहतो; ज्या घरासाठी पैसा कमावतो त्याच घरात काम करायला आपणाला वेळ नसतो. घरात काम करणं, घरात स्वच्छता ठेवणं, घरावर प्रेम करणं या गोष्टींमुळे घरातील वातावरण शुद्ध, पवित्र राहतं आणि आपोआप त्याचा सकारात्मक परिणाम घरातील सदस्यांवर होतो....!

आपली चुक उमगून निलीमा, मालती, त्रिशा दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून सगळे सोपस्कार पुर्ण करतात. तेव्हा कुठे घरात प्रसन्नता पसरून घर हसू लागतं.....ज्या कुटूंबावर वास्तू प्रसन्न असते तिथे सदैव गृहस्वामीनींच्या चेहऱ्यावर हास्य आणि जिभेवर प्रसन्न गाणं नक्कीच असतं...!!

****

®© माधुरी पाटील
संपर्क - madhurideepakkalebag@gmail.com

अखंड प्रेरणेचा स्त्रोत - डॉ. प्रकाशभाऊ आमटे

२००९/१० च्या सुमारास प्रकाश भाऊ सकाळच्या पुरवणीत आपले अनुभव लेखन करायचे. असाच भाऊंचा एक लेख वाचनात आला आणि पुढे दर आठवड्यास भाऊंचे लेख वाचण्याची गोडी लागली. त्यातूनच हेमलकसा, आनंदवन या गोष्टी अधिक समजल्या. पुढे लेख बंद झाले. मात्र माझ्या मनातील ओढ कायम राहिली. शाळा संपल्यानंतर प्रथमच एखादे पुस्तक विकत घेऊन वाचले ते म्हणजे 'प्रकाशवाटा'. तेव्हा भाऊंच्या कार्याचा आढावा घेणारा चित्रपट देखील तयार झालेला नव्हता. तरीही त्या पुस्तकाच्या माध्यमातून भाऊंचा जीवनपट माझ्या डोळ्यांसमोर उभा राहिला होता. आणि आयुष्यात एकदा तरी हेमलकसा जायचेच असे मनोमन निश्चित केले. त्यातच बाबांनी सुरु केलेल्या सोमनाथ येथील श्रम संस्कार छावणी बद्दल माहिती मिळाली आणि २०१२ च्या मे महिन्यात या छावणी / शिबिरात सामील होण्याची संधी मिळाली. शिबीर संपताच आपल्याला हेमलकसा गाठायचे हे नक्की होते. मात्र तेव्हाचा काळ हा गुगलचा नव्हता. हेमलकसा कुठे आहे यासाठी एका पर्यटन पुस्तकातील नकाशाचा तेवढाच काय तो आधार. मोबाईल होते मात्र ते देखील स्मार्ट नव्हते. शिबिराला जाण्याच्या अगोदर पासून हेमलकसा पर्यंत कसं जायचं यासाठी त्याभागात काम केलेल्या, जाऊन आलेल्या अशा व्यक्तींचा शोध सुरु ठेवला. मी आरोग्य विभागात कार्यरत असल्याने त्या भागात काम केलेल्या खैरनार आणि फुलझेले या आमच्या दोन कर्मचाऱ्यांची भेट झाली. त्यांनी बरीच माहिती दिली. सुरुवातीला माझ्यासोबत मोठ्या उत्साहाने दोन / तीन मित्र येण्यास तयार झाले होते. झाले काय तर बळजबरीने तयार केले होते म्हणा. अपेक्षेप्रमाणे शेवटी ते नाहीच आले आणि मी एकटाच शिबिरासाठी तयार झालो. शिबिरात असतांना देखील कुणी सोबत येतय का? याचा शोध सुरु होता. शेवटच्या दोन दिवसात काही कॉलेजचे तरुण, एक शिक्षक , दोन/तीन महिला अशी टीम तयार झाली. गडचिरोली जिल्हा आणि त्यातच महाराष्ट्राचे शेवटचे टोक असलेले हेमलकसा येथे जायचे होते. मनात उत्सुकता तर होतीच परंतु नक्षलवादी भागात जात आहोत म्हंटल्यावर धाकधूक देखील होतीच. शिवाय पुढील सगळा प्रवास बसनेच करायचा होता. त्यातच मे महिना. परंतु मार्ग सापडत गेला. तब्बल चार ठिकाणी बस बदलत आम्ही पोहोचलो. शेवटच्या टप्प्यात तर आम्ही बसमध्ये असलेल्या गर्दीमुळे बसायला जागा नसल्याने चालकाच्या केबिनमध्ये असलेल्या बॅटरीवर बसून प्रवास केला. शिवाय त्यादिवशी तापमान ४८ डिग्री अंश सेल्सिअस होते आणि हे आम्हाला हेमलकसा येथे पोहोचल्यावर कळाले.

हेमलकसा येथे पोहोचल्यावर आम्हाला कसला दम निघतोय फ्रेश होऊन आम्ही थेट भाऊंचे घरच गाठलं. म्हणजे तेव्हा भाऊंना भेटायला केवळ दर्दी जात असत असं म्हंटल तर वावगे ठरू नये. आता भाऊंचे कार्य

सगळीकडे पोहोचले आहे. त्यामुळे साहजिकच पर्यटकांची देखील गर्दी वाढली आहे. तेव्हापर्यंत फक्त पेपरात आणि पुस्तकात बघितलेले प्रकाश भाऊ आणि ताई प्रत्यक्ष आमच्या सोबत होते. कोणताही मोठेपणा नाही, मी पणा नाही. तब्बल सुमारे दोन तास आम्ही अगदी हसून खेळून गप्पा मारत होतो. भाऊंच्या तोंडून त्यांचे सर्व स्वानुभव ऐकले. खूप आनंद झाला. खुप बरे वाटले. माणूस एवढा 'मोठा' असून देखील आम्हाला अगदी आमच्यातलाच वाटला. संपूर्ण प्रकल्प बघितला आणि दुसऱ्या दिवशी परतीचा प्रवास सुरु झाला. शरीर परत आले परंतु मन मात्र तिथेच अडकून पडले होते. आपण देखील भाऊंच्या पावलांवर पाऊल ठेऊन चालायचे हे मनोमन नक्की केले. काहीतरी करायचे आहे. चांगले करायचे आहे. नक्की करायचे आहे. हा पक्का निर्धार केला होता आणि तो स्वस्थ बसू देखील देत नव्हता.

समविचारी मित्रांना सोबत घेत सन २०१७ मध्ये 'वनप्रस्थ फाउंडेशन' नावाची संस्था स्थापन केली. आमच्यापैकी कुणालाही संस्था, सामाजिक काम याचा फारसा असा काहीही अनुभव नव्हता. त्यातल्या त्यात मीच काय तो. परंतु सुरुवात झाली. पद, फोटो, जाहिरात, प्रसिद्धी या सगळ्या गोष्टी बाजूला ठेऊन काहीतरी चांगल करायचं बसं एवढचं. मित्रांनी देखील आम्हाला कोणतेही पद वगैरे नको, तू करतोय ना, म्हणजे काहीतरी चांगलच करशील, आम्हाला फक्त सोबत घे! असं म्हंटलं आणि काम सुरु झालं. सिन्नर – घोटी या महामार्गावरील आई भवानी डोंगर येथे ७/८ मित्र सोबत घेत वृक्षारोपणाचे काम सुरु झाले. केवळ वृक्षारोपणच नाही तर १०० टक्के संवर्धन हा हेतू डोळ्यासमोर ठेऊन काम सुरु झाले. पहिल्या वर्षी सुमारे १५०/२०० रोपांची लागवड केली. पावसाळा संपल्यानंतर अपेक्षेप्रमाणे सर्वच कार्यकर्ते गायब झाले. प्रसंगी मोटरसायकल वरून सुमारे ९/१० km पाणी वाहून नेत रोपे जागविली. अज्ञात टवाळखोरांनी लावलेल्या आगीत जवळपास सर्वच भस्मसात झाली. भाऊंची प्रेरणा सोबत होती. त्यामुळे पुन्हा एकदा न डगमगता नव्याने सुरुवात केली. सूक्ष्म नियोजन करीत नवीन रोपे लावली, नवनवीन कार्यकर्ते जोडले गेले. काम बहरत गेले. आजमितीस या डोंगरावर सुमारे ७० देशी प्रजातींच्या सुमारे ६५०० पेक्षा अधिक रोपांची लागवड करण्यात आली आहे. यापैकी अनेक रोपे ही आता महावृक्ष होण्याच्या दिशेने झेपावत असल्याचे बघून खूप समाधान होत आहे. त्यासोबतच सिन्नर नगर परिषदेच्या वतीने मिळालेल्या

दोन ओपन स्पेसमध्ये २००० दुर्मिळ देशी प्रजातींच्या रोपांची लागवड करीत देवराई तयार केल्या आहेत. वन्यप्राण्यांसाठी पाणवठा, प्राचीन पाण्याच्या स्त्रोतांचे पुनरुज्जीवन, प्लास्टिक मुक्त डोंगर असे विविध पर्यावरण विषयक कामे सुरु आहेत. तसेच आगामी काळात दुर्मिळ देशी प्रजातींच्या रोपांची रोपवाटिका तसेच वनप्रस्थ आश्रम सुरु करण्याचे नियोजित आहे.

हे सर्व काम करीत असतांना एक अखंड असा उर्जेचा स्त्रोत मनामध्ये सदैव तेवत असतो तो म्हणजे आदरणीय डॉ. प्रकाश भाऊंकडून घेतलेली प्रेरणा. ज्यावेळी मन उदास होते, एखाद्या कामात अडचणी येतात, अपयश येते तेव्हा भाऊंचे कार्य डोळयासमोर आणतो आणि नव्या दमाने कामाला सुरुवात होते. हा उर्जेचा स्त्रोत असाच तेवत राहो, तसेच हा आमच्या सारख्या असंख्य कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारा हा झरा असाच निर्झर वाहत राहो. लोकबिरादरीच्या माध्यमातून भाऊंचे हे कार्य असेच निरंतर चालत राहो. हिच सदिच्छा. भाऊंना आरोग्यदायी आयुष्याच्या लक्ष लक्ष शुभेच्छा...!

****

®© अभिजीत देशमुख

(संस्थापक अध्यक्ष – वनप्रस्थ फाउंडेशन, सिन्नर, जि. नाशिक)

संपर्क- aadesh2020@gmail.com

पगडंडी

बात आज से चालीस साल पहले की है। एम.बी.बी.एस. में प्रवेश के समय लगभग सभी विद्यार्थी यही दलील देते हैं कि मुझे समाज सेवा करनी है इसीलिए...। परंतु इनमें से अधिकांश डाक्टर बनते ही पैसे कमाने की मशीन बनकर रह जाते हैं, जो मुझे कतई पसंद नहीं था। गवर्नमेंट मेडीकल कालेज से एम.बी.बी.एस. की परीक्षा पास होने के बाद मैंने महाराष्ट्र राज्य के एक दुर्गम इलाके में सरकारी नौकरी करने का निश्चय किया। वर्तमान गड़चिरोली ज़िले के एक दुर्गम आदिवासी क्षेत्र में बसा एक छोटा-सा गाँव मेरा मुख्यालय था, नाम था 'पोटेगाँव'। जनसंख्या थी केवल 508। इस इलाके के सभी गाँवों की स्थिति कमोबेश एक जैसी ही है। छोटे-छोटे गाँव। कहीं दस-बारह तो कहीं बीस-पच्चीस घर। गाँव की जनसंख्या कहीं 28-30 तो कहीं 50-60। चंद गाँव ही ऐसे है जिनकी जनसंख्या पाँच सौ के आँकड़े को छूती है। बिजली नाम की कोई सुविधा तीस किलोमीटर के दायरे में है ही नहीं। वही हाल सड़क का भी है। सड़क के नाम पर जो वस्तु है, उसे रास्ता कहना भी अतिशयोक्ति ही होगी।अधिकांश गाँव एक-दूसरे से पगडंडी से जुड़े हुए हैं। पर मुझे भाती है पगडंडी। अलग ही एक संस्कृति होती है पगडंडी की। यहाँ पगडंडी से गुजरता हुआ हर व्यक्ति, चाहे एक-दूसरे से अपरिचित ही क्यों न हो, सामने से आनेवाले व्यक्ति से बातचीत करता है। खुशहाली पूछता है। कोई दिखावा नहीं होता है इनमें। कोई औपचारिकता नहीं होती। सरल मन से संदेश का आदान-प्रदान होता है। शहरों में सड़कें हुआ करती है। पर वहाँ ऐसा नहीं होता। शहर में सड़कों पर से लोग एक-दूसरे पर पैनी नज़र रखता हुआ आगे बढ़ता है। यहाँ के घर केवल मिट्टी और घास से बने हैं। ज़्यादातर घरों में दरवाज़े के स्थान पर ताड़ पत्तों से बनी चटाई नज़र आती है। कुछ अन्य घरों में दरवाज़े के स्थान पर कोई पुरानी चादर या फिर बोरा लटकता है। चारों तरफ सागवन का घना जंगल होते हुए भी कुछ नसीबवान घरों को ही नसीब हुआ है लकड़ी का बना दरवाज़ा। यहाँ के लोग खेती ज़रूर करते हैं लेकिन खेती करने के लिए कोई शास्त्रोक्त एवं आधुनिक तकनीक का इस्तेमाल नहीं के बराबर ही किया जाता था। हल अक्सर स्त्रियाँ चलाती हुई देखी जाती है। धान ही प्रधान उपज है। खाद का इस्तेमाल नगन्य ही है। जो कुछ भी पैदावार होता है, उसी के सहारे गुज़ारा होता है उनका। धान के अलावा कहीं-कहीं मकई (भूट्टा), खीरा (ककडी) या मिर्च की फसल होती है। चूहा इनका प्रिय खाद्य रहा है। एक भी चूहा दिख जाए तो उसे पकड़ने में पूरा समय और श्रम उसके पीछे लगाने में वे कतई कंजूसी नही करते। उन दिनों लोग कभी-कभार जंगल में जाकर शिकार कर लिया करते थे। ताड़ के अनेक झाड़ है चारों तरफ। ताड़ पकने के बाद नीचे जमीन पर गिरकर सड़ जाता है। पर ताड़ कोई भी नहीं खाता। हाँ, ताड़ के पेड़ का अन्य तीन उपयोग ज़रूर हैं। पहला, पत्तों से चटाईनुमा दरवाज़ा बनाना, दूसरा पेड़ को लंबाई से आधा काटकर नाली बनाना और तीसरा ताड़ी निकालना। ताड़ी यहाँ आबाल-

वृद्ध-वनिता सभी पीते है। हररोज़ पीते हैं। सुबह से लेकर रात तक पीते हैं। काफी घरों में महुआ की शराब भी तैयार की जाती है। 'खसरा' नाम का एक फल जंगल में पाया जाता है। कच्चे फल की तरकारी बनाई जाती है, किन्तु पकने के बाद स्वादिष्ट होते हुए भी लोग उसे नही खाते। पके फल के बीज से, जिसे स्थानिय भाषा में 'टोडा' कहते है, पारंपरिक तरीके से तेल निकाले जाते हैं। यह भी एक अनोखा तरीका है। वृक्ष का चैड़ा हिस्सा काटकर, उसे छिलकर बल्लियों के सहारे जमीन से कुछ ऊपर सुलाया जाता है, उसके ऊपर बीज रखकर दबाव से बीज पीसकर तेल निकल आता है। अन्य ज़रुरतों को पूरा करने के लिए है, इस इलाके का एकमात्र 'शापिंग माल' यानि कि बिशनोई भाइयों की दुकान। जहाँ दाल-चावल, तेल-नमक, बर्तन, कपड़े सब कुछ एक ही छत के नीचे मिलता है। 'शापिंग माल' या फिर 'सिंगल विंडो' की संस्कृति शहरी क्षेत्रों में पिछले दो दशक से शुरु हुई है। लेकिन आदिवासी, दुर्गम इलाके में कई दशकों से यह धारा प्रचलित है। धन का अभाव इन्हें धान बेचने को मजबूर करता है। खास कर नमक और तेल प्राप्त करने के लिए इन्हे पर्याप्त मात्रा में धान विनिमय में देना पड़ता है। यह एक प्रकार का शोषण नहीं तो और क्या है? जो परिवार ऐसा नहीं कर पाते हैं उन्हें लाल-चींटियाँ पीसकर ही नमक के बदले में इस्तेमाल करना पड़ता है? रोज़गार के नाम पर एक तो बीड़ी पत्तों के तोड़ने का काम और दूसरा हैं 'एमप्लायमेंट गैरंटी स्कीम'। यह दोनों ही सामयिक और स्वल्प कालावधि तक चलने वाला काम है। बस, यही दो समय है, जब ये लोग बाहरी दुनिया के लोगों के संपर्क में आते है। वरना, बाहरी दुनिया के साथ इनका दूर-दूर तक कोई संबंध नहीं होता। बरसात के दिनों में तो हम पोटेगाँव के तीन किलोमीटर परिसर के बाहर कहीं आ-जा नही सकते थे। सिमट जाती थी तब हमारी पूरी दुनिया इस छोटी-सी परिधि के भीतर।

स्त्री साक्षरता नहीं के बराबर है। साक्षर पुरुषों की संख्या भी नगण्य है। अनेक गाँवों में विद्यालय ही नहीं है। जहाँ है, बस प्राथमिक विद्यालय ही हैं। शिक्षा के स्तर के बारे में चर्चा न ही करें तो बेहतर है। क्यों न हो? एक या फिर दो शिक्षक। एक या दो क्लास-रूम। सभी कक्षाओं के विद्यार्थियों को एक साथ बैठाकर पढ़ाया जाता है। उसमें भी आए दिन छुट्टी घोषित कर दी जाती है। कभी गुरुजी बीमार हो तो छुट्टी, तो कभी गुरुजी की बीबी या बच्चा बीमार हो तो छुट्टी। गुरुजी पगार लेने के लिए गए तो छुट्टी, बरसात हुई तो छुट्टी, बरसात नहीं हुई तो छुट्टी। गर्मी ज़्यादा हो तो छुट्टी या फिर ठंडी पड़ रही हो तो छुट्टी।

आदिवासियों में भी अलग-अलग प्रकार होते है। गड़चिरोली जिले में मुख्यतः माड़िया-गोंड और परधान लोग बसते हैं। कुछ पंचकोन-सा मुखमंडल। सुडौल शरीर। यहाँ के अधिकतर लोग साँवले हैं। लेकिन आन्दमान के 'जरावा' आदिवासी जैसे काले नहीं है। सर्वसाधारण रूप से ये मध्यम कद के होते है। अपवाद है राजगौंड। राजगौंडों का कद काफी ऊँचा होता है। वे श्वेतांगी होते हैं। उनकी आँखों का रंग भूरा होता है। शारीरिक गठन में पुरुषों की तुलना में महिलाएँ ज़्यादा सशक्त लगती है। मानसिक तौर पर भी महिलाएँ ज़्यादा सक्षम हैं। सामाजिक दृष्टिकोण से भी स्त्रियाँ अग्रणी हैं। आगंतुको के साथ घर की औरत ही पहले निकलकर बातचीत करती हुई दिखाई देती है। साधारण तौर पर पुरुषों की तुलना में महिलाओं का स्थान आगे है। यहाँ तक कि अधिकांश क्षेत्रों में पुरुषों को ही अपनी प्रजनन क्षमता सिद्ध करनी पड़ती है। इसी वजह से संतान का जन्म होने से पहले बहुधा वे शादी नहीं रचाते हैं। जहाँ देश के अन्य हिस्सों में 'सेक्स रेशिओ' अर्थात एक हज़ार पुरुषों की तुलना में स्त्रियों की संख्या, तेज़ी से घट रही है, वहीं गड़चिरोली तथा अन्य आदिवासी क्षेत्रों में स्त्रियों की संख्या ज़्यादा या फिर करीब-करीब

एक जैसी ही है। लेकिन महिलाओं से जुड़ी एक बात मुझे हमेशा ही खलती रही। मासिक ऋतुश्राव के दिनों में इन्हे घर के भीतर रहने का कोई अधिकार नहीं होता है। इन्हे गाँव के बाहर, खेतों के बीच एक छोटी-सी कुटिया में जाकर रहना पड़ता है। न तो इन्हे योग्य आहार मिल पाता है और न ही स्वच्छता के लिए कोई उपाय है इनके पास। यहाँ तक कि ये चार दिन वे किसी का मुखदर्शन तक नहीं कर सकते।

अनेक समस्याओं से घिरी हुई हमारी ज़िन्दगी रही है यहाँ। मैं स्वयं को खुशनसीब समझता हूँ कि मुझे यहाँ सबसे अधिक ज़रुरतमंद लोगों के बीच रहकर उनकी सेवा करने का सुअवसर प्राप्त हुआ है। विविध कष्टों से जुड़ा दस वर्ष का मेरा सेवाकाल मेरी ज़िन्दगी का सबसे मूल्यवान और सबसे बेहतर एवं सर्वश्रेष्ठ समय रहा है। पगडंडी पर चलता हुआ मेरा यह जीवन धन्य हो गया है, क्योंकि -

पुसटोला से पेंढरी,
या राजोली-पोटेगाँव,
पगडंडी से जुड़ा हुआ था
थी हरे वृक्ष की छाँव।

दीनता थी, पर भोला मन था
हर मन में था प्रीत,
पगडंडी से जुड़ा हुआ था
एक मधुर संगीत।

हर मौसम में खुशियाँ थी
ग्रीष्म, वर्षा या शीत;
एक ही धुन में गाँव की वनिता
थी गाती अनेक गीत।

शाम ढले हर कुटिया में
जगमगा उठते दीप,
अंधकार था हर गाँव में
पर, न किसी मन के समीप।

****

®© डॉ. प्रबीर कुमार दास
संपर्क- prabir_das23@rediffmail.com

ओरणः पवित्रवन

जुलैच्या पहिल्या आठवड्यात आम्ही राजस्थानातील बारमेर जिल्ह्याला भेट दिली. तिथे श्री वेर माता मंदिराच्या वेर थान रस्त्यावर १८ हजार एकरवर पसरलेले ओरण पाहण्यास मिळाले, हे 'ढोक की ओरण' नावाने प्रसिध्द आहे. एका बाजूने ८०० फूट उंच दगडांची डोंगर रांग, त्याच्या पायथ्यालगत वाहणारी हंगामी वेर नदी आणि त्यासमोर वाळूंची डोंगर रांग असे कधीही न पाहिलेले विहंगम दृष्य पाहण्यास मिळाले.

महाराष्ट्रामध्ये जसे गावातील किंवा ठराविक परिसरातील देवाच्या नावाने जपलेल्या वनक्षेत्राला 'वनराई' म्हणतात. तसेच राजस्थानातील अश्या वनांना 'ओरण' म्हणतात. 'ओरण' हा शब्द संस्कृतमधील 'अरण्य' ह्या शब्दावरुन आलेला आहे.

भारतामध्ये अश्याप्रकारची (संरक्षित) वनक्षेत्रे सर्वच प्रांतात आढळतात आणि तेथील भाषेप्रेमाणे त्यांना वेगवेगळी नांवे आहेत जसे; बिहार व मध्यप्रदेशमध्ये 'सरणा', कर्नाटकमध्ये 'देवरबन' किंवा 'नागबन', तामिळनाडूमध्ये 'कोविलकाडू', केरळमध्ये 'काऊ' तर हिमाचलमध्ये 'देवबन'.

राजस्थानातील 'ओरण'ला ८०० ते ९०० वर्षांपूर्वीचा इतिहास आहे. पूर्वीपासून इथल्या जीवनाचा मुख्य आधार पशुधन असल्याकारणाने त्यांच्या चारा आणि पाण्याची व्यवस्था ही त्यांच्यासमोर मोठी समस्या होती. यावर उपाय म्हणून इथल्या समाजाने त्यांच्या जीविकेसाठी एक पवित्रवन तयार केले आणि त्या जमिनीला 'ओरण' नाव दिले. ही जमीन फक्त जनावरांच्या चरण्यासाठी आणि विश्रांतीसाठी राखीव ठेवण्यात आलेली आहे. ओरणवर इतर कोणतेही अनैसर्गिक काम होऊ नये, त्याचा अवैध वापर होऊ नये म्हणून ओरणला इथल्या इष्ट देवतेचे नाव देण्यात आले आहे. ओरणमधील झाडांचे अथवा प्राण्यांचे नुकसान केल्यास त्याला देव शिक्षा करतो अशी इथल्या लोकांची धारणा आहे. कदाचित याचमूळे ही वने अजून टिकून असावीत.

राजस्थानातील हवामानानुसार इथे 'गोचर' म्हणजेच गवताळ वन व काही विशिष्ट झाडांचा (गायरान) ही कुरणे गुरांना चरण्यासाठी तयार केली गेली .मोठी कुरणे जपलेली आहेत-समावेश असलेली छोटी, ही गावाची सामूहिक जमीन असते आणि याचे सर्व अधिकार हे त्या गावातील ग्राम प्रशासनाकडे असतातही जमीन . कोणाला विकता येत नाही किंवा इतर कोणत्याही कामास देताही येत नाही, असा इथला नियम - कायदा आहे . पावसाळा सुरु होण्यापूर्वी इथल्या भागातील चराई बंद केली जाते, जेणेकरुन पावसाळ्यात भरपूर प्रमाणात गवत उगवू शकेल आणि जनावरांना चारा मिळू शकेल. या भागात पारंपारिक वनस्पती आणि गवत वाढवले जाते . पश्चिम राजस्थानमध्ये सेवन, धामण, दुधी, गोखरू, मोथा, बेकर, कांतीली, खिप आणि सीनिया गवत मुबलक प्रमाणात आढळतेआच्छादन मिळते व ज्यामुळे जमीनीला वनस्पती . मातीची धूप रोखली जाते. तसेच या गवतांचे अनेक औषधी तसेच इतर वापरासंबंधी चे उपयोग ही खूप रंजक आहेत.

ओरणचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पावसाळयातील नदीचे पाणी व त्यासोबत वाहून जाणारी माती रोखण्याचे काम हे 'ओरण' करत असतात. त्यामूळे बहूतांश ओरणच्या आसपास हंगामी नदी किंवा 'खड़ीन' म्हणजेच बंधारे आढळतात. ज्यामुळे शेतीला, जनावरांना वर्षभर पाणी उपलब्ध राहील.

राजस्थान मध्ये या 'खड़ीन' ला अनन्यसाधारण महत्व आहे. इथल्या लोकांच्या म्हणण्यानुसार 'खड़ीन' मध्ये जैव कार्बन, पोटेशियम ऑक्साइड नैसर्गिकपणे मुबलक प्रमाणात उपलब्ध असते. त्यामुळे पहिल्या पावसानंतर म्हणजेच जुलै महिन्याच्या दरम्यान शेतकरी बाजरीचे पीक घेतात. त्यानंतरही जमिनीमध्ये ओलावा राहिल्यास ज्वारी, गहू तसेच मूग, तीळ, जीरा, मोहरी चे पीक घेतले जाते. अजून एक विशेष बाब म्हणजे इथे इसबगोल आणि एरंड ची लागवड सुध्दा व्यावसायिक तत्वांवर केली जाते. तसेच खड़ीन मध्ये शेती सुलभ आणि कमी खर्चाची असते. तसेच खड्काळ व वाळूमय जमीन सूध्दा लागवडी योग्य बनवण्यात या 'खड़ीन' चा मोठा हातभार आहे. अश्या अनेक गोष्टी या ओरणमूळे नैसर्गिकपणे घडत असतात .ओरण हे जैवविविधतेचे खूप मोठे भांडार आहेत तसेच ते अनेक भूप्रदेशांना जोडण्याचे तेथील वातावरणामध्ये .समतोलपणा राखण्याचे आणि पर्यायाने त्यांच्याशी संबंधित समुदायांचे व कृषी उपजीविकेचे पोषणही करतात.

ओरणमध्ये विविध स्थानिक जातींची जुनी आणि औषधी वनस्पती आढळतात. यामध्ये धोक्यात असलेल्या प्रजातींचा समावेश आहे. यात रोहिडा, बोर, कनकडी, कुमट, बाभूळ, ख़ेजडी, ख़ैर, मोह, जाल (पीलू), किकर आणि केर यांसारख्या स्थानिक जातींची जुनी झाडे आहेत. आक, खिंप, सानिया, बुर, नागफणी आणि थोर यांसारखी झुडपे आणि शेवन, धामण, मोथा, गोखरू, सांथी आणि डूब इत्यादी गवताच्या जाती येथे आहेत. हे ओराण तितर, हरीण, ससा, मुंगूस, कबूतर, चिमणी, मोर, नीलगाय, कोल्हा, गरुड, माळढोक इत्यादी सारख्या अनेक प्राणी आणि पक्ष्यांचे निवासस्थान आहे.

ओरण हे जैवविविधतेच्या खाणी आहेत. निसर्गाचे सौंदर्य, पशु-पक्ष्यांना आसरा देणारे हे ओरण मात्र गेल्या काही वर्षांपासून धोक्यात आले आहेत. अलिकडच्या काळात ओरणमधील झाडे - झुडपे मोठ्याप्रमाणात तोडली जात असून जेसीबीने खोदकाम सुरू आहे. वीज प्रकल्प, सौर कंपन्या आणि पवनचक्क्या उभारल्या जात आहेत. त्यांच्या वाढत्या दबावामुळे ही नैसर्गिक जंगले कमी होत आहेत.

जर ओरानचे अस्तित्व संपुष्टात आले तर?

निसर्गदेवतेने पृथ्वीवरील विविध प्रकारच्या भागांमध्ये त्याला पोषक असे नैसर्गिक धन मुक्तहस्ताने दिलेले आहे. मग ते राजस्थानसारख्या अति उष्ण तापमानातील सौंदर्य असो की उणे तापमानातील बर्फाळ प्रदेश असो. पृथ्वीवरील प्रत्येक घटकाला त्याच्या कित्तेक पिढ्यांना पुरेल इतका साठा त्याने विना मोबदला देऊ केला आहे. आपल्याला फक्त तो जपायचा आहे.

निसर्गाचा हा ठेवा जपणे गरजेचे आहे, नव्हे ते आपले आद्य कर्तव्यच आहे. त्याचा फायदा पृथ्वीवरील तमाम सजीव – निर्जीवांना होणार आहे.

****

®© तुषार सूर्यवंशी
पुणे
संपर्क- 8208117913

मला गांधीजी कधी भेटले...

गांधीजी भेटायची सुरवात इयत्ता नववी मध्येच झाली; कारण इतिहासाच्या पाठयपुस्तकातुन गांधी अभ्यासक्रमात होते पण ते गांधी जरा कडवट पातळीवरचे होते. सर्वसाधारणपणे त्या वयात गांधी फक्त विरोधाच्या पातळीवरच समजतील अशी पुस्तके हाती पडलेली. 'गांधी हत्या आणि मी', 'पच्चावन कोटींचे बळी' वाचण्यात आली.



जहाल विचारांचं त्याकाळात आकर्षण होतं. नवीन धुमारे फुटायला लागलेले जवान रक्त, तारुण्याकडील वाटचाल कुठेतरी त्या त्या वयात कांदबरी किंवा नाटयमय स्वरूपात नसल्यामुळे आवडत नसावेत. त्यामुळे गांधी मिळमिळीत वाटायचे. त्यातुनच हि असली पुस्तके अगदी वाचनाची सुरवात व्हायला आणी हाती पडायला, त्यामुळे सुरवात साहजीकच गांधी विचाराच्या विरोधानेच झाली.

बोलतांनाही आभाळ पर्वताएव्हढे मोठे असलेल्या गांधीजींना, मिस्टर गांधी वगैरे म्हणावं वाटायचं, एव्हढा तिटकारा. पण, परंतुं किंतु वाचनाच्या या वेडातच पुढे हाती आले 'फ्रिडम अँट मिडनाईट' हे मराठी अनुवादीत पुस्तक फाळणी व स्वातंत्र्याच्या दाहकतेचे अनुभव देणारे ठरले. त्यातले अनुभव, किस्से, प्रसंग प्रंचड कोसळविणारे आहेत. इथे फाळणी समजली तसे गांधी ध्यानात यायला लागले. जसजसा काळ पुढे येत गेलं, तसतसा महाविदयालयात शिकत असताना गुरूवर्य विष्णू सुर्वे सर यांचे 'गांधी यांचे ब्रम्हचर्य' या विषयीचे व्याख्यान ऐकले. मग वाटायला लागले कि गांधी वाचायला पाहिजेच याचे कारण म्हणजे गांधी समजून घ्यायचे तर गांधीजीच वाचले पाहिजे, नेहरू समजून घ्यायचे तर नेहरूच वाचले पाहिजेत, डॉ बाबासाहेब समजुन घ्यायचे तर बाबासाहेबच वाचले पाहिजेत. थोडी फार सुरवात झाली पण, तरीही महाविदयालयीन जीवनात गांधी वाचायचा म्हणजे जरा अवघडच गोष्ट, पण एक पुस्तक त्याकाळी हाती आले ते म्हणजे नलिनी पंडीत यांचे 'गांधी'. मग मात्र गांधी हळूहळू समजायला लागले.

खरी गांधीजींची ओळख झाली ती शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर या ठिकाणी एम ए राज्यशास्त्र शिकत असताना. जेष्ठ विचारवंत डॉ अशोक चौसाळकर यांचे व्याख्यानातून, डॉ वासंती रासम, डॉ मेधा नानीवाडीकर, डॉ पाटील मँडम यांचे मांडणीतून. पुढे लवकरच नोकरी लागली; तिथे गुरुवर्य डॉ अरविंद नवले सर यांचेशी चर्चा करताना त्यांनी दोन पुस्तके दिली, अंबरीश मिश्र यांचे 'आणि गंगेत गगन वितळले' व जगन फडणिसांचे 'गांधी मानव महामानव' या पुस्तकांनी मात्र सगळे समज गैरसमज दूर केले.

पुढे शिकवायलाच गांधी अभ्यासक्रम होतेच, त्यात गांधी अनुभवता यायला लागले. हळूहळू गांधी उमगत गेले. महात्मा गांधी नावाची पुरस्कृत आणि तिरस्कृत व्यक्ती जगाच्या पाठिवर सापडणे शक्यच नाही. मग या विषयावर लिहते झालो त्यातुन राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय संशोधन पेपरमध्ये 'गांधीजी व शाश्वत विकास', 'गांधी विचारांची सदयकालीन आवश्यकता', 'गांधी विचारांना नवीन साधनांची आवश्यकता' असे पेपर लिहीत गेलो. साऱ्यांमधून २०१६ साली

सामाजिक तिर्थक्षेत्रांच्या भेटी करीत असताना हेमलकसामध्ये प्रत्यक्ष प्रकाश भाऊंची झालेली. भेटीत पाचच मिनिटे झालेले बोलणे व त्यांनी बाबांच्या सावली खाली उभारलेला हेमलकसाचा अनेक पांथस्तांना आश्रय देणारा डेरेदार वृक्ष अनुभवला तसेच आनंदवन व गांधीजींचा वर्धा येथील आश्रम पाहिला प्रत्येक जागा, वस्तु, पाहिल्या स्वतामध्ये एक नवीन बदल घडून आल्याचे तिथपासुनच जाणवायला लागले कि , गांधी म्हणतात, देश किंवा समाज आपल्याला जसा असावा वाटते, तसे आपण आगोदर वागायला करायला पाहिजे; म्हणजे कोणत्याही गोष्टीची सुरवात आपल्या स्वतापासून करायची. खरेतरे हि सर्वात अवघड गोष्ट पण प्रयत्न करीत करीत गांधी नावाचे गुढ समजुन घेण्यासाठी प्राचार्य डॉ देशमुख सर यांचे मार्गदर्शनाखाली महाविदयालयात महात्मा *गांधी विचारधारा प्रमाणपत्र* अभ्यासक्रमाचे आयोजन करून गांधीवादी मान्यवरांची व्याख्याने आयोजित केली, त्यात अन्वर राजन, सतिष देशपांडे, डॉ पंडित लांवड , डॉ सुशिल शिंदे, मा किशोर बेडकीहाळ याचा समावेश होता.

गांधी समजून घेण्याच्या प्रवासाच्या वाटचालीत सर्वात जास्त भावले ते म्हणजे सुरेश व्दादशीवार यांचे ‘गांधी व त्यांचे टिकाकार’ हे पुस्तक या पुस्तकांने मस्तकातील उरली सुरली जळमटे काढून टाकण्यास हातभार लावला, त्याच बरोबर गांधी समजून घेताना हे सोलापुर येथे झालेले व्याख्यान. तसेच युटयूबवरील ‘आम्ही सारे फोंडेशनची’ व्याख्याने ऐकताना किंवा ‘गांधी मरत का नाही’ चंद्रकांत वानखेडे यांचे व्याख्यान ऐकताना, प्रा सुर्वे यांनी ‘गांधीचे ब्रम्हचर्य’ हे विचारांच्या पातळीवर कसे होते हे पटवून देताना ते अगदी अलिकडच्या काळातील लुई फिशरने लिहलेले चरीत्र असो किंवा गांधीवादी विचारवंत किशोर बेडकीहाळ यांचे व्याख्यान असो अथवा तुषार गांधी व शेषराव मोरे यांनी फाळणी व गांधीजी याबाबत मांडणी वाचताना मनातले गांधी अधीकच प्रगल्भ होत गेले.

एक ध्यानात आले कि गांधी मारून मरणारा माणूस नाही जेव्हढा माराल तेव्हढा उसळी घेवून वर येत राहतील.

कुससुमाग्रजांची ‘प्रवाशी पक्षी’ या मधील ‘अखेरची कमाई’ हि कविता जरी खरी असली आणि गांधीना कुणिही नसले तरी हा ‘गांधीबाबा यावश्चंद्र दिवकरौ’ सर्वांचाच राहणार यांतही शंका नाही.

****

®© प्रा विश्वनाथ महादेव आवड
शंकरराव मोहिते महाविदयालय अकलूज
संपर्क - 9422028838

मन करा रे प्रसन्न...

'मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण' मन के हारे हार है! मन के जीते जीत! अशा उक्ती आपण नेहमीच वाचतो ,ऐकतो .प्रत्यक्षात मात्र शारीरिक आरोग्याविषयी आपण जेवढे सजग आहोत तेवढे मानसिक आरोग्या विषयी नाही हे वास्तव आहे. शरीराला आजार होऊ शकतो, शरीराला डॉक्टरांची आणि औषधउपचारांची गरज पडू शकते तशीच मनालाही पडू शकते हा विचार समाजामध्ये अजूनही रुजला नाही . उदा- एखाद्या व्यक्तीला छातीमध्ये वेदना होत असतील तर छातीमध्ये वेदना होतात म्हणजे या व्यक्तीला हृदयविकाराचा झटका आलेला असू शकतो , परिणामी त्या व्यक्तीच्या जीवाला धोका आहे हा विचार करून लगेचच त्या व्यक्तीस हॉस्पिटलमध्ये दाखल केले जाते, याउलट एखादी व्यक्ती सतत सांगत असते मला निराश वाटते, बैचेन वाटते, माझी जगण्याची इच्छा राहिली नाही तेव्हा मात्र आपण त्या व्यक्तीकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करतो. याचं कारण म्हणजे मानसिक आरोग्याविषयी समाजामध्ये असणारे प्रचंड अज्ञान हेच आहे. कोव्हीडच्या दोन वर्षाच्या कालावधीमध्ये कोव्हीडनी झालेल्या मृत्यूपेक्षा आत्महत्येतून झालेल्या मृत्यूचू प्रमाण अधिक आहे ,पण यावर कोणी गांभीर्याने विचार करत नाही. आजही एखाद्या व्यक्तीला मानसोपचार तज्ञांकडे जावे लागले तर ती व्यक्ती जणू वेडीच आहे असे ग्रह केला जातो. एकूणच समाजाचा मानसिक आजाराकडे पाहण्याचा दृष्टिकोन अतिशय दुषित असल्यामुळे मानसिक तक्रारींची कुठेही वाच्यता केली जात नाही, त्यावर वेळच्यावेळी उपचार होत नाहीत, परिणामी सुरुवातीच्या काळामध्ये किरकोळ असणाऱ्या आजाराचे गंभीर आजारामध्ये रूपांतर होत जाते. हे टाळण्यासाठीच मानसिक स्वास्थ्याविषयी जनजागृती होणे ही काळाची गरज आहे.



भारतीय संस्कृतीने मन आणि मन स्वास्थ्य यांना अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे .भारतीय तत्त्वज्ञान, अध्यात्म, हिंदू -बौद्ध - जैन या सर्व धर्मशास्त्रानी मनाला केंद्रीभूत ठेवून विचार मांडला आहे. किंबहुना मनाचा जितका विचार भारतीय धर्मशास्त्राने केला तितका जगातील इतर कोणत्याही धर्मशास्त्रामध्ये केला असावा असे वाटत नाही. आज मानसिक आजारावर सर्वोत्तम उपचार करणारी ध्यानधारणा ही भारतीय संस्कृतीने जगाला दिलेली देणगी आहे. वेद उपनिषदे यांपासून अगदी सुभाषितांपर्यंत जिथे तिथे सर्वत्र मन आणि मनस्वास्थ्य याचा विचार आपल्या संस्कृतीने केलेला आहे.

भगवद्‌ गीता हा तर मानसशास्त्रावरचा सर्वश्रेष्ठ ग्रंथ समजला जातो आणि श्रीकृष्ण हा सर्वश्रेष्ठ मानसतज्ञ समजला जातो, याचं कारण गीता आणि श्रीकृष्णाचा उपदेश हा मानवी मन भावभावना विचार यांच्यावरच केंद्रीभूत आहे.

वैद्यकीय शास्त्राच्या दृष्टीने विचार करायचा झाल्यास आयुर्वेदाने हजारो वर्षांपूर्वीच मनाची संकल्पना मांडली . आयुर्वेदाने मनाला ज्ञानेन्द्रिय आणि कर्मेंद्रिय अर्थात उभेेन्द्रिय मानले. मनाचे गुणदोष ,मनाचे विकार त्यावरील समस्या, उपाय याविषयी आयुर्वेदाने विस्तृत उहापोह केला आहे.

आधुनिक वैद्यक शास्त्राने मात्र सुरुवातीच्या काळामध्ये मन ही संकल्पना मान्य केली नाही. आधुनिक वैद्यकशास्त्र हे प्रत्यक्ष परिमाणावर आधारित असल्यामुळे, जी गोष्ट दिसत नाही ती अस्तित्वात नाही हा विचार होता. नंतरच्या काळामध्ये मात्र शरीरामध्ये न दिसणारी पण शरीर स्वास्थावर परिणाम करणारी एखादी गोष्ट आहे हे आधुनिक वैद्यक शास्त्राने मान्य केले आणि त्यातूनच मनोविकारशास्त्र विकसित होत गेले. आजच्या काळात मानसिक आजारांसाठी समुपदेशन- मानसोपचार-वर्तनोपचार अशा अनेक शाखा आज विकसित झालेल्या आहेत. ही स्वागतार्ह बाब आहे.

आजच्या स्पर्धात्मक जगामध्ये प्रत्येक व्यक्ती ताणतणावाखाली जगत आहे. अगदी बालवाडीमध्ये शिकणाऱ्या मुलापासून ते वृद्ध व्यक्तीपर्यंत प्रत्येकजण कुठल्या ना कुठल्या प्रकारच्या मानसिक तणावाखाली आहे.किशोरवयीन मुलांमध्ये आणि तरुणांमध्ये मानसिक अस्वास्थ्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. मुले दिवसेंदिवस हट्टी, हेकेखोर,बंडखोर ,रागीट बनत चालली आहेत. समाजामध्ये घडणाऱ्या सर्व प्रकारच्या नकारात्मक घटना, गुंडगिरी मारामारी चोरी बलात्कार खून या सर्व गुन्हेगारी प्रवृत्तींचे मूळ हे मानसिक आणि भावनिक असंतुलन हेच आहे.

आजचे पालक खूप सुजाण आणि सजग झालेले आहेत. मुलांच्या शारीरिक स्वास्थ्याच्या दृष्टीने ते काळजीही घेतात .मुलांना प्रोटीन विटामिन्सचा खुराक देतात पण मानसिक खुराकाचं काय? त्याकडे मात्र दुर्लक्ष केल् जातं. शरीराची जडणघडण जेवढी महत्त्वाची तेवढीच मनाची ही आहे हा विचार घरोघरी रुजला पाहिजे. मनाची निकोप जडणघडण होण्यासाठी मुलांवर चांगले संस्कार करणे, त्यांना चांगले विचार देणे ,त्यांना वेळ देणे, त्यांना चांगली संगत मिळणे इथे पासून ते त्यांना समजावून घेणे,विश्वास देणे या सर्व गोष्टी मुलांच्या मानसिक स्वास्थ्याच्या दृष्टीने अतिशय गरजेच्या आहेत.

मनाचे आरोग्य म्हणजे नेमकं काय आणि ते बिघडतं कशामुळे हे आपण साध्या सोप्या भाषेमध्ये समजून घेऊया.आपल्या मेंदूमध्ये शेकडो प्रकारची रसायने अर्थात केमिकल्स असतात त्यापैकी काही केमिकल्स उदाहरणार्थ सिरेटोनीन, इंडोर्फिन, डोपामाईन ऑक्सिटोसिन हे केमिकल्स मनाच्या आरोग्यासाठी अतिशय महत्त्वाचे असतात. या केमिकल्सचा समतोल असेल तर मनामधील विचार आणि भावना यांचा समतोल असतो आणि त्यातून योग्य कृती घडतात. याउलट या केमिकलचा समतोल बिघडला की विचार आणि भावनांचे संतुलन बिघडते.

जसे शरीरामध्ये रक्तदाब ,साखर ,चरबी यांचे प्रमाण कमी जास्त होऊ शकते तसेच मेंदूमधील या केमिकलचे प्रमाण सुद्धा कमी जास्त होऊ शकते. हा केमिकल्सचा समतोल सुधारण्यासाठी कुटुंबीयांचे प्रेम , समजूतदारपणा तर लागतोच पण कधी कधी समुपदेशन तर कधी मानसोपचारतज्ञांची मदत सुद्धा घ्यावी लागते.

मानसिक आजारांच्या कारणांचा जर विचार करायचा झाला तर अनेक कारणे आहेत. अनुवंशिकता, शरीरामधील हार्मोनल बदल, वयानुसार होणारे बदल, आयुष्यात घडणाऱ्या घडामोडी, या सर्वांचा मेंदूमधील रसायनांवर,मनावर

परिणाम होत असतो. योग्य निदान आणि योग्य वेळेत उपचार घेऊन निश्चितपणे यातून बरे होता येते हे निश्चित.कुटुंबातील व्यक्तींचे प्रेम, विश्वास, जिव्हाळ्याचा मित्रपरिवार, नियमित व्यायाम आणि संतुलित आहार, मनसोक्त हास्य, सूर्यप्रकाश, निरपेक्ष वृत्तीने समाजासाठी केलेले कामे, नियमित ध्यानधारणा या साध्या सोप्या गोष्टीही मानसिक स्वास्थ्य टिकवून ठेवण्यासाठी उपयुक्त ठरतात .

पूर्वीच्या काळी एकत्र कुटुंब पद्धतीमुळे घरातील सर्व लोकांना एकमेकांचा आधार होता, संस्कारांचे विद्यापीठ घरातूनच चालायचं, गरजा कमी होत्या त्यामुळे जीवघेणी स्पर्धा नव्हती ..आज मात्र आपण अतिशय धकाधकीच्या आणि स्पर्धात्मक युगामध्ये जगत आहोत. हा बदल अपरिहार्य आहे, आणि या सोबत राहून आपले मानसिक स्वास्थ्य जपणं हे इथून पुढच्या काळामध्ये एक आव्हान बनून राहणार आहे. पण मानसिक आरोग्य विषयी आणि आजाराविषयी सकारात्मक दृष्टिकोन ठेवला तर निश्चितपणाने आपण आपले आणि जवळच्या लोकांचे मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवू शकतो.

एक काळ असा होता जेव्हा स्नायूंची ताकद ज्याकडे जास्त तो सर्वश्रेष्ठ आणि सर्व शक्तिमान समजला जायचा, त्यानंतरच्या काळामध्ये पैशाची ताकद ही सर्वश्रेष्ठ समजली जायची. आजचा काळ आणि इथून पुढचा काळ मात्र ज्या व्यक्तीकडे मनाची ताकद आहे फक्त आणि फक्त त्या व्यक्तींचा असेल याविषयी शंका नाही.

म्हणूनच आपण सर्वांनी संकल्प करू.. मानसिक स्वास्थ्या विषयी सजग राहू.. एकमेका सहाय्य करू आणि मानसिक स्वास्थ्य जपू!

****

®© डॉ मनीषा भोजकर.
आयुर्वेदतज्ञ, मानसतज्ञ आणि समुपदेशक
संपर्क - 9970522581

चाकोरी बाहेरून चालताना...

आयुष्यात अनेक वेळा आपण चाकोरीबद्ध विचार करत असतो, कारण चाकोरीच्या बाहेरून चालताना होणार त्रास , वेगळेपणा, समाजाचे शब्द हे सोसण्याची आपली तेवढी तयारी नसते. त्यामुळे त्याच त्या रेंगाळलेल्या वाटेने आपण नेहमी चालत असतो. पण कधीतरी आपली स्वप्ने , आपले विचार आपणास गप्प बसूच देत नाहीत, ते आपल्याला नेहमी त्यांच्याकडे खेचत असतात. आपल्याला एखाद्या सामाजिक क्षेत्रातील आवड व जाणीव हे ही आपल्याला त्या चाकोरीच्या बाहेर पडायला भाग पाडते. आणि शेवटी ही जाणीवच आपल्याकडून काम करून घेते. त्याचप्रमाणे निसर्ग आणि वन्यजीव संवर्धनाची जाणीवच मला त्या चाकोरीच्या बाहेर पडून जगण्यासाठी भाग पाडत होती.

सर्वांसोबत मीही अण्णासाहेब डांगे कॉलेजला ॲडमिशन घेतले आणि माझाही इंजिनीरिंगचा प्रवास सुरु झाला. ऑटोमोबाईल शाखा असली तरी अजून दुचाकीचेही लायसन्स आमच्याकडे नाही तो भाग वेगळा. सगळ्यांसोबत M1, M3, APM च्या ऑक्टोबर , मार्चच्या वाऱ्या आम्हीही केल्या. कॉलेजचा कट्टा कधी सुटला नाही, टेक्नॉलॉजीमध्ये पाहिजे तसा इंटरेस्ट कधी वाटला नाहीच. त्यातून सोबत झाली ती अवलिया मित्रांची आणि तिथून आणखी एक आनंदाचा झरा वाहू लागला. मग तो मेडिकल मधला राजा असुद्या नाहीतर मग सांगली येथील निसर्ग संस्थेतीळ मित्र असू द्या.

आयुष्यात पहिल्यापासून समाजसेवा, प्राणी, पक्षी यांच्याबद्दल प्रेम हे होतेच, लहानपणीच आर्मी मध्ये जाऊन देशसेवा करण्याचा प्रयत्न नक्कीच केला; पण एकुलता एक असल्यामुळे तेही एक स्वप्नच राहिले, पण इथे राहून पण आपण खूप काही करू शकतो हेही लक्षात आले. त्यातूनच सांगलीच्या नेचर काँझर्वेशन सोसायटीच्या तबरेज खान यांची ओळख झाली आणि आयुष्याला कलाटणी मिळाली. निसर्ग , वन्यजीव यांच्याबद्दल माहिती मिळत गेली आणि त्यांचे संवर्धन करणे मी काळाची गरज आहे हेही समाजत गेले. खरे तर तबरेज खान यांच्यामुळेच मला वन्यजीव व निसर्ग यांबद्दल पूर्ण माहिती मिळत गेली.त्यांच्या विचारातून आणि प्रत्यक्ष केलेल्या कामांमधून माझेही विचार परिपक्व होऊ लागले. तिथेच मी साप पकडायला शिकलो, पक्षांबद्दल माहिती मिळत गेली, त्यांचे महत्व समजत गेले तसेच वन खात्याची कामे , अधिकार ही माहित होत होते. आणि इथे शिकलेल्या माहितीचा वापर आपण राहतो तिथे करावा ही कल्पनाही मनात घर करत होती. आणि एक ठिणगी पडलीच.. सहज लेक्चर मध्ये असताना एक कल्पना सुचली की कॉलेजमध्ये जेवढे सर्पमित्र आहेत त्यांनी एकत्र यावे,त्यासाठी एक ग्रुप असावा असे वाटत होते. ठरले तर मग.. एक निसर्गसंवर्धनासाठीचा ग्रुप काढायचा. नाव ठरले की नेचर क्लब द्यायचे. सगळ्या मित्रांना लेक्चर मधूनच मेसेज पोहोचले. आणि सुरुवात झाली चाकोरी बाहेरच्या आयुष्याला..!

पकडण्यासाठी फोन येऊ लागले, तर कोणी जखमी पक्षी आणून देत होते. साप पकडुन तो लगेच सोडून देण्यात येत होते व त्याची नोंद ठेवली जात असे.कधी दुपारी तर कधी रात्री 2-3 वाजताही फोन यायचे, जो मित्र जवळ असेल तो जाऊन साप पकडायचा व सोडून द्यायचा. काही वेळा एखादा जखमी पक्षी कोणीतरी आणून द्यायचा. त्याची ट्रेटमेंट आमच्या रूममधेच चालायाची. कधी 2 दिवस तर कधी 8 दिवस पक्षी रूम मधेच असायचा. एकदा का त्याच्या पंखात बळ आले,की त्याला निसर्गात मुक्त केले जात असे. एखाद्या पक्षाला मुक्त करतानाचा आनंद खरेच अवर्णनीय असे. त्यावर्षी जवळ जवळ 200 पेक्षा जास्ती साप आणि 60-70 पक्षांच्या शस्त्रक्रिया झाल्या, त्याही फक्त कॉलेज आणि आसपासच्या परिसरातून.. तसेच कॉलेज परिसरात असलेल्या घोरपडीलाही जीवदान दिले. तसे पाहिले तर घोरपड पकडण्याची

आमची पहिलीच वेळ होती, व ती 4 फूट एवढी लांब होती. पण आम्ही सर्वजण मिळून तिला पकडण्यात आणि लांब नेऊन सोडण्यात यशस्वी झालो.

नागपंचमीला क्लबच्या माध्यमातून पब्लिक स्कूलच्या मुलांसाठी साप आणि अंधश्रद्धा या विषयावर प्रेसेंटेशन घेण्यात आले.तसेच मीही अनेक वेळा पर्यावरणाच्या लेक्चरच्या वेळी साप, पक्षी याविषयी प्रेसेंटेशन द्यायचो , जनेकरून त्याबद्दल लोकांना माहिती मिळेल व तेही या संवर्धनाच्या कार्यात सहभागी होतील. गणपती मधेही त्यासाठी चांगली संधी मिळाली, त्यावेळी आम्ही स्वच्छता अभियान म्हणू पथनाट्य गणेशाच्या आगमनाच्या वेळी आष्टा शहरात आणि कॉलेज मधेही सादर केले. तसेच गणपतीच्या 10 दिवसांसाठी " दुष्काळ " हि थीम बनवून पाणी वाचवा पाणी जिरवा चा संदेश दिला, औदुंबर ला जाऊन निर्माल्य संकलन केले तसेच गणेश मूर्ती दान करावी यासाठी प्रयत्न केले. कॉलेज मध्ये अनेक वेळा पक्षीनिरीक्षण, वृक्षारोपण यांसारखे कार्यक्रम आयोजित करून जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

हे सगळे करताना थोडे कॉलेजकडे दुर्लक्ष नक्कीच होत होते.कधी कॉलेजला बसायचो तर कधी नाही.डिफॉल्टर लिस्ट मध्ये तर नाव नाही असे कधी

झालेच नाही.कधी कधी साप पकडण्यासाठी फोन आला तर लेक्चर मधून उठून जायचो. पण शिक्षकही त्यावेळी तेवढीच मदत करत होते, मीही त्याचा गैरफायदा कधी घेतला नाही. त्यातच फोटोग्राफीचा छंद जडला. साप , पक्षी,निसर्ग यांचे फोटो काढू लागलो. याची सुरुवात आपण केलेल्या कामांचा डेटा आपल्याकडे असावा यासाठी मी फोटो घ्यायचो, आणि नंतर पक्षी ,प्राणी समजत गेले , त्यांचा अधिवास समजू लागल्याने आणखीनच त्यात भर पडली. आणि आपण या फोटोचा वापर लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठीही करू शकतो याची जाणीव झाली. हीच सवय संवर्धन फोटोग्राफी मध्ये बदलू लागली. अनेकदा मुले एक सर्पमित्र, प्राणीमित्र, फोटोग्राफर म्हणूनच ओळखू लागले होते. प्रत्येकाचा बघण्याचा दृष्टिकोन बदलत होता. त्यावेळी काही लोक नावे ठेवण्यात व्यस्त होते तर काही अभिमानाने बघत असत. त्यातच सांगले सर, कपिल सर यांनी आमच्यावर विश्वास दाखवला नसता तर आम्ही एवढे क्वचितच करू शकलो नसतो हेही खरेच. चाकोरीबाहेरून चालताना अशा माणसांमुळे खूप मोठा पाठिंबा नक्कीच मिळतो.

त्यातच मोहिमांमुळे ट्रेकिंगचा छंद वाढत गेला, पक्षीनिरीक्षणाला फिरू लागलो. असेच एकदा मल्लिकार्जुनच्या डोंगरावर जाण्याचा योग आला. तेथील मंदिर, वातावरण, आणि जैवविविधता पाहून थक्कच झालो. तिथेच पहिल्यांदा मला गरुड पक्षी पाहायला मिळाला. गरुड पक्षाबद्दल काहीच माहिती नव्हती,पण तरीही प्रत्येक आठवड्याला त्याच्या

घरट्यांचे निरीक्षण करू लागलो, माहिती गोळा करू लागलो, त्याच्या प्रत्येक हालचालींचे फोटो घेत गेलो. असे करत 6 महिने झाले आणि मी 3 घरट्यांचे निरीक्षण करायचो. प्रत्येक आठवड्यात कुठे भेट द्यायची हे ठरलेले असायचे, ज्यावेळी सगळं हॉस्टेल झोपलेले असायचे. तेव्हा मी आणि सौरव पहाटे 5-6 वाजता उठून पठारावर जाऊन बसायचो, पक्षीनिरीक्षण करायचो. खूप मोलाचा डेटा गोळा झाला.त्या गरुडाच्या जीवनातील सगळे पैलू आम्ही डोळ्याने बघू शकलो. त्याचे पिल्लांबद्दल प्रेम पाहू शकलो, त्याचे चित्रीकरण करू शकलो हे भाग्यच...!

मी या गरुडाचा पूर्ण जीवनपट चित्रित केला. त्यांच्या मिलनापासून ते त्यांची पिल्ली घरट्यातून उडून जाईपर्यंत सगळे फोटो आणि माहिती मी चित्रित केली. इंजिनेरींगच्या प्रोजेक्टसाठी जेवढे कष्ट मी घेतले नाहीत, तेवढे कष्ट मी या गरुडाच्या संशोधनासाठी घेतले. आणि त्यात चांगलेच यशही मिळाले. पुढे जाऊन वन खात्याला मदतीला घेऊन मी त्या पक्षाची 2 घरटी वाचवण्याचा प्रयत्न केला आणि तो यशस्वीही झाला.

कधीतरी विचार करू लागलो तर फार समाधान वाटते की चाकोरी बाहेर पडून आपणही काहीतरी जीवन जगलो, संवर्धनाच्या कामात राबलो.

एक बी पेरले , त्याचा सांभाळ केला आणि त्याचा आज वटवृक्ष झालेला पाहताना आज आनंद नक्कीच होतो. आजही कॉलेजमध्ये नेचर क्लब हा ग्रुप सुरु आहे आणि आजही मुले त्याच्या माध्यमातून निसर्ग संवर्धनाचे काम करत आहेत हे पाहून अभिमान नक्कीच वाटतो..

खरंच,आत्ताच्या या स्वार्थी दुनियेत एखाद्या प्राण्यावर, पक्षांवर प्रेम करणे, त्यांच्या संरक्षणासाठी आयुष्य वेचने म्हणजे वेडेपणाचे ठरेल.. आत्ता प्रत्येक जण स्वतःच्या सुखाच्या मागे लागलेला असताना एखादा जर या प्राण्यांसाठी, देशासाठी जगत असेल तर खूप विचित्र वाटत असेल.. एखाद्या दिवशी त्याच माणसाचं सन्मान केला जातो. लोक त्याची वाहवा करतील पण उद्याच विसरून परत स्वतःच्या आयुष्यात गुंग. पण आपणही त्या कार्याला हातभार लावावा असे कधी विचार करणार हे लोक..?त्या नि:स्वार्थपणे काम करण्यातून मिळणार आनंद हे लोक कधी अनुभवनार.?

भगवदगीता खरे सुख तर समर्पण करण्यातच सांगितले आहे..मग या प्रवाहाप्रमाणे वाहत जाणाऱ्या दुनियेचा विचार करून का शांत बसावे... कधीतरी चाकोरीच्या बाहेर पडून आयुष्य जगावे..

म्हणूनच हे कितीपत खरे आहे माहित नाही,पण माझ्यासाठी तरी...

“ Conservation is life... “

****

®© केदार ढेपे
सांगली
संपर्क – 7387742827

नकोशी

नुकताच श्रावण महिना लागलेला. पाण्याची रिमझिम तर कधी उघडझाप चालू होती. रात्रीचे नऊ वाजले असतील. नुकताच पाऊस पडून गेलेला. थंडगार वारा सुटलेला होता. सळसळणाऱ्या पानांच्या आवाजासोबतच बेडकांचा 'डरावsss, डरावsss' तर रातकिड्यांचा 'किर्रर्र किर्रर्र' आवाज भयाण शांततेला चिरत होता.

भर पावसाळ्याचे दिवस! अमावस्येची भयाण काळीकुट्ट रात्र! समोरचा रस्ता तर सोडाच पण अगदी समोर जरी कुणी येऊन उभं राहिलं तरी कुणी दिसणार नाही एवढं ते घनदाट जंगल आणि त्यात भर घालणारा काळाकुट्ट अंधार. त्याच जंगलातुन सलवार सूट घातलेली, गळयात ओढणी गुंडाळलेली, लांबसडक केसांची वेणी घातलेली, पायात स्लीपर घातलेली सावळीशी छटा असणारी 'ती' मात्र झपाझप पावलं उचलत भरभर चालत होती. जागोजागी पाण्याचे डबके साचलेले तरीही कधी अडखळत तर कधी ठेच लागून ती पडायची पण लगेच तोल सावरत उभी होऊन पुन्हा चालायची. मधेच पायाखालून 'सर्रर्र सर्रर्र' आवाज करीत जाणारे साप. जंगली श्वापदांचा 'कुईsssकुईss' आवाज. मधेच वाघाची जंगल भेदून काढणारी डरकाळी. पण ती मात्र आपल्या लयीत चालत होती. "तिला" मात्र ,ना कुणाची भीती वाटत होती, ना अंधाराची तमा! कारण तिला सुद्धा माहिती नव्हते ? आपण कोठे चाललोय? जिकडे पाय नेतील तिकडे जायचे हा निर्धार करूनच आज ती घरून निघाली होती.

'ती' म्हणजेच कथेची नायिका 'नकोशी' चालत चालत नकोशी एका उंच टेकडीवर पोहोचली. क्षणभर उभं राहून तिने लांब श्वास घेतला. खाली खोलवर पसरलेली दरी आणि ती उंच टेकडीवर उभी. फक्त एका पावलाचं अंतर बाकी होतं तिला खाईत झोकून द्यायला. पुढचं पाऊल टाकलं की आपला अंत हा निश्चित हे माहीत असूनसुद्धा तिच्या चेहऱ्यावर तसूभर सुद्धा भीती नव्हती. तिने परत एकदा सभोवार बघितलं. बहरलेली हिरवी सृष्टी डोळ्यात साठवून घेतली. परत एकदा दीर्घ श्वास घेतला दोन्ही हात जोडून वर आकाशाकडे बघत ,

"आई मला क्षमा कर!"

असं म्हणत, त्या खाईत स्वतःला झोकून देणार एवढ्यात दोन बळकट हातांनी तिला मागे ओढलं. तिने हात झटकायचा प्रयत्न केला, पण तिचे नाजूक हात बळकट हाताच्या वेढ्यात सापडले होते, जे सहजासहजी सुटणार नाही याची नकोशीला कल्पना आली. तरीही परत एकदा प्रयत्न करावा म्हणून तिने आढेवेढे घेत त्याच्या तावडीतून सुटायचा प्रयत्न केला. शेवटी असहाय होत ती जिवाच्या आकांताने ओरडली,

"सोडा मला का धरून ठेवलंत? मला मरायचयं. नाही जगायचं मला! सोडा सोडा मला."

तिला असं रडताना बघून त्याने आपली पकड ढिली केली. तिने परत एकदा पळायचा प्रयत्न केला. ती धावू लागली. त्याने तिला परत पकडलं. तिने वळून मागे बघितलं आणि विचारलं,

"कोण तुम्ही? का वाचवलंत मला? मला नाही जगायचंय."

म्हणतच तिने आपला चेहरा दोन्ही हातात झाकत रडायला सुरुवात केली. त्याने तिला रडू दिलं. रडल्यानंतर ती थोडी सावरली, आपले डोळे, चेहरा ओढणीने पुसत तीने परत त्याला विचारलं,

"कोण तुम्ही? का वाचवलंत मला?"

ती रडत असताना विक्रांत सुद्धा बाजूच्या दगडावर शांत बसला होता. तिच्या आवाजाने त्याने तिच्याकडे बघितलं. 'तो' जवळपास तीस-पस्तीस वयाचा उमदा तरुण. दाढी वाढलेली पण व्यवस्थित असं राहणीमान. तो तिला म्हणाला,

"माझं नाव विक्रांत. मी बाजूच्याच गावात राहतो, आज नेमकी माझी बाईक बंद पडली म्हणून गावात जाणारा शॉर्टकट रस्ता जंगलातून जातो म्हणून मी इकडे आलो. जंगलातून जाणारी पायवाट माझ्या परिचयाची. अंधार जरी असला तरी पाय बरोबर वाट धरतात. तुला माहिती आहे, या जंगलात जंगली श्वापदांचा वावर आहे? तरीही तू ही वाट निवडली!

पण तू इकडे कशी? ती पण एकटी? गावात सुद्धा तुला कधी पाहिलेलं आठवत नाही म्हणजे तू या गावात राहणारी नाही हे मात्र निश्चित. आत्महत्येचा विचार करून निघाली ना तू? ठीक आहे कर आत्महत्या, नाही अडवणार मी तुला."

तिने त्याच्याकडे आश्चर्याने बघितलं.

"असा कसा हा! आधी वाचवतो आणि आता आत्महत्या कर म्हणतोय."

राधा आता बऱ्यापैकी सावरली होती. ती म्हणाली,

"माझं नाव नकोशी.."

विक्रांत हसायला लागला.

"हे... हे... असं सुद्धा नाव असतं का कधी?"

"हो असतं   ना!   जो कुणालाच नाही आवडत त्याला 'नकोशी' म्हणतात ना. मी नाहीच आवडत कुणाला म्हणून माझं नाव नकोशी.."

किती सहजतेने बोलली राधा.

"आधी माझं नाव नकोशी   नव्हतं, पण आता बाबांना मी नजरेसमोर नको असते. म्हणून माझं नवीन नामकरण केलंय त्यांनी 'नकोशी..' आता जन्मदाता बापच नकोशी म्हणणार तर गावही त्याच नावाने संबोधणार ना!"

तिच्या बालिश चेहऱ्याकडे बघतांना विक्रांतला हसायला येत होतं.

"बरं बरं नकोशी.. नाही राधा! राधा मला सांग, तू आत्महत्या का करत होतीस?" देवाने इतकं सुंदर जीवन दिलंय, ते भरभरून जगायचं सोडून का स्वतःहुन आपण स्वतःला मरणाच्या दाढेत ढकलायचं?"

विक्रांत तिला समजावणीच्या सुरात म्हणाला.

"नकोय मला असलं जीवन.!रोजच्या मरण यातना. रोज रोज जिवंतपणी मरण्यापेक्षा एकदा मेलेलं बरं..''

राधा हुंदके देत म्हणाली.

''हे बघ राधा,   एक मित्र म्हणून माझ्यावर विश्वास ठेवून तू मला सांगू शकतेस. जर तुझी इच्छा असेल तर. माझ्याकडून जेवढी मदत जमेल तेवढी मी नक्की करेन."

का, कोण जाणे! तिला विक्रांतच्या शब्दांनी बळ मिळालं. आणि ती आश्वस्त होऊन त्याला सांगू लागली.

"छान आनंदी, मजेत जगणारं कुटुंब होतं आमचं. श्रीमंत नाही पण खाऊन-पिऊन सुखी समाधानी होतो. बाबांचा स्वतःचा ऑटो होता. आई, बाबा मोठा भाऊ प्रज्वल. प्रज्वलच्या पाठीवर चार वर्षानंतर माझा जन्म झाला. घरात लक्ष्मी आली म्हणून बाबा खूप आनंदात होते. मोठ्या हौसेने त्यांनी माझं नाव 'राधा' ठेवलं. आपल्या ऑटोवर सुद्धा त्यांनी मोठ्या अक्षरात माझं 'राधा' नाव रंगीत अक्षरात लिहिलं होतं पण देवाला कदाचित आमचं सुख पाहवलं गेलं नाही. भयानक साथीचा रोग आला, पटापट लोकं किड्या-मुंग्याप्रमाणे मरू लागले. त्या साथीत माझा भाऊ प्रज्वल हा सुद्धा बळी पडला. आई- बाबांनी हाय खाल्ली. बाबा कसेतरी त्यातून सावरले पण आई मात्र स्वतःला नाही सावरू शकली. प्रज्वल दादा देवाघरी गेला आणि आईने अंथरूण धरलं. बाबांनी खूप दवाखाने, देवधर्म सर्व काही केलं पण आईच्या तब्येतीत काहीच फरक पडत नव्हता. आईने खाणं-पिणं सोडलं. हाडांचा सापळा दिसत होता आणि अचानक एक दिवस ती सुद्धा आम्हाला सोडून गेली. बाबांसाठी हा दुसरा धक्का होता. मी अगदी लहान चार वर्षाची. काय झालंय हे कळण्याचं माझं वय नव्हतं. बाबांजवळ गेले की ते मला ढकलायचे,

"तूझ्यामुळेच हे सर्व घडलंय, तू आमच्या आयुष्यात आली आणि सगळयांना गिळंकृत केलं.. नकोशी कुठली!"

असं काहीबाही बडबडत राहायचे. आता बाबांनी आपल्या ऑटोवरच माझं नाव सुद्धा मिटवून टाकलं. आता मी त्यांच्यासाठी 'नकोशी' होते फक्त एक नकोशी. आजी- आजोबा कुणीच नसल्यामुळे मला त्यांच्याजवळ राहण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. आता बाबांना दारूचं, जुगाराचं व्यसन जडलं. रात्री बेरात्री दारू पिऊन घरात यायचं, मनात असेल तर खायचं, मारझोड करायची हे आता नित्याचचं झालं होतं. शाळेतून तर माझं नावं त्यांनी कधीचचं काढलं होतं. दुपारी बाबा घरी नसले की लपून अभ्यास करायचे. एकदा त्यांना माझी पुस्तक दिसली. त्यांनी ती टराटर फाडून जळत्या चुलीत टाकून दिली. खूप खूप रडले मी त्यादिवशी. त्यानंतर मात्र मी कधीच पुस्तकांना हात लावला नाही. आज तर हद्दच झाली, बाबा नेहमीप्रमाणे दारू पिऊन घरी आले. सोबत पाच-सहा माणसांची टोळी. छोट्याश्या झोपडीवजा घरात मी एका कोनाड्यात पाय दुमडून बसले होते. त्यांचं जोरजोरात हसणं- खिदळणं, घाणेरड्या शिव्या ऐकून अंगात शिरशिरी यायला लागली. त्यांच्या घाणेरड्या नजरा माझ्यावर खिळल्या होत्या! भीतीने मी गारठून गेले! घरातून बाहेर निघावं म्हणून पळायचा प्रयत्न केला. एवढ्यात एकाने माझा हात पकडला. मी जोराने ओरडले, बाबांना आवाज दिला पण बाबा तर मद्याच्या नशेत धुंद होऊन पडले होते. त्यांना आपल्या मुलीशी काही देणंघेणं नव्हतं. स्वतःचा बचाव स्वतःच करण्यासाठी मी त्याच्या हाताला करकचून चावा घेतला. अनपेक्षित हल्ल्यामुळे त्याने माझा हात सोडला आणि मी धावत सुटले जिकडे वाट मिळेल तिकडे. खरंच हो, मला आता जगावंसं वाटत नाही, खूप कंटाळलेय मी या जीवनाला. नाहीच जगायचं मला..''

राधा मोठमोठ्याने रडायला लागली.

"तू आधी पाणी पी आणि शांत हो बघू. हे बघ राधा, आयुष्यात असे अनेक प्रसंग येतात. आत्महत्या हा त्यावरचा उपाय नाही. मनुष्यजन्म कितीतरी योनीतून गेल्यानंतर मिळतो. त्याला इतक्या सहजासहजी वाया घालवायच नाही."

विक्रांत पोटतिडकीने सांगत होता.

"हे   सर्व कळतंय मला, पण एकटी मुलगी समाजासाठी शाप असते रे. लोकांच्या घाणेरड्या नजरा, त्यांचे टोमणे जगणं असह्य करतात त्याचं काय?"

राधाने विक्रांतला प्रश्न केला.

"मी देईन तुला आधार, एक मित्र म्हणून.. तुझ्यासारख्या अनेक 'नकोश्या' आहेत. त्यांना खरी गरज आहे ती स्वतःच्या पायावर उभं होण्याची. स्वावलंबी होण्याची. तू शिक, मोठी हो, नोकरी कर आणि परतफेड म्हणशील तर एकच काम करायचं...करशील?"

विक्रांतने विचारलं. राधा आश्चर्याने म्हणाली,

"कोणतं काम? सांग ना.."

"पुढील   आयुष्यात जर आणखी एखादी 'नकोशी' मिळाली तर तिला जगण्याची उमेद दे! "

विक्रांत तिच्याकडे पाहत म्हणाला. "नकोशी" म्हणून सर्वांनी वाळीत टाकलेल्या राधाला विक्रांतच्या रुपात देवदूत मिळाला. तिचं आयुष्य सावरलं. आज ती शिक्षिका असून अनेक निराधार मुलींच्या चेहऱ्यावर हसू फुलवून सर्वांची आवडती हवीहवीशी राधाराणी आहे.

"नका हिणवू मुलींना
नकोशी नकोशी म्हणून
द्या त्यांनाही अधिकार
जगण्याच्या
फुलराणी बनवून."

****

®© चारुलता जुगल राठी
अर्जुनी मोरगाव
संपर्क -९४०४८८७३९३

पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्यक्ष कृतीची गरज

2000 सालापासून हवामानातील बदल व बिघाड दिसायला सुरुवात झाली. त्यात Covid-19 महामारीची भर पडली. लाखों लोकांवर त्याचा दुष्परिणाम बघायला मिळाला. (New York/Geneva, 19 April 2021 (WHO) - Extreme weather combined with COVID-19 in a double blow for millions of people in 2020.) जगाच्या अर्थ व आरोग्य व्यवस्थेवरही याचा परिणाम झाला. 2011 ते 2020 हे जगातील सर्वात उष्ण दशक ठरले. NASA च्या आकडेवारीनुसार भूभागावरील तापमान हे सागरभागावरील तापमानापेक्षा वेगाने वाढते. सागर भाग हे 90 % पेक्षा जास्ती उष्णता शोषण करतात.

सध्याच्या भौगोलिक परिस्थितीनुसार पृथ्वीवर सर्वत्र हवामानात परिवर्तन घडून येत आहे. जगातील सर्व देश याचा अनुभव घेत आहेत. दुष्काळ,महापूर,अतिवृष्टी ,प्रदूषण,रोगांच्या साथी या समस्यांमुळे अनेक ठिकाणी लोकसंख्या पिडलेली आहे. अनुकूल परिवर्तन हे पर्यावरणास पोषक असते तर प्रतिकूल परिवर्तन हे पर्यावरणास नुकसानकारक असते. हे आपोआप घडून येत नाही. त्यास बहुतांशी मानवी हालचाली जबाबदार आहेत. समस्यांच्या मर्यादा वाढत असून त्यावर नियंत्रण राहिले नाही.त्यात सजीव व निर्जीव सृष्टीचा विनाश अटळ आहे. हे आपणास दिसत असूनही त्यावर उपाय करणे अगत्याचे झाले आहे.

उपाय:निसर्गाचे जतन व संरक्षण:

निसर्ग मातेचे व पर्यावरणाचे जतन करणे, जन्मदर कमी करणे, दरवर्षी झाडे लावणे व जगवणे, जमीन, पाणी, हवा यांचा उपयोग जपून करणे, त्यांची शुद्धता सांभाळणे, वापरलेल्या हवा,पाणी,जमिनीचा योग्य पद्धतीने पुनर्वापर करणे,प्रदूषण नियंत्रित करणे,पाणी साठवणे, हे उपाय आहेत. जल संचयन (RWH) करा. नद्या जोड प्रकल्प पूर्ण करा. आपापल्या भागातील जल प्रवाह एकमेकांशी जोडा. सौर,पवन व जल उर्जांचा वापर वाढवा. रासायनिक खतांच्या ऐवजी जैव खते वापरा.

परिसर हरित केल्याने सौंदर्य वाढेल पण त्याबरोबर भूजलसाठा वाढून कार्बनक्रेडीट वाढेल. वस्त्यांचे शेती व जंगलावर होणारे आक्रमण थांबवले पाहिजे. जंगले ही निसर्गाची जलसंचय व जलपुरवठा करणारी व्यवस्था आहे. पर्यावरण समतोल राखण्यासाठी सखल मैदानी प्रदेशात एकूण क्षेत्रफळाच्या 33% व डोंगराळ प्रदेशात 66% क्षेत्रावर वनस्पतींची लागवड केलीच पाहिजे. पैशाच्या नोटा पाणी निर्माण करत नाहीत. निसर्ग पाणी देतो.

कुटुंब नियोजन करून लोकसंख्या वाढीला नियंत्रण आणणे उपयुक्त ठरेल. जगातील 60 % हून अधिक लोकसंख्या गरिबीच्या पातळीखालील जीवन जगत आहे. या लोकसंख्येची क्षमता उपयोगात आणली जात नाही. जगात 80 % असमाधानी लोक हे गरीबश्रेणीतील आढळतात. मनुष्यबळाच्या उर्जेचा योग्य वापर करण्यासाठी या गरीब वर्गातील लोकांना श्रम पुरविण्यासाठी काय केले पाहिजे या बद्दल नियोजन करावे लागेल.

गरीबी :

अन्न अपुरे ,पाणी अपुरे, हवा अशुद्ध होते आहे. भूकबळी जाणाऱ्यांचे प्रमाण वाढत आहे, तरीही आपण गप्प का बसतो? भारतात कोरोना-19 (कोविड) पूर्वकाळात ग्रामीण भागातील एकूण लोकसंख्येपैकी 35 % लोक(265 द. ल. लोक) गरीब आहेत. (2021). हे प्रमाण 2022 पर्यन्त 50 % पर्यन्त जाणार आहे. गरीबी का हटली नाही? आपण नुसते

निसर्गापासून घेत राहिलो ,निसर्गासाठी दर वर्षी काही केले नाही. जमीन पाणी हवा शुद्ध राखण्यासाठी काहीही केले नाही. एकूण क्षेत्राच्या 33% भागावर वनस्पती टिकवल्या नाहीत , जमिनीची धूप थांबवली नाही .पाणी जपून वापरले नाही, याला कोण जबाबदार?   हे निसर्गाचा समतोल राखण्याचे काम कोणाही एक व्यक्तीचे नाही. हे काम आपल्या सर्वांचे आहे, हे काम सामुदायिक आहे. गाव करील ते राव न करील, एकी हेच बळ असते. शरीर हे सर्व अवयवांच्या, इंद्रियांच्या परस्पर मदतीने चालते. त्यात पोषक व पूरक हालचाली शरीराला निरोगी ठेवतात. शरीराच्या या अनेक इंद्रियांच्या हालचालीवरून सद्भावनेसाठी आपणही मानवासह सर्व सजीवांना परस्पर मदत केली पाहिजे. एकी सर्वांच्याच फायद्याची असते. वैर निर्माण न करता आनंदी समाधानी ऊर्जा निर्माण करणे उपयुक्त आहे.

जल संधारण व्यवस्थेचे नियोजन:

जल संधारण व्यवस्थेचे नियोजन हे मागणी व पुरवठा यांचा विचार करून ठरवले पाहिजे. पाण्याचा गरजेपुरता कार्यक्षम, आवश्यक योग्य जपून वापर करावा. पाण्याप्रमाणे अनेक निसर्ग घटकांचा पुनर्वापर करणे आवश्यक आहे. पाणी कमी असेल तर ठिबक सिंचन करावे, जल वितरण व्यवस्था बदलली पाहिजे. उपलब्ध पाणी 50 % च वापरावे. अचानक मुसळधार पाऊस कोसळला तर पाणी तुंबून राहू नये, ते वाहून जावे, इमारतीत पुराच्या पाण्याने नुकसान होऊ नये याचा आता आधीच विचार करावा लागेल. वस्त्यांच्या गर्दीत ओढेनाले गटारे खोल नसतात, इमारती अनियोजित बांधू नयेत. अचानक संकटे आली तर तोंड देण्याची क्षमता वस्ती कडे असली पाहिजे. आपणच अडचणी निर्माण करतो. नियम पाळत नाही. धोंडा आपल्या पायावर मारतो. आताच्या परिस्थितीत गळयाशी आल्यावर धडपड करणे चुकीचे आहे . यालाच माणसाने केलेले निसर्गाचे शोषण म्हणतात.

पाणी गरजेपुरते पिकांना द्या. कमी पाण्यावर जगणाऱ्या पिकांच्या जाती शोधाव्या लागतील. प्रत्येक उद्योगाप्रमाणे शेती सुद्धा काळजीपूर्वक लक्ष्य देऊन केली तर व व्यवसायात मन लाऊन घाम गाळला, पुरेसे प्रामाणिक श्रम केले तरच समाधान मिळू शकेल. अंग चोरून कोणीही कोठेही काम करू नये. श्रमाशिवाय जगणे निरर्थक आहे. कोणतेही काम कायम स्वरूपी टिकणारे आकर्षक आनंद देणारे असावे. यातून परदेशी पाश्चिमात्य राष्ट्राप्रमाणे आपल्याकडे उत्तम कामाची, सौंदर्याची आणि सर्वात महत्वाचे म्हणजे कायदा शिस्तीची, नियमांची शास्वत विकासासाठी कडक अंमलबजावणी झाली पाहिजे. प्रत्येक सजीव- निर्जीव घटकांच्या विकास जीवनाला काळाची मर्यादा असते. गेलेला काळ संपलेला असतो. सावधपणे नव्या नियोजनाच्या दिशा प्रत्येक गावाने ठरवाव्यात . गावाच्या सामाजिक सार्वजनिक सेवेला सहभागाने सुरुवात करावी. गावाचे निसर्ग समृद्ध भविष्य घडवावे. प्रत्येक गाव स्वावलंबी व्हावा.

वनस्पतींचे महत्व :

सजीवांना जगण्यास उपयुक्त निसर्ग घटक संपतील किंवा प्रदूषित होतील हे सर्वांच्या लक्षात आले पाहिजे. आज अशांतता, अस्वस्थता वाढत असेल तर त्यावर मानवतेच्या दृष्टीने उपाय योजणेच महत्वाचे आहे. गरजा भागत नसतील तर जीवंत राहणार कसे? पुरेसा ऑक्सीजन देणारी हवा उपलब्ध नसेल तर श्वास कोंडला जाईल, पाणी स्वच्छ नसेल तर रोगराई पसरेल. मृदा रासायनिक खतांनी रोगट झाली असेल ,तर अन्न कसे उगवणार? भुपृष्ठावर उष्णताग्राही कार्बन डाय

ऑक्साईड(CO_2) वायू वाढत असेल तर प्रदूषित हवेमुळे जगणे अस्वस्थ होईल . वनस्पती (झाडे-झुडुपे,गवत,पिके,नेचे,शेवाळे ,वेली इ.) या वायु शुद्धी नियंत्रणात सर्वात मोलाचा अत्यंत महत्वाचा वाटा उचलतात. वनस्पती ह्या नैसर्गिकरित्या ऑक्सीजन 02, आणि कार्बन डाय ऑक्साईड Co2 यांचा समतोल राखतात.(प्रकाश संश्लेषण प्रक्रिया). ज्या त्या भागात हवामानानुसार वेगवेगळया वनस्पती उगवतात. पर्यावरण समतोलासाठी कोणत्याही प्रदेशात साधारण मैदानी भागात एकूण क्षेत्राच्या 33 % तर डोंगरमय भागात एकूण क्षेत्राच्या 66 % प्रदेशावर वनस्पति-जंगल क्षेत्र असावे लागते. तुमच्या गावात/शहरात /तालुक्यात/जिल्हयात ,राज्यात वनस्पति क्षेत्र किती टक्के आहे ते तपासून पहा. म्हणजे वस्तुस्थिती कळेल.

<u>प्रत्येक गावाला विनम्र आवाहन :-</u>

गावोगावी चांगल्या कार्यासाठी चांगल्यांचे अनुकरण केले पाहिजे. जलसंधारणांची अनेक यशस्वी उदाहरणे आपण पाहतो. पाण्याचा तुटवडा असलेल्या भागात चारापाणी टंचाईमुळे गुरे माणसे यांची उपासमार होत होती. 1972 च्या मोठ्या दुष्काळाच्या अनुभवातून हुलगा माडगं खाऊन, मजूरी करून राळेगणसिद्धी गाव जगत होते. राळेगणसिद्धीचे लोक रोजगारहमीच्या कामावर जात होते. मजुरीवर भागत न्हवते. सैन्याच्या नोकरीत स्वेच्छानिवृत्ती घेऊन अण्णाहजारे आपल्यागावी 1976 ला आले. पाझर तलावाच्या सदोष बांधकामाचा अनुभव बघून अखेर श्रमदानाचा मार्ग शेतकऱ्यांनी पत्करला. काबाड कष्ट करणारा श्रमकरी शेतकरी हा खरा सर्वांचा अन्नदाता आहे. या नंतर 10 वर्षांत पावसाचे पाणी अडविणे , झाडे लावणे ही कामे केली. जलसंधारणाची कामे सुरू केल्यानंतर चौथ्या वर्षी विहिरींना पाणी लागले. प्रत्येकाने शेतीच्या बांधावर बोरी,शेवगा,शेवरी,कडू लिंब ,बाभुळ ,जांभूळ,सीताफळ,निरगुडी या प्रकारची स्थानिक हवामानात वाढणारी झुडुपे लावली . इतरत्र वनीकरणामार्फत 2.5 लाखावर झाडे लावली. त्यातील 90 % झाडे जगली, 45 नाला बंडिंग केले. एकीमुळे गावाचे नैतिक बळ वाढले. पाणलोट विकासाची ताकत एवढी आहे की, गावातील कोरड्या हंगामी मृतविहिरी ह्या बारमाही, जीवंत झाल्या. येथील फळे भाजीपाला कुवेत मस्कतला गेला. जमिनीऐवजी पिकाला पाणी दिले गेले. गावात 50 संस्था 1990 च्या दरम्यान होत्या. ज्ञानेश्वरीतील 16 व्या अध्यायानुसार : वने जागवावी, पाणी साठवावे हे कार्य गावकऱ्यांनी केले. गाडून घेणाऱ्या दाण्यावर कणीस उभे राहते. जग भूतकाळावर उभे राहते. असे अण्णा हजारे म्हणतात. अशा अनुभवांचा उपयोग आपल्या गावासाठी का करू नये? राळेगणसिद्धीचे परिवर्तन होऊन (1990 पासून) 31 वर्षे झाली तरी त्याचा अनुभव इतरांनी कृतीत आणावा. गावोगावी जत्रा ,इतर उत्सव, सार्वजनिक कार्यात जो पैसा खर्च होतो तो निसर्ग समृद्धीसाठी उपयोगात आणावा, त्याने गाव सुखी होईल.

मुसळधार पावसाचे पाणी महापुरामुळे समुद्राला जाऊन मिळते. ते समुद्राला वाया न जाऊ देता ते जमिनीवर अडवून जमिनीत मुरविणे आवश्यक आहे. त्यासाठी झाडेझुडुपे दरवर्षी लावावी लागतात तसेच लहान -मोठे बांध घालून, आडव्या ताली घालाव्या लागतात. झाडांच्या मातीतील मुळांच्या रूपाने पाणी जमिनीत मुरते, साठते. तेच पाणी झऱ्याच्या रूपाने विहीरींना,जलप्रवाहांना- ओढ्यांना मिळते. पावसाळयात वस्त्यामध्ये इमारतींच्या छतावर पावसाचे पाणी अडवून पाईपद्वारे जमिनीवर टाकीत साठवतात त्यास पर्जन्यजल संचयन (Rain Water Harvesting)म्हणतात.

हवामानात बदल व तापमानवाढीमुळे तलाव,तळी,टाक्यांमधून साचलेले पाणी वाफेने उडून जाऊ नये म्हणून त्यावर आच्छादन घालतात .

सर्वांना पर्यावरणाची निसर्गाची हाक : जगा, जगू द्या आणि जगवा

आपल्या शरीरातील सर्व इंद्रियाप्रमाणे धरतीवरील सर्व घटक परस्परावलंबी आहेत. मेंदू व हृदय बंद पडले की, शरीर चालत नाही. सर्व इंद्रियात परस्परावलांबन,परस्पर सामंजस्य, सहकार्य करण्याची क्षमता पाहिजे. एकटा कुणी जगूच शकत नाही. समुदायाला जीवनात महत्व आहे. त्यातून गरजा भागतात व रक्षण होते. समुदाय व एकी शिवाय समाधान व शांती प्राप्त होणे अशक्य आहे. सत्तेसाठी, वर्चस्वासाठी, संघर्ष-स्पर्धा करून दुसऱ्याचे नुकसान करून आपण पुढे जाण्यासाठी निसर्गात माणूस जन्माला आलेला नाही. तो स्पर्धा करताना इतरांचे कल्याण प्रगती होईल, सगळे जगावेत या भूमिकेतून जगला पाहिजे. निसर्ग आणि मानव एकमेकांसाठी, निसर्गाच्या आणि जीवनच्या समृद्धीसाठी आहेत. जसे, हवा नसेल तर प्राण टिकणार नाही. पाणी नसेल तर तहान भागणार नाही.

****

®© प्राचार्य डॉ.प्रकाश सावंत,
वाई.
संपर्क -9881812681

मनबुध्दीची साकडी

आपण जन्माला आलो ते मन व बुद्धी या दोन ईश्वरदत्त देणग्या सोबत घेऊनच.बुद्धी व मन हे प्रत्येकाचे आपले स्वतंत्र असते. बुध्दीचा संबंध उघड उघड 'मेंदू 'शी आहे. मेंदूची आवश्यकता प्रत्येक प्राणिमात्रालाच आहे, मेंदूशिवाय योग्य तो विकास वृद्धी होणं अशक्यच आहे. देवाने आपल्याला मेंदू दिला याबद्दल देवाचे आभार मानावे तेवढे थोडेच. ही निःसंशय एक अनमोल देणगी आहे. त्याबरोबरच देवाने एक 'मन' ही दिलं आहे त्याचं काय? ते काय आहे? बहिणाबाईंनी तर सरळ सरळ देवालाच प्रश्न केला आहे....

असं कसं मन देवा, असं कसं रे घडलं?
कुठे जागेपणी तुला असं सपनं पडलं!

देवाचे दिवास्वप्न आहे हे. स्वप्नासारखंच आभासी, अनिश्चित. पण मग हे कशासाठी?जगाचा पसारा मांडल्यावर इथे चालणारे अजब-गजब खेळ बघण्यासाठी, त्या खेळांचा आनंद घेण्यासाठी आणि गोष्टी हाताबाहेर जाऊ लागल्या कीं मग अवतार घेऊन सगळं सावरण्यासाठी.म्हणून देवाने हे मन निर्माण केले आणि मानवाला दिले. नाहीतर मला सांगा, जनावरांच्या उध्दारासाठी देव कधी अवतार घेतो कां? " संभवामि युगे युगे "चं वचन देवाने फक्त माणसालाच दिले आहे ना?

खरंतर बुध्दीप्रमाणेच मन ही सुद्धा एक मौल्यवान देणगी आहे माणसाला मिळालेली. मनाची ताकद खूप मोठी असते, मनाचा वेग व झेपही खूप मोठी असते. याची तुलना केवळ वाऱ्याच्या सुसाटपणाशीच केली जाते--मनोजवम् मारुततुल्य वेगम्! हे उगाच नाही म्हटलं आहे. गति इतकी विलक्षण आहे कीं मन कुठे आहे याचा अंदाज करणंच कठीण आहे,

" आतां होतं भुईवर, गेलं गेलं आबाळांत।। "

बुद्धी व मन दोन्ही मानवजातीच्या प्रगति व विकासात बरोबरीचे भागीदार आहेत. सर्व पशु-प्राण्यांपासून माणूस वेगळा आहे तो केवळ बुध्दीमुळे नाही तर भावनांमुळे सुद्धा. भावनांचा आविष्कार बुध्दीच्या आधारेच होतो हे मात्र खरं. मनुष्याच्या व्यक्तिमत्वात 'बुध्द्यांका' इतकाच 'भावनात्मक गुणांक' महत्त्वाचा असतो 'साहित्य, संगीत, विविध प्रकारच्या कला' या मनांतील तरंगांवर,संवेदनशीलतेवर अवलंबून असतात, आणि माणसाच्या, समाजाच्या सर्वांगीण विकासावर या तिन्हीचा पगडा असतो.आपल्याकडे एका श्लोकात म्हटले आहे,

साहित्य संगीत कला विहीनः।
साक्षात् पशुः पुच्छ विषाणहीनः।।

प्राण्यांच्या जगात या तिन्ही गोष्टी नाहीतच.कोकिळेचा पंचम,नागाचे डोलणे,मोराचा डौलदार पदन्यास हे कलात्मक आहेच पण हे अपवादच म्हणावे लागतील नाहीतर याशिवाय असणाऱ्या व्यक्तीला कोणी पशु म्हटलं नसतं. माणसाजवळ हे सर्व आहे कारण माणसाला मन आहे.इतकंच नाही तर जगात जे विविध धर्म आचरणात आहेत त्यांचा उगम माणसाच्या मनाला आवर घालण्यासाठी,मनावर काबूपाण्यासाठी झाला आहे स्वतःच्या मनाला आवर घालणे, त्याच्या वेगावर, शक्तीवर ताबा मिळवणे माणसाला स्वतःच्या तुटपुंज्या ताकदीवर केवळ अशक्य आहे. रामदासांसारखा समर्थ योगीही म्हणतो,

अचपळ मन माझे,
नावरे आवरिता।
तुजविण शीण होतो
धांव रे धांव आता।।

आयुष्यातील अनेक अवघड प्रसंगी मनाच्या रथाचे वेग भगवंताच्या हाती दिल्याशिवाय मार्ग सांपडणे कठीणच असते त्यासाठी भगवंतावर निष्ठा व मनात स्वधर्माचे अधिष्ठान असायलाच पाहिजे.आपल्या धर्माची शिकवण तर आयुष्यातील संभ्रमित करणाऱ्या, गोंधळात टाकण्याऱ्या प्रसंगातून, दुःखाने, भयाने येणाऱ्या हताशेमधून आपल्याला बाहेर काढून योग्य मार्गावर नेण्यासाठी आहे. आणि कां असणार नाही? भर रणांगणात भयशंकित व्याकुळ मनामुळे अर्जुनाची झालेली अवस्था पाहून श्रीकृष्णाने आपल्या बुध्दीप्रामाण्याने, चातुर्याने त्याला सांवरायला,समजूत घालायला सुरुवात केली. हळुहळु अर्जुन सांवरला,त्याने मनावर ताबा मिळवला व युध्दाला उभा राहिला. युध्दामधे अर्जुनाच्या शस्त्रकौशल्याइतकाच त्याच्या मनाचा निर्धार, सामर्थ्य व स्थिरता महत्वाची होती. कुरुक्षेत्रावरील अर्जुन व श्रीकृष्णाची जोडी ही मन व बुध्दीची एकत्रित सांगड आहे,कार्य सिध्दीस नेण्यास सज्ज झालेली. केवढं महान कार्य करून दाखवलं या जोडीने--धर्मक्षेत्रावरील निर्णायक विजयाबरोबरच 'गीते' सारखा महान ग्रंथ त्यांनी जगाला दिला. मनबुध्दीच्या या महान कार्याला शतशः प्रणाम!

अनेक कवींनी लेखकांनी वर्णिलेले हे मन आहे तरी कुठे? आपल्या मेंदूमध्ये डिफॉल्ट मोड (Default Mode) नांवाचा एक भाग आहे, जो सतत कार्यरत असतो. त्यांत सतत ऊर्जा खर्च होत असते. त्यामुळे आपल्याला एक प्रकारचा थकवाही येतो. तसं पाहिलं तर आपल्या शरिराच्या सर्व हालचालींवर आपल्या मेंदूचा ताबा असतो. मेंदूच्या आज्ञेतच सर्व दिवसभर गोष्टी घडत असतात. पण आपल्याच या भागावर मात्र मेंदूचा ताबा नसतो, आणि मेंदूच्या या भागाचा शरिराच्या कुठल्याच भागावर ताबा नसतो. याच्या आज्ञेत शरिराच्या कुठल्याच क्रिया चालत नाहीत. म्हणजे आपल्या रोजच्या जीवनात दैनंदिन व्यवहारात याला कांहींच काम नसते पण तरीसुद्धा हा क्षणभरही स्वस्थ नसतो. ही माहिती वाचनांत आली तेव्हा वाटलं मेंदूचा हा भाग म्हणजेच मन असावं. श्री. गोंदवलेकर महाराजांची प्रवचने--रोज एक याप्रमाणे नेहमीच वाचते मी.त्यांत वाचलं होतं,

" मनाला सतत चळवळ करायची संवय आहे. त्याला स्वस्थ बसवणं फार अवघड आहे."

मनाचे हे वर्णन वरील माहितीशी तंतोतंत जुळते आहे.बहिणाबाईंच्या ओव्या आठवल्या आणि आश्चर्य वाटलं त्यांच्या सारख्या एका अबोध बाईने मनाचा घेतलेला वेध किती विलक्षण व अचूक आहे.

आपण आपले दैनंदिन व्यवहार करत असतांना मेंदूचा हा भाग मात्र कधी भूतकाळात तर कधी भविष्यकाळात रमलेला असतो. भूतकाळातील आठवणी, व भविष्याची चिंता हा मेंदूच्या या भागाचा स्थायी भाव आहे. याला जणु वर्तमानकाळात जगताच येत नाही. त्याला सारखे प्रयत्नपूर्वक वर्तमानात आणावे लागते. आपल्याला पुष्कळदा उपदेश केला जातो.. वर्तमानात जगा...कारण या मेंदूला वर्तमानात कांही काम नसतं. त्याला भूतकाळात किंवा भविष्यकाळात भटकू दिले नाही कीं त्याला विश्रांतीच असते.

आयुष्यातील असंख्य व्यथा या भागांत स्मृतीच्या रूपाने सांठलेल्या असतात कांही अप्रिय अनुभवांमुळे भिती मनांत दडलेली असते. अप्रिय घटना व दुःखद अनुभव सतत मनाला व्यथित करतच असतात. अपमानाचे, पराभवाचे

शल्य, चुकांची खंत मनांत राहतेच. भविष्याची चिंता, अनिश्चितता मनात असुरक्षिततेची भावना निर्माण करते. आणि या सर्व गोष्टी मनाला नकारात्मक भावनेने भरून टाकतात, अस्वस्थ करतात. पुष्कळशा आजारांचा उगम मेंदूच्या या भागाच्या अस्वस्थपणांतच असतो,त्यामुळे याला अधूनमधून विश्रांति देणे आपल्या स्वास्थ्यासाठी खूप आवश्यक आहे.पण याला विश्रांति द्यायची कशी? स्वस्थ बसवायचे कसे?कारण आपण झोपतो तेवढाच वेळ हा स्वस्थ बसतो, याला विश्रांति मिळते. पुरेशी झोप घेणे आपल्या आरोग्यासाठी म्हणूनच आवश्यक आहे. जागेपणी सुद्धा याला विश्रांति देण्याचे कांही उपाय आहेत. जेव्हा आपण एखादी गोष्ट तल्लीन होऊन करतो तेव्हा हे मन स्वस्थ बसते. तसंही मेंदूचा हा भाग स्वस्थ, निश्चल असल्याशिवाय आपण कुठल्याही कृतीत बुद्धी एकाग्र करुच शकत नाही. मनःस्वास्थ्यासाठी प्राणायाम, ध्यान वगैरेंचा उपदेश केला जातो त्यामागे मुख्य सूत्र हेच आहे. प्राणायाम करतांना श्वासोच्छवासावर लक्ष केंद्रित झालेलं असतं त्यामुळे मन स्वस्थ राहते. ध्यान करतांनाही म्हणूनच मन शांत होते. मेंदूच्या या भागाला विश्रांति म्हणजे पुष्कळ ऊर्जा वाचते व आपल्याला ताजेतवाने वाटते. कुठचीही गोष्ट एकाग्रतेने, तल्लीन होऊन करणे हे एक प्रकारचे ' ध्यान ' मेडिटेशन आहे. आपण दिवसभरातील प्रत्येक गोष्ट नीट लक्ष देऊन एकाग्रतेने केली तर वेगळे मेडिटेशन करायची गरजच नाही.

गौतमबुध्दाची ध्यानस्थ मूर्ति आठवा.या मूर्तीतून जाणवणारा, प्रतीत होणारा निश्चलपणा हा निश्चितच फक्त शरिराचा नाही, त्यामागे निश्चल मनाचे अधिष्ठान आहे. बुध्दाची सर्व शिकवणच आत्मिक, अंतर्गत स्तरावर आहे. बुद्ध आपल्याला मनातील अंतःस्थ शांतता शिकवतो. श्रीकृष्ण रथाच्या चाकाचा धांवता परिघ आहे. रस्त्यावरील खड्डे, धक्के खाचखळगे कसे पचवत जायचे, पार करायचे, कसा सामना करायचा, हे शिकवतो.पण बुद्ध फार फार स्तब्ध आहे.

बुद्ध रथाच्या आंसासारखा (मधल्या दांड्यासारखा) आहे चाकाचा परीघ जोरात धांवत असला तरी आस फक्त स्वतःभोवती फिरतो, आपली जागा सोडत नाही, स्थिर राहतो. त्याने आपली जागा सोडली तर रथ कोसळेल, उद्ध्वस्त होईल. रथाच्या आंसाचं हे महत्त्व रामायणात अगदी सुरुवातीलाच सांगितले आहे. रथाचा आंस मोडल्यावर कुणी सांवरायला नसते तर दशरथ महाराज युद्ध हरलेच असते. रथाच्या आंसाचे हे महत्व बुद्ध परत एकदा आपल्याला शिकवतो. आयुष्याच्या रथाचा हा आंस म्हणजेच बुध्दाच्या मते आपलं मन.ते शांत, स्थिर पाहिजे. गौतमबुध्दाची ध्यानस्थ मूर्ति म्हणजे तनमनाच्या आरोग्याचे द्योतकच, तिची उपासना ही संपूर्ण आरोग्याची गुरूकिल्ली आहे.

****

®© डॉ. सौ. अनुराधा भागवत.
इंदौर.
संपर्क – 9827528106

''यांच्यातील ऊर्जेला सलाम''

अमिताभ बच्चन वय वर्ष ८० अजूनही तरुणाला लाजवेल अशा जोशात काम करतात. कोठेही आपले म्हातारपण ते मिरवत नाहीत. गेली पाच दशके आपल्या अभिनयाने त्यांनी मोठा व छोटा पडदा गाजविला व आजही 'केबीसी' च्या माध्यमातून व नुकताच आलेल्या 'उंचाई' या चित्रपटातून त्याच ऊर्जेने त्यांनी काम केले आहे, करत आहेत. जीवनात आलेल्या चढ-उताराला सामोरे जात, शारीरिक व्याधीवर मात करत, जीवघेण्या अपघातातून बरे होत, आर्थिक दिवाळखोरीला सामोरे जात, फिल्मइंडस्ट्री मधील नवनवीन तंत्र,गोष्टी शिकत, नवीन सहकलाकारांसोबत स्वतःला जुळवत काम करणे सोपी गोष्ट नव्हे. आजच्या पिढीला त्यांच्याकडून खूप काही शिकण्यासारखे आहे. आशा भोसले वय वर्ष ८९, आजही त्यांचा उत्साह तसूभरही कमी झालेला नाही. रिऍलिटी शो मध्ये जाणे, तरुण गायक कलाकारांना मार्गदर्शन करणे, प्रसंगी गाणे त्याच जोमात चालू आहे. स्वर्गीय गाणकोकिळा लता मंगेशकर यांच्या सोबतच आशा भोसले यांची देखील गायन क्षेत्रात वेगळी ओळख आहे. आशा भोसले यांची गाण्यातील विविधता अलौकिक. आपल्या खाजगी आयुष्यातील कटू प्रसंगाला सामोरे जात, गाण्याची उर्मी कायम ठेवत गायन क्षेत्रावर त्यांनी आपला एक वेगळा ठसा उमटविला .

वयाच्या ८१ वर्षीदेखील श्री . शरद पवार राजकारणात ठाण मांडून आहेत. कॅन्सर सारख्या आजारावर मात करत, भल्याभल्या राजकारणांना पाणी पाजत, आपल्याच पक्षातील बंड मोडत, सतत कार्यरत राहणे हे साधे काम नाही. पायाला पट्ट्या बांधून आजही सर्वत्र राजकारण, समाजकारण साठी ते संचार करतात. आपल्या पक्षावरील त्यांची पकड थोडीही ढिली झालेली नाही. मागील काही दिवसापूर्वीच ते हॉस्पिटल मध्ये ऍडमिट असतांना,

डॉक्टरने मनाई केली असतांनाही पक्षाच्या अधिवेशनाला हजर राहिले व आपल्या कार्यकर्त्यांना त्यांनी मार्गदर्शन केले. ८४ वर्षांचे श्री. रतन टाटा आजही कार्यरत आहेत. या वयातही नवीन जबाबदाऱ्या घेण्यास ते तयार असतात. कार्पोरेट जगात आजही त्यांचा तेवढाच दबदबा आहे. शास्त्रीय गायिका श्रीमती प्र. भा. अत्रे आजही वयाच्या ९० वर्षी कार्यरत आहेत. स्वतःचे गुरुकुल चालवतात, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. माझ्या असे वाचण्यात आले आहे की त्या स्वतःच कारदेखील ड्राईव्ह करतात. ८८ वर्षीय गीतकार, निर्देशक, कवी श्री. गुलजार आजही आपल्या लेखणीतून नवीन नवीन गाणी लिहीत आहेत, सिनेक्षेत्रात कार्यरत आहेत. नवीन चित्रपटाचे निर्देशन करीत आहेत.

वरील सर्वांनी आपापल्या क्षेत्रात यश, पैसा, प्रसिद्धी, मान-सन्मान कमावला असला तरी ते थांबले नाहीत. आपल्या क्षेत्राला एक नवीन आयाम देण्यासाठी ते आजही त्याच उमेदीने, त्याच उत्साहात कार्यरत आहेत. वय, शारीरिक व्याधी त्यांना थांबवू शकल्या नाहीत.

आपण वयाची चाळीशी-पन्नाशी गाठली की 'बास झाले आता', थकलो बुआ ' असे म्हणतो. काहीजण तर रिटायरमेंटचे नियोजन सुरु करतात. साध्या-साध्या व्याधी समोर नमते घेतात. अपयश आले की खचून जातात, नाउमेद होतात. अशा प्रसंगी वरील उदाहरणे डोळ्यासमोर आणा. वरील सर्वांनी सलग ५०-५५ वर्ष एकाच क्षेत्रात अलौकिक काम केले आहे. अपयशाला ते देखील सामोरे गेले असतील, वयानुसार येणाऱ्या शारीरिक व्याधी त्यांना देखील आल्या असतील. खाजगी आयुष्यातील झालेली हानी त्यांनी देखील पचवली असेलच. कितीतरी संकटाना यांनाही सामोरे जावे लागले असेल. कित्येक जणांकडून झालेले अपमान पचवावे लागले असतील. यशाबरोबर येणाऱ्या अनेक प्रलोभनांचा मोह त्यांनाही पडला असेल. या सर्वांवर मात करत आजही आपल्या आपल्या क्षेत्रात ते पाय रोवून उभे आहेत.

जीवनातील आलेल्या यश-अपयश याकडे तटस्थतेने पाहत, आलेल्या संकटाला धीराने सामोरे जात, शरीर स्वास्थ्य व मनस्वास्थ्य उत्तम ठेवत, कोणत्याही व्यसनाच्या आहारी न जाता, स्वतःची ऊर्जा, उत्साह वाढवीत आपल्या ठरविलेल्या क्षेत्रात दीर्घकाळ सजगतेने मार्गक्रमण करणे शक्य आहे हेच यावरून दिसून येते .

****

® © महेश भा. रायखेलकर
सोलापूर
संपर्क : 9326612436

हॉस्पिटल ऊभारणीचा संघर्ष

एका मंगळवारची सकाळ, अकरा वर्षांचा होतो मी, डॉक्टर आले होते घरी, एक मोठं इंजेक्शन देत होते आईला, तीला दम्याचा त्रास होता. बरयाचदा त्रास व्हायचा तीला, डोंबिवलीतल्या डॉ.राव यांच्याकडे ऊपचारासाठी जायची ती, यावेळी सुद्धा तीला डोंबिवलीकरा नेलं, पण ती परत आलीच नाही, ती गेली कायमची, माझ्या आयुष्यात न भरून निघणारी पोकळी निर्माण करून.माझा लहान भाऊ भुषण ९ वर्षांचा होता, त्याला हिमोफेलिया हा रक्ताचा आजार होता. के.ई.एम. परळला त्याचे उपचार ऊपलब्ध होते. वडील त्याला घेऊन जायचे, पंधरा पंधरा दिवस ॲडमिट असायचा तो. मग वडिलांची नोकरी पण गेली, कोण एवढ्या सुट्या देणार.आई माझी शिक्षिका होती, तीचं थोडं पेंशन यायचं, भुषणची औषधं खुपच महाग होती, मग वडील वेगवेगळया ट्रस्टकडे फ्रांसचे, लोकांकडून मदत घेऊन भावाचा ऊपचार करायचे. घरात बऱ्याचवेळा खायला पण नाही मिळायचं आम्हा दोघांना. मग हातात वाटी घेऊन मी शेजारी जायचो काहीतरी खायला द्या असं मागायला, लहानच होतो भुक आवरायची नाही.

कोणत्याच लहान मुलाच्या वाट्याला असे दिवस नको हिच बाप्पाचरणी प्रार्थना

भावाला त्याच्या आजारपणामुळे शिकता नाही आलं, मी बी.एस.स्सी. झालो विसाव्या वर्षी, पुढे एम.एस.स्सी (मरीन झुओलॉजी) ला ॲडमिशन पण घेतली. जॉब करून शिकायचं असं ठामपणे ठरवलं होतं, पण प्रॅक्टिकल्स लेक्चर्स पुर्ण दिवस लागायचा, भुषणच्या औषधाकरता नोकरी करण गरजेच होतं, नाही जमलं पुढे शिकायला. एका कंपनीत क्लार्क ची नोकरी मिळाली अकांऊंट असिस्टंट ची, आई जाऊन दहा वर्ष झाली होती. प्रचंड हाल झाले होते दहा वर्षात. भुषणच्या वेदना, औषधासाठी पैशांचे प्रॉब्लेम, खायची आबाळ असं सगळं भोगत होतो आम्ही.

लग्न लवकर केलं मी वयाची २१ वर्ष पुर्ण झाल्यावर, वैशु (सौ.वैशाली) १९ वर्षांची, लव्ह मॅरेज, लोक हसलेसुद्धा, वैशु मात्र ठाम होती. लग्न लवकर केलं त्यामुळे खायचे हाल कमी झाले, वडिलांना सांगितलं ईथुन पुढे भुषणच्या औषधांची जबाबदारी माझी. पगार होता रू. २४००/- , एका इंजेक्शन ची किंमत होती रू.६०००/-, मग माझं सुद्धा लोकांकडे हात पसरणं सुरू झालं. कर्ज घे औषधं घे, पैसे परत कर हे सुरू झालं, वैशुने मात्र साथ दिली. टिटवाळयाच्या गणपती बाप्पाच्या आशीर्वादाने लग्न लवकर झालं असा माझा ठाम विश्वास आहे. मग मुंबईच्या हिंदुजा हॉस्पिटलमध्ये रिसेप्शनीस्ट म्हणुन जॉब मिळाला आणि आयुष्याची दिशा निश्चित झाली. पाच वर्ष हिंदुजा हॉस्पिटलच्या रिसेप्शन काऊंटरवर काम करताना हॉस्पिटल कसं चालतं याचा नीट अभ्यास करता आला. बऱ्याच मोठ्या डॉक्टरांच्या ओळखी झाल्या, हिंदुहृदयसम्राट श्री बाळासाहेब ठाकरेंची सर्जरी करणारे हार्ट सर्जन डॉ.मांडके सर, न्युरोसर्जन डॉ.बी. के. मिश्रा सर, युरोलॉजीस्ट डॉ. शरद सागडे सर, डॉ. ऊदानी सर, डॉ. पी.पी.अशोक सर, डॉ.नवनित कुमार सर, स्पाईन सर्जन डॉ. शेखर भोजराज सर अशा कित्येक अत्यंत हुशार डॉक्टरांच्या सहवासात आलो, खुप शिकायला मिळालं हिंदुजा हॉस्पिटलमध्ये.

सायन्स ग्रॅज्युएट असल्यामुळे हिंदुजाच्या न्युरॉलॉजी डिपार्टमेण्टमध्ये टेक्निशिअन म्हणुन माझी नियुक्ती झाली आणि खऱ्या अर्थाने रूग्ण सेवा काय असते ते बघायला शिकायला मिळाली. ऑपरेशन थिएटर, आय.सी.यु. हिंदुजाच्या प्रत्येक कोपरयात काम करायला मिळालं जागतीक दर्जाच्या आरोग्यसुविधेचा मी एक छोटासा भाग होतो.

मुंबईपासून ६५ कि.मी वर श्री महागणपती मंदिरामुळे प्रसिद्ध असलेल्या टिटवाळा गावात माझा जन्म झाला. हिंदुजा मध्ये खुप समाधानाने काम करून जेव्हा रात्री ऊशीरा टिटवाळयात उतरायचो आणि मग एक खुप मोठा फरक जाणवायचा, दिवसा मी एका सुसज्ज आरोग्यव्यवस्थेचा एक भाग असायचो आणि रात्री टिटवाळयात आलो की जाणवायचं की माझ्या या गावात आरोग्यविषयक सुविधा काहीच नाहीये. हिंदुजामध्ये टिटवाळयातल्या किंवा ओळखीने आलेल्या बऱ्याच पेशंटना खुप मदत करता आली मला. खुप लोक यायचे माझ्याकडे मदत मागायला, भुषणचे हाल लहानपणापासुन बघतच होतो मग मी प्रत्येकाला जमेल ती मदत करत होतो, कितीतरी पेशंटच्या बायपास सर्जरी, वेगवेगळ्या आजारावरचे पेशंट हिंदुजातल्या ऊपचाराने ठणठणीत बरे झाले, बरं हिंदुजात काम करणारया स्टाफचं एक वैशिष्ट्य आहे, सर्वच जण खुप मदत करतात, अगदी वॉर्डबॉयपासुन, नर्सेस, टेक्निशिअन, रिसेप्शन सर्वांमध्ये मदत करण्याची वृत्ती होती, तेच संस्कार झाले माझ्यावर आणि आपल्या टिटवाळयात आरोग्यविषयक काहीच सुविधा नाहीत याकरता हॉस्पिटल ऊभारणीचे विचार माझ्या मनात यायला लागले.टिटवाळयातील आम्ही मित्रांनी हॉस्पिटल ऊभारणीचे ध्येय ठेऊन एक चॅरिटेबल संस्था ऊभी केली *क्रिएटिव्ह ग्रुप*.

एक ठाम विचार आमच्या मनात असा होता की, हजारो क्रांतीकारकांनी आपल्या प्राणांचे बलिदान देऊन, लाखो सत्याग्रहींच्या त्यागातुन आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाल, त्यांनी देशाकरता त्यांच कर्तव्य केलं, आम्ही काय करणार आहोत, आणि म्हणुनच माझ्या गावास ज्याची गरज आहे ते हॉस्पिटल ऊभारणीच कार्य हेच देशकार्य असं समजुन आम्ही सर्वांनी कार्याला सुरवात केली. आम्ही २००० साली प्रथम एक क्लिनीक सुरू केलं ‘क्रिएटिव्ह पॉलिक्लिनीक’ या नावाने, कल्याण डोंबिवलीमधील जवळपास ६५ डॉक्टरांना भेटुन विनंती केली की टिटवाळयात या, त्यातले २६ जण आले आणि चार ते पाच जण टिकले, डॉ.किरण परांजपे (अस्थीरोगतज्ञ) डॉ. रृता मराठे (नेत्ररोगतज्ञ), डॉ.सोनाली लोहीया (नेत्ररोगतज्ञ), डॉ.अजय सिर्सीकर (त्वचारोगतज्ञ), डॉ.अमोल ईटकर (कान,नाक,घसारोगतज्ञ) हे सर्वजण बारा वर्ष आमच्या बरोबर राहीले. सात वर्ष झाली होती क्लिनीक सुरू करून, हिंदुजा हॉस्पिटलमधलं माझ काम सांभाळून क्लिनीक पण बघत होतो, सीमा सारखे खुप प्रामाणिक स्टाफ पण भेटले. सात वर्षांमध्ये क्लिनीक स्वतःच्या ताकदीवर चालायला लागले होते, गरज पडेल तेव्हा आम्ही वर्गणीतले पैसे वापरत होतो, क्लिनिकमधल्या सुविधा वाढवण्यासाठी चॅरीटी शो करून पैसे जमवले होते गेल्या सात वर्षात, सर्वांनी खुपच मेहनत घेतली होती, सुदैवाने हिंदुजा हॉस्पिटलमध्ये नव्याने जॉईन केलेल्या श्री प्रमोद लेले सरांना भेटण्याची योग बाप्पानेच घडवुन आणला, मी सरांना टिटवाळयाची परिस्थिती समजावुन सांगितली व आम्ही करत असलेल्या कामांची माहीती दिली, टिटवाळा आणि

परिसरातील नागरीकांसाठी हॉस्पिटलची नितांत आवश्यकता आहे त्या करता मदत करा अशी विनंती केली. श्री.प्रमोद लेले सरांनी मात्र मनापासुन मदत केली नंतर तर पुर्ण हिंदुजा हॉस्पिटलच मदतीला आलं.

श्री. लेले सरांच म्हणणं होतं की जागा असल्याशिवाय आपण काही करू शकत नाही. माझा पत्रकार मित्र श्री.सुनील जावडेकर याच्यामुळे मुळचे टिटवाळेकर पण डोंबिवलीच राहणारे श्री प्रमोद दलाल व त्यांच्या मातोश्री प्रमिला वसंत दलाल यांची ओळख झाली व पहिल्याच भेटीत त्यांनी टिटवाळ्यातील साडेतीन गुंठ्याचा प्लॉट आम्हाला देणगी दाखल द्यायचे कबुल केले, पुढे बाजुचा साडेतीन गुंठ्याचा प्लॉट आम्ही विकत घेतला. ७ गुंठे जागा मिळाली आणि एक दिवस हिंदुजा हॉस्पिटलमधुन सीईओ श्री.प्रमोद लेले सर, डॉ. बाळ भालेराव सर, डॉ. गुस्ताद डावर सर टिटवाळयात जागा बघायला आले. मग टिटवाळा गणपती मंदिर ट्रस्टी श्री.सुभाष जोशी व बाकीचे मंदिराचे ट्रस्टी यांच्याबरोबर मिटिंग झाली. त्या भेटीत मंदिराने हॉस्पिटलची बिल्डिंग बांधुन द्यायचे कबुल केले. त्याच दरम्यान एल ॲाड टी चे चेअरमन श्री. देवस्थळी सरांची भेट झाली, त्यांनी हॉस्पिटल ऊभारणीत तसच पुढेसुद्धा खुप मदत केली. कायम देवळासारखे ते क्रिएटिव्ह ग्रुपच्या मागे ऊभे राहीले व हॉस्पिटल ऊभारणीच्या खर्चातला मोठा वाटा उचलला.

१९ वर्ष झाली होती मला हिंदुजा हॉस्पिटलमध्ये काम करून, १२ वर्ष झाली होती हॉस्पिटल ऊभारणीचा संघर्ष करून, शेवटी क्रिएटिव्ह ग्रुपच्या बारा वर्षांच्या संघर्षानंतर टिटवाळ्यातील पहिलं मल्टीस्पेशालीटी हॉस्पिटल श्री महागणपती या नावाने २४ ऑक्टोबर २०१२ साली सुरू झालं. मेहनतीचं सार्थक झाल्याच समाधान होतं.पण खरा संघर्ष तर आता सुरू झाला होता, डॉ.बाळ भालेराव सरांच म्हणणं होत की टिटवाळा श्री महागणपती मंदीराकरिता प्रसिद्ध आहे तर हॉस्पिटलच नाव श्री महागणपती हॉस्पिटल असायला हवं, श्री. प्रमोद दलाल काकांनी वडिलांच्या स्मृतीप्रत्यर्थ जागा दान केली होती, पण डॉ. भालेराव सरांच्या शब्दाला मान देऊन श्री. दलाल काकांनी लगेच होकार दिला. लवकरच माझ्या लक्षात आलं स्वतःचा जॅाब सांभाळुन क्लिनिक चालवण्यापेक्षा हॉस्पिटल चालवण कितीतरी पटीने कठीण आहे आणि मला माझं हिंदुजा हॉस्पिटलची १९ वर्षांची नोकरी सोडुन क्रिएटिव्ह ग्रुपची जबाबदारी म्हणुन नोकरी सोडुन हॉस्पिटल चालवण्याकरता यावं लागलं आणि ते गरजेचेही होते पण एकदा देशकार्य करतोय म्हंटल्यावर कोणत्याच शंका नव्हत्या

माझ्या मनात. हॉस्पिटल सुरू केलं तेव्हा दोन एम.बी.बी.एस डॉक्टर होते फक्त, टिटवाळ्यासारख्या खेडेगावात कोणी स्पेशालीस्ट डॉक्टर यायला तयार नव्हते, नर्सेस टेक्निशिअन वेगवेगळी डिपार्टमेंट ऊभी करणं एक मोठ आव्हान होतं. त्यावेळेस हिंदुजामध्ये असलेले डॉ.राजेंद्र पाटणकर जे सध्या ज्युपिटर हॉस्पिटल पुण्याचे सीईओ आहेत त्यांच मार्गदर्शन सतत मिळत होतं. लवकरच आमच्या मित्रांच्या लक्षात आलं की द्वितीय स्तरावरील ऊपचारपद्धती असणारं हॉस्पिटल चालवण्याचा खर्च प्रचंड असतो आणि आम्हाला ज्यांनी मदत केली ते लोक किंवा कॅार्पोरेट कंपन्या काय किंवा टिटवाळ्याच गणपती मंदिर काही आम्हाला हॉस्पिटल चालवण्याचा खर्च देणार नव्हते. म्हणजेच हॉस्पिटल चालवण्याची जबाबदारी जशी क्रिएटिव्ह ग्रुपची होती तशीच विश्वास दाखवुन ऊपचार करणाऱ्या पेशंटची होती, २४ ऑक्टोबर २०२२ ला श्री महागणपती हॉस्पिटलने आरोग्यसेवेची दहा वर्षे यशस्वीरित्या पुर्ण केली, असंख्य लोकांचे, रोटरी क्लब मुंबई पार्लेश्वर, निक ईसरानी फाऊंडेशन तसेच वैयक्तिक अनेकांनी हॉस्पिटल ऊभारणीच्या कार्यात हातभार लावला. दहा वर्षांची यशस्वी रूग्णसेवा क्रिएटिव्ह ग्रुपच्या हातुन घडलीये, जे कार्य करतोय ते देशकार्यच आहे या भावनेतून आजही आम्ही सर्वजण काम करतोय याच मोठं समाधान मला आहे.

डॉ.संकेत पाठारी, डॉ.रितेश नायक, डॉ.आतीश दिक्षित, डॉ. हिंतेंद्र चौधरी तसेच जवळपास २५ डॉक्टर आज आपल्या या हॉस्पिटलमध्ये सेवा देतायत, या सर्वांनी व ईतर सर्व स्टाफ ने सुद्धा खुप मेहनत घेतलीय. आतातर हॉस्पिटलला एन.ए.बी.एच. चे क्वालीटी करता असणारे प्रमाणपत्रसुद्धा मिळालय. आज या हॉस्पिटलमध्ये माझ्या आईसारखा दम्याचा त्रास असणारे बरेच पेशंट रात्री बेरात्री ऊपचार घेण्यासाठी येतात, आज कोणत्याही आईला ऊपचार मिळण्यासाठी दिवस उजाडायची वाट बघत त्रास सहन करावा लागत नाही. माझ्या भावाला हिमोफेलीया आजारासाठी लागणारे महागडं इंजेक्शन हिमोफेलिआ सोसायटीने आपल्याच हॉस्पिटलमध्ये मोफत ऊपलब्ध कारून दिलय जे २४ तास ऊपलब्ध आहे, वैयक्तिक माझ्यासाठी या अत्यंत समाधान देणाऱ्या गोष्टी आहेत. थोर व्याख्याते श्री.दाजीशास्री पणशीकर यांच्या आग्रहाखातर ग्रामीण भागातील हॉस्पिटल ऊभारणीच्या संघर्षावर माझे ‘समर्पण’ हे पुस्तक प्रकाशित झालय. स्टोरीटेल या ॲपवर श्री.ऊदय सबनीस यांच्या भारदस्त आवाजात ते ऑडिओ बुकच्या माध्यमातुन ऊपलब्ध आहे.

हे कार्य करत असताना भावना तीच आहे ‘समर्पणाची’.

****

®© विक्रांत बापट

श्री महागणपती हॉस्पिटल, टिटवाळा

मो.नं. ९८२०८७२०८४

जिद्द

साधनाताईंनी फोन खाली ठेवला आणि काही वेळ त्या तशाच शांतपणे बसून राहिल्या..जणू त्या पंचवीस वर्षापूर्वीच्या काळात गेल्या होत्या.. त्यांना आठवला तो दिवस..

नेहमीप्रमाणे सुहास दहा वाजता ऑफिसला गेला.. पिंकीच्या शाळेची बस येईल म्हणून ती घाईघाईने तिची तयारी करत होती.. विराज.. तिचं नऊ महिन्याचं बाळ.. नुकताच दूध पिऊन गाढ झोपला होता.. प्रेमभराने त्याच्या गालाची पापी घेऊन ती पिंकीचा डबा भरू लागली.. तिने पिंकीला गल्लीच्या कॉर्नरवर थांबलेल्या बसमध्ये चढताना पाहिलं आणि नंतरच ती घरात वळली..!

एवढ्यात कुकरची शिट्टी वाजली.. जरा जोरातच.. कदाचित तिसरी किंवा चौथी असावी.. ती एकदम घाबरली.. तिला वाटलं बाळ उठेल घाबरून.. म्हणून ती पळतच स्वयंपाक घरात गेली आणि तिने पटकन कुकर बंद केला..आणि बाहेर आली.. पाळण्यात शांत झोपलेल्या विराजकडे बघून तिला हायसं झालं.. ती शांतपणे खुर्चीत बसली आणि तिने वर्तमान पत्र उघडलं.. हाच वेळ तिला मोकळा मिळायचा.. स्वतःसाठी.. नाहीतर एकदा विराज उठला की तिला काही सुचू देत नसे.. लहानपणापासूनच भारी अवखळ होता तो.. विराजचा विचार मनात येताच तिला हसू आलं.. तिने परत एकदा झोपलेल्या विराजकडे पाहिलं.. नंतर तिला वाटलं असा कसा हा गाढ झोपलाय?? याला बरं असेल ना.. ग्लानी वगैरे तर आली नसेल ना.. नाहीतर एवढ्याशा आवाजाने मुलं दचकून उठतात.. पण हा अगदी शांत झोपलाय.. आपलं मन उगीच काहीतरी शंकाकुशंका काढत असतं.. सुहासला सांगू का..तिला आठवलं, मागे मुंबईला गेलो होतो तेव्हा असंच, इंजिनाची किती मोठी शिट्टी वाजली.. पण तेव्हाही हा असाच शांत झोपला होता.. तेव्हा खूपच लहान होता म्हणा.. पण तरी काय झालं.. म्हणून तर जास्त काळजी वाटते.. अशा उलट सुलट विचारांनी तिचं डोकं भंडावून गेलं.. शेवटी तिने ठरवलं आज हे सुहासच्या कानावर घालायचं आणि लगेच डॉक्टरकडेही जाऊनच यायचं म्हणून.. तेव्हा तिचं मन थोडं शांत झालं..

संध्याकाळी सुहास घरी आल्यावर ठरल्याप्रमाणे ती त्याच्या बरोबर आधी त्यांच्या फॅमिली डॉक्टरकडे गेली.. त्यांचा प्रॉब्लेम ऐकल्यानंतर त्यांनीच या ENT डॉक्टरांकडे म्हणजे डॉक्टर प्रेरणा साने यांच्याकडे जाण्यास सांगितले..

त्याप्रमाणे ती दोघे विराजला घेऊन डॉक्टर प्रेरणा यांच्याकडे गेले.. तेव्हापासून जणू तिच्या पायाला भिंगरी लागली.. डॉक्टरांनी जेव्हा त्या दोघांना सांगितले की, त्यांच्या बाळाला अजिबात ऐकू येत नाही..त्याला profound hearing loss आहे.. म्हणजे तो जन्मतःच ठार बहिरा आहे.. तेंव्हा त्यांच्या पायाखालची जमीनचं सरकली.. डॉक्टर खोटं बोलतायत असंच त्यांना वाटलं.. कारण त्यांची मोठी मुलगी पिंकी म्हणजे चिन्मयी, एक अतिशय गोड, हुशार आणि चुणचुणीत मुलगी होती.. एकतर तिच्या जन्मानंतर जवळजवळ सात-आठ वर्षानंतर

त्यांनी दुसरा चान्स घेतला होता.. मुलगा झाला म्हणून सगळेच खुश होते.. आणि आता डॉक्टर हे काय सांगत होत्या.. डॉक्टरांनी पुढे हे ही सांगितलं की तुम्ही आणखीन काही tests ही करून घ्या.. मुंबईला अलियावर जंग हॉस्पिटलमध्ये जा.. त्यांनी चिठ्ठी लिहून दिली.. साधनाला अजून आशा वाटू लागली.. तिने लगेच सुहासला रजा काढायला सांगितली.. ती स्वतःही काम करत होती.. तिनेही स्वतःची रजा मंजूर करून घेतली.. आणि दोघेही मोठ्या आशेने अलियावर जंग हॉस्पिटलमध्ये गेले.. पण.. दुर्दैवाने त्यांनीही डॉक्टर साने यांच्या म्हणण्याला पुष्टी दिली.. आता मात्र साधनाचे धैर्य गळालं..सुहासनेच यावेळी तिला सावरलं.. मुंबईच्या डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार ते म्हैसूर येथील जगप्रसिद्ध ENT हॉस्पिटलमध्ये गेले.. यांवर काय उपाय करता येतील हे पाहण्यासाठी.. तिथे गेल्यावर साने डॉक्टरांनी सांगितलं तेच खरं आहे या निर्णयावर शिक्कामोर्तब झालं आणि साधनाचा इतके दिवस आवरून ठेवलेला बांध फुटला.. ती सुहासच्या गळयात पडून रडू लागली.. आपल्याचं वाट्याला हे भोग का आले म्हणून तिचं हृदय आक्रोश करू लागलं ..सुहासलाही अश्रू आवरेनात.. थोड्या वेळाने त्याने स्वतःला सावरलं.. आणि हळूहळू समजावत, धीर देत साधनालाही शांत केलं.. तिला त्याने एक मात्र बजावलं ..हे रडलीस ते पहिलं आणि शेवटचं.. इथून पुढे हिंमत हरायची नाही..आपण दोघांनीही मिळून आल्या परिस्थितीला तोंड द्यायचं..आणि साधनाने नंतर जणू कंबरच कसली.. मग मात्र तिने मागे वळून पाहिलं नाही.. आपला सारा वेळ फक्त मुलांसाठी द्यायचा हे जणू ठरवूनचं टाकलं.. यासाठी वेळप्रसंगी नातेवाईक, नोकरी, मित्र मैत्रिणी,सारं सारं तिने मागे सारलं.. स्वतःची चैन, मौजमजा.. हे तर ती जणू विसरूनच गेली..

तिला आठवलं, जेंव्हा ती परत नोकरीवर जॉईन होणार अस ठरलं, तेंव्हा त्या बाळाच्या पाळणाघरासाठी तिला किती फिरावं लागलं.. कारण हे बाळ कर्णबधिर असल्याने याची विशेष काळजी घ्यावी लागणार म्हणून सुरवातीला सगळीकडून नन्नाचा पाढाच ऐकू आला.. एक वेळ तर अशीही आली की आता नोकरी सोडावी लागते की काय असंही वाटलं.. पण देवाचीच कृपा म्हणायची.. एक जोडपं या बाळालाही सांभाळायला तयार झालं एकदाचं.. आणि अशा रीतीने साधनाची नोकरी परत एकदा सुरू झाली.. एवढ्या छोट्या बाळाला दिवसभर कानात ते मशीन लावून ठेवणं खूप अवघड गोष्ट होती.. पण त्याची सवय करणंही भाग होतं.. त्यामुळे ऋतू कुठलाही असला तरी विराजला सदैव टोपडं घालावं लागायचं.. जेणेकरून त्याला मशीन काढता येत नसे.. मग त्यासाठी साधनाने एक युक्ती लढवली.. ती वेगवेगळया आकाराची म्हणजे सशाचे, माकडाचे असे विविध प्राण्यांचे, पक्ष्यांचे आकार, कान असलेली टोपडी शिवून घ्यायची.. ज्याची छोट्या विराजला गंमत वाटेल आणि तो टोपडं काढून टाकणार नाही.. असं करत तिने त्याला मशीनची फार लहानपणापासूनच सवय लावली.. त्यावेळेस वायर असलेली मशीनच बाजारात उपलब्ध होती.. नंतर तो शर्ट घालण्याइतका मोठा झाल्यावर रंगीबेरंगी, तेही खिसेवाले शर्ट शोधून आणायचे, मग परत त्याला मागे एक छोटुसा मशीन ठेवण्याएवढा खिसा शिवून घ्यायचा.. हे सर्व ती न कंटाळता करत असे.. तिने मान झटकली.. यात काय एवढं.. हे तर सगळयाच आया करतात.. ती स्वतःशीच हसली.. तिला आठवलं.. एकदा डॉक्टर प्रेरणा तिच्या घरी आल्या होत्या.. तिचं घर पाहून त्या थक्कच झाल्या.. तिच्या घरी तिने घरातल्या प्रत्येक वस्तूवर चिठ्ठी लावलेली होती.. जसं हॉल मध्ये, TV वर 'TV-Television' तसंच मराठीतही दूरचित्रवाणी असेही लिहून ठेवले होते.. इतरही वस्तू, जसे सोफा, डायनिंग टेबल, खुर्ची, शोकेस, फॅन, घड्याळ, पोस्टर, फोन इ. सगळीकडे अशाच चिठ्ठ्या लावून ठेवलेल्या होत्या.. आत स्वयंपाक घरातही हाच प्रकार.. प्रत्येक पदार्थाचे चित्र आणि त्याच्या नावाची चिठ्ठी..हे सारं पाहून त्यांना खूप

आनंद झाला.. कारण ही कर्णबधिर मुलं visually म्हणजे चित्रं पाहून, वाचूनचं लवकर शिकतात.. आणि म्हणूनच साधनाने जेवढी मिळतील तेवढी चित्र मिळवून सबंध घरभर चित्रं लावून ठेवली होती.. म्हणजे जाता येता ती विराजला दिसावीत, हा हेतू.. आणि त्याच्या डोक्यात ते शब्द पक्के बसावेत..यासाठी आपलं घर इतरांच्या घरापेक्षा वेगळं दिसत असेल हा विचारही चुकून कधी तिच्या मनात आला नव्हता..साधना आणि सुहास विराजसाठी करत असलेल्या या प्रयत्नांबद्दल त्यांनी मनापासून त्यांचं दोघांचंही कौतुक केलं.. कारण ऑडिओलॉजिस्ट, स्पीच थेरपिस्ट, सारेच जण कर्णबधिर मुलांसाठी काय काय करावे ते सांगतात, पण त्या सूचनांच तंतोतंत पालन करणं हे फक्त आणि फक्त पालकांच्याचं हातात असतं आणि जे पर्यायाने त्यांच्याच मुलांच्या हिताचं असतं..जे साधना आणि सुहास समजून चुकले होते.. आणि म्हणूनच प्रसंगी प्रेमळ तर कधीकधी कठोर होऊनही साधना विराजला शिस्त लावण्याचा प्रयत्न करीत होती..तब्बल पाच वर्षानंतर जेव्हा विराज तिला पहिल्यांदा 'आई' म्हणाला तो क्षण तर ती कधीच विसरू शकणार नव्हती.. आताही त्या आठवणीने तिच्या डोळ्यांत पाणी तरारलं ...तिने डोळे मिटले..

तिला आठवलं, एक दिवस तिला ऑफिस मधून यायला थोडा उशीर झाला होता.. ती घराच्या गेटपाशी पोहचली तोच त्यांच्या शेजारी राहणारे एक शिक्षक ,जोशी सर, त्यांच्या स्कूटर वरून तिथे आले आणि त्यांच्या बरोबर विराजही उतरला.. त्यांच्याबरोबर त्याला पाहून ती थक्कच झाली.. तो तर पाळणाघरात असायला हवा होता.. मग यांच्याकडे कसा??ती काही विचारणार तोच त्यांनी बंबारडींग सुरु केले.. झाले होते असे की त्याची शाळा तर



दुपारी तीन वाजताच सुटलेली.. पाळणाघरातल्या काकीच त्याला शाळेत सोडायला आणि आणायला जायच्या.. त्यादिवशी त्यांनी शाळेत सोडलं खरं पण परत आणायला विसरल्या.. विराज तिथेच मैदानात फिरत राहिला.. आणि कर्णबधिर असल्याने कुणी काही विचारलं तरीही गप्पच बसला.. त्यामुळे कुणालाच काही कळेना.. हा कुणाचा मुलगा.. इथे कसा आला, काय करतोय, त्याला कुठे जायचंय ते.. नंतर त्या शाळेचे सर, जे विराजला आणि त्याच्या आईला म्हणजेचं साधनाताईंनाही ओळखत होते, त्यांनी विराजला पाहिलं आणि मग घरी आणून सोडलं.. ही सारी चित्तरकथा ऐकून सुहास आणि साधना हबकूनच गेले.. म्हणजे दुपारी तीन वाजल्यापासून संध्याकाळी सहा साडेसहा पर्यंत विराज मैदानात एकटाच फिरत होता.. ते जोशी सर भेटले म्हणून.. नाहीतर.. आताही नुसत्या विचारानेच साधनाच्या अंगावर काटा आला..नंतर यावरही त्यांनी मार्ग काढला.. त्याच्या शर्ट

पॅन्टच्या खिशात, तसेच दप्तरात पण दोघांचेही ऑफिसचे फोन नंबर, घराचा पूर्ण पत्ता असलेल्या चिठ्ठ्या ठेवण्यास सुरुवात केली.. साधनाला वाटलं, आता मागे वळून पाहताना त्या साऱ्या गोष्टींच हसू येतंय.. पण तेंव्हा.. तेव्हा मात्र काळजाचं पाणी पाणी झालं होतं.. असो.. दिवस कसे भरभर जातात ना..

असाच दुसरा एक प्रसंग तिला आठवला.. एकदा लहानपणी विराज खेळता खेळता शू आली म्हणून घरी पळत आला आणि धाडकन बाथरूम मध्ये घुसला.. तेव्हा गावाहून त्याची आजी म्हणजे साधनाची आई आली होती, त्यामुळे तो पाळणाघरात न जाता घरीचं आजी जवळ होता.. पण बराच वेळ झाला तरी तो बाहेर येईना त्यामुळे आजीला काळजी वाटू लागली. त्यांनी बऱ्याच हाका मारल्या.. पण त्या विराजला कशा ऐकू येणार??आत पाण्याचा नळ चालू असल्याचा आवाज येतं होता..त्याला तर बिचाऱ्याला रडताही येत नव्हतं.. म्हणजे आत तो रडतोय हे कळणार तरी कसं??.. त्यामुळे आतमध्ये विराजचं नेमकं काय चाललंय हे कळायलाही मार्ग नव्हता.. शेवटी नाईलाजाने त्यांनी मुलीला म्हणजे साधनाला ऑफिसमध्ये फोन लावला.. अर्थातच वरिष्ठांची परवानगी घेऊन ती लगेचच घरी यायला निघाली.. इथे आजींनीही शेजारच्या लोकांची, बिल्डिंगच्या वॉचमनकाकांची मदत घेतली, त्यांनी सुतार वगैरे बोलावले होतेच.. साधना घरी पोचताच ते दार तोडण्यात आलं आणि आत अडकलेला विराज एकदाचा मोकळा झाला.. तो रडतच आईला येऊन बिलगला.. त्याचा केविलवाणा चेहरा पाहूनच साधनाचे डोळेही झरत होतेच.. पण त्या परिस्थितीतही खंबीरपणे तिने त्या आलेल्या सुताराकडूनच सगळ्या खोल्यांच्या खालच्या कड्या काढून वर उंचावर, विराजचा हात सहजी पोचणार नाही अशा उंचीवर बसवून घेतल्या.. परिस्थिती त्यांना असे अनेक धडे शिकवितच होती...असो.

विराजचा आज दहावीचा निकाल होता.. सकाळपासूनच त्याच्या आतबाहेर फेऱ्या चालू होत्या.. साधनाही थोडीशी बेचैन होती.. तिने विराजच्या लहानपणी घेतलेल्या निर्णयाची आज जणू कसोटी लागली होती..इतक्यात सुहासचा फोन आला.. तो विराजच्या शाळेत त्याचा निकाल आणायला गेला होता..सुहासचा आनंद मनात मावेनासा झाला होता.. त्याने सांगितले की विराज फर्स्ट क्लास मध्ये पास झाला होता.. त्याला चक्क ७०% मार्क्स मिळाले होते.. साधनालाही खूप आनंद झाला.तिने विराजला लगेच पेढे आणण्यासाठी खाली पिटाळले..विराजच्या लहानपणी तिने घेतलेला निर्णयचं शेवटी योग्य ठरला होता..त्यावेळी त्याला विशेष शाळेत घालावे म्हणून खूप जणांनी आग्रह धरला होता.. पण त्यावेळी साधना आणि सुहास मात्र आपल्या निर्णयावर ठाम होते.. त्यांनी विराजला सर्व सामान्य मुलांच्या शाळेतच घातले.. इतर मुलांबरोबर विराजला आणण्यासाठी अर्थातच त्यांना दोघांनाही अपार कष्ट घ्यावे लागले.. अर्थातच त्यांच्या बरोबरच विराजचे इंटिग्रेटेड शाळेतील वाचा शिक्षक ,माने सर,त्याचे ऑडिओलॉजिस्ट दळवी सर,स्पीच थेरपिस्ट देसाई सर या सर्वांचाचं सिंहाचा वाटा होता..या साऱ्यांच्या मदतीशिवाय आजचा दिवस दिसूच शकला नसता.. साधनाने मनोमन या साऱ्यांचे आभार मानले..

नंतर विराजने कोणत्या शाखेत प्रवेश घ्यावा यावरही त्यांनी खूप विचार विनिमय केला.. त्याच्या शिक्षकांशी चर्चा केली..विराजचा कल आर्टस् कडेच दिसून येत होता.. तो चित्रही फार सुंदर काढायचा.. साधनाला आठवलं, याची जाणीवही तिला ओघाओघानेच झाली होती.. एकदा असेच ते सर्व जण गाण्याच्या मैफिलीला गेले होते.. विराजला social gatherings ची सवय व्हावी, हा मुख्य हेतू असायचा..नेहमीप्रमाणे विराजने काही त्रास दिला तर सोयीस्कर म्हणून त्यांनी दाराजवळचीच सीट घेतली होती.. तिथे अंधुकसा प्रकाशही येत होता..मध्यंतरात दिवे

लागल्यानंतर तिने पाहिलं तर काय, विराजने त्या मैफिलीच, म्हणजे रंगमंच, मागची सजावट, गायक, वादक त्यांची बैठक.. अगदी निवेदन करणारा.. आणि पुढे असणाऱ्या काही प्रेक्षकांची डोकी सुद्धा अगदी सुंदर रेखाटली होती.. अशा कुठल्याही कार्यक्रमाला जाताना विराज लहान असल्याने त्याला काही समजलं नाही तरी तो कंटाळू नये म्हणून ती नेहमीच त्याची चित्रांची वही, रंग घेऊन जायची.. त्याचा आज असा उपयोग झाला होता.. त्यावेळी तो जेमतेम आठ नऊ वर्षांचा असेल.. इतक्या लहान वयात त्याने इतकं सुंदर अगदी सगळ्या बारकाव्यांसकट काढलेलं चित्र पाहून साधनाला खरंच खूप आनंद झाला होता... हा प्रसंग तिला आठवला आणि तिलाही शिक्षकांचे म्हणणे पटले. मग तिनेही सुहासला समजावून सांगितलं आणि आर्टस् मध्ये पण त्याला जास्त theoretical विषय असणार नाहीत असे बघूनच कोर्सची निवड करायची असे सर्वानुमते ठरले.. चिन्मयीने, म्हणजे पिंकीने याबाबतीत खूपच मदत केली.. गूगलच्या मदतीने कोर्स शोधून त्यावर चर्चा करून शेवटी त्याने applied आर्टस् मध्ये डिप्लोमा करावा असे ठरले.. एकतर विराजची चित्रकला चांगली होती आणि या कोर्सला इतर कोर्सच्या मानाने थिअरी विषयही कमी होते.. अर्थात सर्वसामान्य मुलांपेक्षा विराजला अधिक कष्ट घ्यावे लागणारच होते.. पण त्याला त्याची तयारी होती.. हा चांगला पाच वर्षांचा कोर्स होता.. अनेक अडचणी आल्या.. एक वेळ तर अशी होती की घरातील चौघेही चार वेगवेगळ्या दिशेला म्हणजे चार वेगवेगळ्या गावात राहात होते.. पण ही कठीण परिस्थितीही बदलली.. विराजने अप्लाइड आर्टस् मधला डिप्लोमा तर मिळवला.. पण साधना आणि सुहास दोघांचीही इच्छा होती की विराजने एक तरी डिग्री मिळवावी.. म्हणजे त्याच्या पुढील आयुष्यात नोकरी किंवा इतर कुठल्याही गोष्टीसाठी झाला तर उपयोगचं होईल.. मग सर्वांनी त्या दृष्टीने चाचपणी सुरू केली.. चिन्मयीने औरंगाबाद युनिव्हर्सिटी मध्ये असा एक कोर्स असल्याचे सांगितले.. मग त्याची सर्व माहिती काढली.. आता मात्र काहीतरी निर्णय घ्यायची वेळ आली होती.. आतापर्यंत विराज आईबाबांच्या मायेच्या पांघरुणाखाली वाढला होता..आता ते पांघरूण दूर करण्याची वेळ आली होती.. साधना आणि सुहास यांनी खूप विचार केला.. सुहास खूपच बेचैन होता.. पण यावेळी साधनाने त्याला समजावलं..कारण कधी तरी हे करावंच लागणार होतं.. आपण दोघ त्याला किती दिवस पुरणार? या जगात सक्षमपणे वावरता येणं त्याला भागच होतं..आणि होस्टेल मध्ये राहिल्याने आपोआपच या सर्व गोष्टी कळल्या असत्या म्हणूनच विराजसाठी ही उत्तम संधी होती.. शेवटी बराच ऊहापोह झाल्यानंतर विराजने औरंगाबाद युनिव्हर्सिटीच्या होस्टेल मध्ये राहायचं हे ठरलं.. आणि त्याच्या नव्या अध्यायाला सुरुवात झाली.. सर्वसामान्य मुलांना देखील होस्टेल मध्ये किती अडचणींना तोंड द्यावे लागते, मग विराज तर कर्णबधिर होता..सुरवातीला जरी विराजला खूप अडचणी आल्या तरी त्यावर मात करून त्या सोडवायला तो शिकला.. ही साधना सुहासच्या दृष्टीने खूप मोठी गोष्ट होती.. अखेर तेही पर्व संपले.. विराजला फाईन आर्टस् ची डिग्री मिळाली.. थोड्याच दिवसांत, विराजला एका खूप मोठ्या जाहिरात कंपनी मधून नोकरी साठी call आला.. ग्राफिक्स डिजायनर म्हणून तो तिथे जॉईन ही झाला..आनंदाचे दिवस आले की पाठोपाठ येतात.. तसे झाले.. त्याला नोकरी लागल्यानंतर काही दिवसातच त्याला एक फोन कॉल आला आणि त्याला कळलं की या lockdown च्या काळात त्याने सहज म्हणून पाठवलेल्या चित्राला ‘कलानिधी' या पुण्यातील संस्थेतर्फे ‘युवा कलाकार' म्हणून प्रथम पारितोषिक मिळाले होते..आणि इतकंच नाही तर शेजारीच असलेल्या दर्पण आर्ट गॅलरीमध्ये त्याला त्याच्या चित्रांचं प्रदर्शन भरवण्याची संधी देखील मिळणार होती.. ही तर विराजसाठी खूपच मोठी संधी होती.. विराज हरखून गेला.. त्या दिवशी मात्र साधना आणि सुहासला

त्यांच्या कर्तव्यपूर्तीचे समाधान मिळाल्यासारखे वाटले.. विराजच्या जडणघडणीत ज्यांनी ज्यांनी मदत केली त्या सर्वांविषयी कृतज्ञभाव, स्नेहभाव दाटून आला.. या सर्वांचाही विराजच्या आनंदात सहभागी होण्याचा हक्क आहे आणि म्हणूनच या सर्वांना आपण विराजच्या बक्षीस समारंभाच्या दिवशी बोलावू असे त्यांनी ठरवले.. म्हणून तर साधनाने आज पहिला फोन विराजच्या डॉक्टरांना म्हणजेचं, डॉक्टर प्रेरणा साने यांना केला होता..

"आऽ ऽ ई.. आऽ ऽई" विराजच्या हाका ऐकू येत होत्या..साधनाताई एकदम भानावर आल्या.. चक्क पंचवीस वर्षांची सफर करून आल्या होत्या त्या.. त्यांना हसू आलं.."आ ऽऽ ई, हऽसऽतेऽसऽ का ऽऽ ,म ऽ ला ऽ ऽ चि ऽ ऽ त्र ऽ ऽ नि ऽवडाऽऽ यला ऽ ऽ मदत ऽऽ कर ऽऽ ना ऽऽऽ.."..एवढं सलग वाक्य त्याच्या तोंडून ऐकून त्यांना भरून आलं.. त्यांनी त्याच्या तोंडावरून मायेने हात फिरवला आणि बोटं कानशीलावर मोडली.. बोटांचा कट कट आवाज आला.. "माझीच मेलीची दृष्ट लागायची पोराला"..असं पुटपुटत विराजच्या हाताला धरून, समाधानाने त्या त्यांच्या खोलीबाहेर पडल्या...

****

®©रीमा गुमास्ते,
खारघर, नवी मुंबई
संपर्क : ९९८७०८००५७

काव्यसुमन

सुख वेचता आलं पाहिजे

दुःख कुरवाळत बसण्यापेक्षा
सुख वेचता आलं पाहिजे
दुरून एकटं बघत बसण्यापेक्षा
सोबतीने नाचता आलं पाहिजे..

नेहमी गाल फुगवून बसण्यापेक्षा
खळखळून हसता आलं पाहिजे
स्वतःला खोलीत कोंबण्यापेक्षा
चारचौघात बसता आलं पाहिजे..

थकून कुठंतरी कायमचं थांबण्यापेक्षा
हळूहळू ध्येयापर्यंत चालता आलं पाहिजे
नको तिथे गप्प बसण्यापेक्षा
खरं ते बोलता आलं पाहिजे..

नातं कोणतंही असो
कायम निभावता आलं पाहिजे
जात असेल कुणी सोडून रागात
मनवुन थांबवता आलं पाहिजे..

मनात असेल दडलं जे काही
बेधडक सांगता आलं पाहिजे
हवं असेल जर मनापासून काही
निसंकोच मागता आलं पाहिजे..

****

®© कवी आश्लेष माडे
कोहमारा
संपर्क - +91-9403399333

मानवरुपी राजहंस

न भूतो न भविष्यती
अगाध जगी जयांची कीर्ती,
माझे नमन अशा महामानवाप्रती
शिल्पकार तू संविधानाचा IIधृII

प्रतिकूल परिस्थितीशी झुंजला
उच्चविद्याविभूषित म्हणून शोभला
अन्यायावर कडाडून हल्ला केला
जागृत केले प्रजाजना II1II

अन्यायाला वाचा फोडणे
त्यासाठी असावे शिक्षणाचे लेणे,
मंत्र दिला आम्हा महामानवणे
प्रत्यक्ष कृती मधूनी II2II

ऐसा महामानवाची कथा
शब्द अपुरे पडती सर्वथा,
मी पामर काय वर्णू तव यशोगाथा
कास धरा हो शिक्षणाची II3II

****

®© कवी नारायणजी गौपाले
सेंदूरवाफा, साकोली
संपर्क - +91-9403399333

स्वप्नांच्या मागे लाग..!

ऐक मित्रा..
पुरे झालं मुळू मुळू रडणं
बहरण्याआधीच आयुष्याच्या फांदीवरून खुडणं
आकाश शोध, पेटून ऊठ, स्वत:कडे काही माग
ऐक मित्रा चल आता स्वप्नांच्या मागे लाग!

शेजार, समाज सारं कसं चौकटीतलं जगणं
शिक जरा चौकटीच्या बाहेर सुद्धा बघणं
डोळे मिटून राहू नकोस आता तरी जाग
ऐक मित्रा चल आता स्वप्नांच्या मागे लाग!

नुसताच आलास म्हणून एक दिवस जाऊ नकोस
दुसऱ्यांच्या नजरेनं कधीच स्वत:ला पाहू नकोस
केलस सगळ्यांचं आता मनाला पटेल तसं वाग
ऐक मित्रा चल आता स्वप्नांच्या मागे लाग!

पुढे जात असताना बांध जग गाठीशी
ध्येय असूदे समोर आणि निश्चय तुझ्या पाठीशी
ताल धर, रंग भर, छेड तुझा एखादा राग
ऐक मित्रा चल आता स्वप्नांच्या मागे लाग!

पडला असशील नव्व्याण्णव वेळा,पण ती एक संधी सोडू नकोस
होणार नाही म्हणत पठ्ठ्या स्वत:चचं मन मोडू नकोस
तयार हो, पुल अप युअर सॉक्स अन् भाग मिल्खा भाग
ऐक मित्रा चल आता स्वप्नांच्या मागे लाग!!!!

****

®© कवी अश्विनी स्वर्ण

ताडोबा

चला जाऊया ताडोबाला, वाघोबाला भेटायला
मोर हरीण सांबर अस्वल, थार ना उरे आनंदाला
चला जाऊया ताडोबाला, वाघोबाला भेटायला - घ -

निरनिराळे पक्षी सुंदर, किलबिल करती गाती मधूस्वर
फळे खास बेल कवठाचे, लागे झाडाला उंच वर वर
प्रसन्न होती मन आपुले, हे दर्शन लाभे डोळ्यांला
चला जाऊया ताडोबाला, वाघोबाला भेटायला. - १ -

निसर्गाच्या हवेत जाऊनी, निसर्गाच्या कवेत राहुनी
गदगद प्रफुल्लित होते जीवन, भूतलावर हा स्वर्ग पाहुनी
हे सगळं सुख अनुभवायला, चला निघूया फिरायला
चला जाऊया ताडोबाला, वाघोबाला भेटायला. - २ -

भिरभिर भोवती फिरती पक्षी, जणू निसर्गाच्या सुंदर नक्षी
प्राणी पक्षी फळ फुल झाडे, सुंदरतेच्या देतात साक्षी
धन्य होऊनी नमन करू, या श्रुष्टी निर्मात्याला
चला जाऊया ताडोबाला, वाघोबाला भेटायला.
मोर हरीण सांबर अस्वल, थार ना उरे आनंदाला
चला जाऊया ताडोबाला, वाघोबाला भेटायला. - ३ -

****

®© सौ. मयुरी भूषण कोडमलवार(गोडे)
चंद्रपूर, महाराष्ट्र
संपर्क - mayurigode61@gmail.com

प्रकाशमय बिरादरी...

रूसली जरी वेळ होती
आशीर्वादांची साथ होती,
आलेल्या त्या वेळेवरही
प्रार्थनांनी केली मात होती.

क्षणभंगुर त्या वेळेमध्ये
अवघे राज्य सुने भासत होते,
हरवतो जसा देव देवळातून
'हेमलकसा' तसे जाणवत होते.

स्तब्ध होते ते पाणी त्रिवेणीचे
आतूर होते, सारे प्राणी बिरादरीचे
फुलांचेही दरवळणे थांबले होते,
रस्ते ही जणू वाट बघत बसले होते.

अशा सुन्न पडलेल्या निसर्गानी
साऱ्या जनतेनी, हितचिंतकांनी

मनोभावे केल्यात प्रार्थना ,
की मंदावलेल्या प्रकाशाच्या
पुन्हा तेजोमय होऊ दे पाऊलखुणा...

हसतमुख अशा चेहऱ्यानी
तो सुर्य पुन्हा उगावला,
वाट होती ज्या दिवसाची
तो दिवस सोनेरी उजाळला.

परतला देव पुन्हा देवळात जणू
पेटल्या पणत्या घरोघरी,
विजयी अशा पुनरागमनाने
पुन्हा "प्रकाशमय" झाली बिरादरी....

****

®© -कवी अमित भांडे
अंजनगाव सुर्जी
संपर्क - ९७६४७१०७४२

आमचा बाबा

मानवतेचे महान मंदिर
नाव तयाचे आनंदवन
वेदनेच्या जाणिवेने
सदैव येथे भरते मन||1||

तूच तयाचा शिल्पकार
जखमाना ही हास्य दिले
धुडकावलेल्या असंख्य जीवा
माणसांचा गाव मिळेल||2||

हात असूनी बोटे नाही
मुठीचा तू धीर दिला
अंध अपंग उपेक्षित
सुरू झाला सिलसिला||3|| दया नको अश्रू नको
हवे नवनिर्माणाचे हात
तुम्हीच तुमचे साथी
देऊ एकमेका साथ|4||

सेवेचा हा वसा घेऊनी
तुझेच फिरतो आम्ही दूत
जनसेवेचे वृत्त आमचे
बाबांचे आम्ही मानसपूत|5||

निराश होता अनेक वेळा
संकटांचा काळोख नभा
पाठीवरती हात ठेवून
तूच होतो आमचा बाबा||6||

****

®© प्रदीप महादेव कासुर्डे
घणसोली नवी मुंबई
+91-7738436449

समर्पित

चालणारी पाऊले माझी तुझ्या रस्त्यावर...

एकट्याची वारी माझी ! तुझ्या रस्त्यावर...

तुझीमाझी प्रत्यक्ष गाठभेट ठरवेल नियती...

अदृष्य 'अभंग'साथसंगत ! तुझ्या रस्त्यावर..

ओढ अशी की ! समुद्र घेई जिरवून पाणी..

लाटेत वाही संत जणांच्या ! तुझ्या रस्त्यावर...

तव निजरूप आभासी घेऊन खांद्यावर..

चाले पालखीचा भोई ! तुझ्या रस्त्यावर....

जोडीतो दुरून हात ! नभातल्या 'कळसा'..

सार्थ सकल "समर्पित" जन्म ! तुझ्या रस्त्यावर...

****

®© निलेश पुरुषोत्तमराव येते.

बडनेरा.

+91-8767399199

डोळे उघडणारे स्वप्न

आठवण आली घरच्यांची आज
माझ्याविना कसे असतील ते जगत?
बघावे वाटले या डोळ्यांना
निघालो फिरत फिरत..

पहिले घरीच गेलो माझ्या
बाप अंथरुणावर पडला होता
मिनिटा मिनिटाला खोकत होता
शरीर झालेले जीर्ण, सांगाडाच उरला होता
पैशाविना औषध नसावे
माझ्याकडेच येण्याच्या तयारीत होता
गहिवरून आले मनात बापाला बघून
मी असतो तर,
कसंही करून औषधांची सोय केली असती
बापाची ही हालत तर झाली नसती
पण आता काय उपयोग...

बापाला बघून मागच्या अंगणात गेलो
माय दरवाज्यात बसून एकटक समोर पाहत होती
रडत रडत आसवांच्या सरी बरसवत होती
डोळे थकलेले, मनानेही थकली होती
माझ्या जाण्याने अन्
बापाच्या काळजीने पूर्णपणे तुटली होती
दोन थेंब वाहीलेच डोळ्यांतून मायेला बघून
मी असतो तर,
आज ती जरा खुश असती
पण आता काय उपयोग
मी या जगात उरलो नव्हतो...

डोळे पुसून बायकोला बघायला गेलो
घरबांधणीच्या कामावर काम करत होती
उन्हातान्हात पैशासाठी राबत होती
वखवखलेल्या नजरा रोखलेल्या तिच्यावर
तरीही सहन करत होती
मी माझ्यापाठी सोडलेल्या कुटुंबासाठी जगत होती
परत दोन थेंब वाहले तिची काळवंटणारी आकृती बघून
मी असतो तर,
तिची अशी धावपड झाली नसती

पण आता काय उपयोग
मी या जगात उरलो नव्हतो..

बहिणीला बघावं म्हटलं, तिच्या कॉलेज ल गेलो
खिदडणाऱ्या मुलांमुलींपासून दूर एकटीच बसली होती
मूकपणे येणारे अश्रू स्वतःचेच स्वतः पुसत होती
फीस भरायची होती कॉलेजची,
कशी भरावी याचा विचार करत होती
कदाचित शिक्षण सुटणार इथून आता
म्हणून दुःखी झाली होती
खुप वाईट वाटले तीच शिक्षण सुटणार म्हणून
मी असतो तर,
कस ही करून फी भरली असती
पण आता काय उपयोग
मी या जगात उरलो नव्हतो...

मनावर दगड ठेवून माझ्या पिल्लाला बघायला गेलो
शाळा सुट्टीची वेळ होती
पिल्लू माझी एकटीच गेट जवळ उभी होती
मायबापा सोबत गोष्टी करत जाणाऱ्या मुलांकडे बघत होती
मग भिरभिरत्या नजरेने कोणालातरी शोधत होती
कोणीच घ्यायला आलं नाही म्हणून
रडवेल्या चेहऱ्याने एकटीच घराकडे चालू लागली
डोळे अविरत वाहू लागले तिला रडवेली बघून
मी असतो तर,
मला गोष्टी सांगत उड्या मारत माझ्यासोबत घरी आली असती
पण आता काय उपयोग
मी या जगात उरलो नव्हतो..

अरेरे, काय हाल झालेत माझ्या कुटुंबाचे
मी माझे दुःख कमी करायला त्यांना पोरकं केलं
माझं कर्तव्य झटकून मी त्यांना दुःखात लोटल
पच्छताप होतोय मला आता
मी जरा घाईच केली
उगाच मी आत्महत्या केली
एकदा, एकदा मला परत जायचं आहे
माझ्या कुटुंबासाठी मला जगायचं आहे
मला परत जायचे आहे
मला परत जायचे आहे....

रडत रडत उठून बसलो
आह! हे हे स्वप्न होतं
मी मी जिवंत होतो..
बर झालं मी जगात आहे..

मी कसा काय आत्महत्येचा विचार करत होतो
कुटुंबाला त्रासात टाकून आपलाच विचार करत होतो
या स्वप्नाने डोळे उघडले
माझं जीवन माझच नाही आज समजले
कधी कधीच आता असा विचार करणार नाही
माझ्या कुटुंबाला पोरक करून जाणार नाही....

****

®© धम्मदिक्षा परशुराम चांदेकर
विठ्ठलवाडा
E-mail:- dhammadiksha.in@gmail.com

कर्तव्यनिष्ठा

देशसीमेवर लढण्यास
सदैव सज्ज तुझे पाऊल,
आम्ही मात्र निद्रावस्थेत
तुला कळते शत्रुची चाहुल.

कायिक स्वास्थ्य जपण्यासाठी
तूच देव, तूच जीवनदाता,
दर्शन घडले कोविड काळात
एकमेव होतास कर्ताधर्ता.

सशक्त हवे समाजकारण
कार्यकर्ता असावा खंदा,
तुझ्याच सवे आम्ही सारे
समाजसेवा हाच खरा धंदा.

सणवार, ऊन-वारा-पाऊस
बंदोबस्तात चाले तुझे सत्र,
जनजीवन सुरळित राखण्यास
सुसज्ज असतोस अहोरात्र.

सुजाण सक्षम नागरिक घडवून
सर्वांगीण शिक्षणाची घेवू आन,
सारेच मिळून करू जगताचे कल्याण,
वाढवू राष्ट्राची आन-बान आणि शान.

होवू दे रे देवा,सर्वांचेच भले
न राहावी खंत, न राहावी उणीव,
नित्य असू दे प्रत्येक मना-मनात
तुझ्यातील देवपणाची जाणीव.

राखू दे कर्तव्यावर निष्ठा
कर्तृत्वाचे भान दे.......
साधनेची पूर्ती करण्या
साधकाला दान दे.......

****

सौ. साधना श्रीकांत पोहरे-नेटके
नागपूर
संपर्क - 9923610400

शब्दरचना.... प्रकाश आमटे

प्र...प्राणी पक्षी आपले सखे सोबती

का...काळाच्या पुढे आपली सदैव दृष्टी

श...शब्दही फिके आपल्या कार्यापुढती

बा...बाबांचे अनुभवी विचार संगती

बा...बाबांच्या कार्याचा वसा सभोवती

आ...आयुष्य वेचले कुष्ठरोगी समाजसेवेसाठी

म...महाराष्ट्राची मान जगात उंचवी

टे...टेकू माथा आपुल्या चरणांवरती.

रचना...मयुरेश अरुण कुलकर्णी

सोलापूर

संपर्क...9421024881.

चित्रांकन



कु . रिया जयराम सिडाम
लोक बिरादरी आश्रमशाळा, हेमलकसा वर्ग – १० वी.

कु.श्रुतिका पाटील, सालपे, वर्ग- ४ थी

शबरी चव्हाण, विरार



कु. मेहविश खान, दौंड वर्ग – ५ वी

नमस्कार !

'**समर्पित बिरादरी**' वर्धापनदिन विशेषांकास आपला सलग 3 वर्षे मिळत असलेला भरभरून प्रतिसाद आम्हाला नेहमीच प्रेरणा देत असतो. हे कार्य असेच अविरत सुरु ठेवण्यासाठी आम्हाला आपल्यासारख्या वाचक तसेच लेखक कार्यकर्त्यांची मदत मिळत असते.

23 डिसेंबर 2023 चा वर्धापनदिन हा लोक बिरादरी प्रकल्पाचा 50 वर्धापन दिन आहे तरी विशेषांक हा छापील स्वरूपात असेल यामुळे आम्हाला आपल्या मधील कार्यकर्त्यांची मदत लागू शकते, तरी आपण जर मदत करण्यास इच्छुक असला तर खालील पत्त्यावरती मेल करायला विसरू नका. धन्यवाद !

magazinelbp@gmail.com

- टीम समर्पित बिरादरी